# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४६ ] आकोला—सोमवार तारीख २ माहे आक्टोंबर सन १९११ इ० [ अंक ३८


## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........२ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

**सुचना:**— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. मागुदें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल

## जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुप याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } G. A. Phillips.
आकोला ९।९।०९ } एजंट
नं १

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या **सोन्याच्या** चिपा मुंबई बँकच्या **आकोले** व **उमरावती** येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती कारितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६३/३ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक } G. A. PHILLIPS.
अकोला २१.९.१० } एजंट.
नो० नं० २.

## चांदीचीं भांडीं.

### खरें सचोटीचें दुकान.

आमचे दुकानीं शुद्ध चिनई चांदीचीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं विक्रीस तयार असतात. माल काळजीपूर्वक वक्तशीर व्ही. पी. नें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल जोखिमदार राहूं. एकवार अनुभव घ्यावा.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन.
३३१ आदितवारपेठ, नाशिक

## किर्लोस्कर बंधूंनीं केलेलीं शेतकीचीं आउतें वगैरे.

१ कडबा कापण्याचें नंबर "ब" यंत्र—यानें कडबा कापून घातल्यास गुरांचे पोट भरून निमा कडबा वाचतो. किं० रु० १०-९-०

२ **लोखंडी नांगर नं १२** हा नांगर दोन बैलांनीं चालतो. माळ जमीन, मळीची जमीन, व भुईमुगाच्या शेंगा काढण्या करितां याचा फारच उपयोग होतो किं. रु० १०-९-०

३ **लाखंडी मोठे नांगर** हे नांगर सहा पासून आठ बैलानीं चालतात. विशेष करून काळ्या जमीनीकरतां याचा फार उपयोग होतो. किं० रु० ३८-०-०

४ आंबोळयाचे तवे नंबर "ब" हे तवे बिडाचे केलेले असून यावर एका बाजूस आंबोळ्या व दुसरे बाजूस पुरणाच्या पोळ्याकरितां येतात यांचा व्यास ११ इंच असून वजन अजमासे चार पक्के शेर आहे हा तवा बायकांना फारच आवडला आहे. किं० रु० १-४-०

किर्लोस्कर बंधु
पोष्ट किर्लोस्करवाडी
[ स. औंध, जिल्हा सातारा. ]

नो० नं० ३९६

## नोटीस

वि॥ सबजड्ज सा० बहादूर आकोला यांचे कोर्ट

किरकोळ मोकदमा नंबर २२ सन १९११
सक्सेशन सर्टीफिकेट मिळविण्याचा अर्ज

गुलामरसूल वलद सेखमुनीर
अमिनाबी वलद सेखमुनीर
चांदबी मर्द सेखमुनीर
रहीमबी मर्द सेखमुनीर } अर्जदार
पैकी नंबर १।२ हे अज्ञान पा क.
आई चांदबी मर्द सेखमुनीर
रा० आकोट

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं, अर्जदार यानें सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याबद्दल दिलेला अर्ज आमचे कोर्टांत ता० ३०-१०-१९११ इसवी रोजीं नेमिला आहे. त्या तारखेस ज्यांची कांहीं तक्रार असेल त्यानें सकाळीं १० वाजतां आमचे कोर्टांत हाजर व्हावें. तसें न केल्यास पुढें कोणत्याच प्रकारची तक्रार ऐकिली जाणार नाहीं.

कळावें तारीख २१।९।११ इसवी
R. V. Atre,
सबजड्ज आकोला

नो० नं० ४१८

## नोटीस

नोटीस बे॥ मैना मर्द मारुती कोष्टी राहणार बाळापूर तालुके मजकूर ईस

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुझा नवरा मयत मारुती हा माझा धाकटा बंधु होता. तो गेल्या नागदिपवाळीच्या नंतर मयत झाला. त्याला तीन मुली आहेत. ज्यावेळीं मारुती मयत झाला त्यावेळीं नांदूरा खुर्द येथें पंचासमक्ष त्याचे जवळील सामान सोन्या चांदीचे दागीने व भांडी तांब्याची व पितळेची मिळून रुपये १०० चा माल याची यादी केली ती यादी घरीं माझ्याजवळ आहे. सदर्हू सोन्या चांदीचे दागीने व भांडी तूं गेल्या श्रावण महीन्यांत एकदम आपले भावाचे येथें घेऊन गेलीस. श्रावण महिन्या पावेतों तुझा सर्व खर्च रुपये ५० बाळांतपणासुद्धां मीं केला आहे. हल्लीं तूं लोकाचे नादीं लागून तुझा दुसरा घरठाव करण्याचा विचार झालेला आहे. माझें ह्मणणें असें कीं तूं माझे घरीं राहून खावेस मी अन्नवस्त्र पुरविण्यांस तयार आहे. या उपर तुझी मर्जी नसल्यास तुझ्या तिन्ही मुली माझे ताब्यांत द्याव्यांत मी त्यांचें संगोपन व लग्नकार्यही करीन तरी माझे येथें राहण्यास यावयाचे असल्यास ही नोटीस पावल्यापासून १ महिन्याचे आंत तूं बरोबर नेलेल्या सर्व सामानसह माझे येथें मुलीसह निघून यावें. व यावयाचे नसल्यास तूं नेलेलें यादी प्रमाणे सर्व सामान माझे ताब्यांत द्यावें व मुलींही माझे घरीं आणून पोंचवाव्या. ह्याप्रमाणें न केल्यास योग्य ती तजवीज केली जाईल.

कळावे तारीख २७।९।११
सही
कृष्णा तुळशीराम कोष्टी राहणार बाळापूर नि० खुद हातची
नि॥ चा दस्तूर नारायणपुरी गुरुगवोपुरी रा० आकोला.

नो० नं० ४१९

## नोटीस

रा. रा. काळू जैराम वकखेडे कुणबी राहाणार टाकळी खुसबोड तालुका बाळापुर यांस

या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं तुम्हाला माझा भाऊ केशव धरमाजी यानें गाहाण रोख लिहून नोंदून दिला होता त्याचा पूर्ण हिशोब करून तुम्ही मजकडून ५६० रुपये रोख नगदी घेऊन निकाल केला. तथापी तुम्ही अजून गाहाण खत परत दिलें नाहीं. तुम्ही बेमान नाहीं तथापि मला कर्जाच्या फेडीचा दाखला दुसरा कांही कामा करितां पाहीजे आहे तर ही जाहीर नोटीस पोचल्या तारखे पासुन ८ दिवसांच्या आंत माझा गहाण रोखा मला परत द्यावा. तसें करण्यांत चुकाल तर तुम्हावर दिवाणींत दावा करून तो कागद परत मिळवावा लागेल. या नोटीशीचा व इतर खर्च दुसऱ्या सर्व नुकसानी सुद्धां तुम्हा कडून वसूल करण्यांत येईल. कळावें ता. २४ सप्टेंबर १९-११ इ.

सही
शिवराम वलद भमाजी पाटील राहणार टाकळी खुसबोड दस्तुर खु. द.

नो० नं० ४२०

## नोटीस

वि. सबजड्ज सा० बहादूर कोर्ट आकोला. यांचे कोर्ट

किरकोळ मोकदमा नंबर २१ सन १९११
सक्सेशन सार्टिफिकेट मिळविण्याचा अर्ज.

राधाबाई जवजे केशवराव देशमुख } अर्जदार
रा० वडाळी ता० आकोट. }

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं- अर्जदार यानें सक्सेशन सार्टिफिकेट मिळ, ण्यांबद्दल दिलेला अर्ज आमचे कोर्टांत ता० ३०-१०-१९११ इ. रोजीं नेमिला आहे. त्या तारखेस ज्यांची कांहीं तक्रार असेल त्यानें सकाळीं ( दहा ) १० वाजतां आमचे कोर्टांत हाजर व्हावे. तसें न केल्यास पुढें कोणत्याच प्रकारची तक्रार ऐकला जाणार नाहीं कळावें ता० २१-९-११

सबजज्ज आकोला-

नो. नं. ४२१ R. V. Atre.

## जाहिरात

सर्व शेट सावकार लोकांस खालीं सही करणार यांजकडून या जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं माझा मुलगा जयराम तुकाराम वाणी राहणार लाखनवाडा बु० ता० बाळापूर. हा गैर चालीचा निघाल्यामुळ त्यास माझे संमती खेरीज कोणी यापूर्वीं कर्ज दिले असल्यास व यापुढें कोणी दिल्यास त्याचा मी जबाबदार नाहीं व त्यानें काढलेलें कर्ज त्याचा तो देईल. तसेंच माझी स्थावर जंगम जिनगी त्याजपासून कोणी गहाण खरेदी वगैरे घेऊं नये घेतल्यास तो व्यवहार रद्द असें व त्याजबद्दलची कायदेशीर तजवीज करीन. कळावें. ता० २८।९।११ इ०

सही
तुकाराम वलद हरी शेट आप्पा वाणी लाखनवाडा बु० नि० खु० हातची असे.
द० कृष्णाजी हरी कुळकर्णी.

नो. नं.४२२

## वर्तमानसार.

बंगाल्यांतील पुढारी अध्यक्षाचे जागीं कोणाची निवड करावी या प्रश्नाच्या विचारांत तूर्त गुंतले आहेत. स्वागत कमिटीस पुढील गृहस्थांचीं नांवें सुचविण्यांत आलीं आहेत:— पंडित बिशन नारायण धार, मि मोतीलाल नेहरू डॉ॰ तेजबहादुर सप्रू, रा. ब. लाला लालचंद, ना. लाला हरकिसनलाल' ना. शादीलाल ना. जी. के. पारेख, ना. डी. ए. खरे, सर विठ्ठलदास ठाकरसी, दि ब. के. कृष्णस्वामीराव, ना. शेषगिरी ऐय्यर, ना. गोविंद राघव ऐय्यर, ना. मझरूल हक्क, ना. नबाब सैय्यद महंमद, मि. हसन इमान ना. गंगाप्रसाद वर्मा व ना. रा. ब. मुधोळकर.

आयर्लंडांत सध्यां ग्रेट सदर्न रेल्वेवर संप झाला असून ५००० नोकर संपास सामील झाले आहेत. कॉर्क' रिक, वॉटरफर्ड व दुसरी कांहीं स्टेशन्स येथील स्थिती चिंताजनक असून त्यांच्या संरक्षणासाठीं सैन्यांतील लोक ठेवण्यांत आले आहेत. जरूर पडल्यास डाब्लिनला जाण्यासाठीं ॲल्डरशाट येथें सैन्य तयार ठेवण्यांत येत आहे.

फ्रेंच लढाऊ जहाज लिबर्टे याला पहाटे ६ वाजण्यापूर्वीं आग लागली- दारूगोळ्यापर्यंत आग जाऊं नये ह्मणून पराकाष्ठेचे प्रयत्न करण्यांत आले, परंतु ते सिद्धीस गेले नाहींत. पांच वाजतां दारूगोळ्याचा पहिला स्फोट झाला. डेकवरील १०० लोकांनीं एकदम पाण्यांत उड्यां टाकल्या. डेकच्या खालील मजल्यांतील लोक स्फोटामुळें जागे झाले व त्यांनीं डेकवरील लोकांचें अनुकरण करण्याचा प्रयत्न केला, परंतु तसें न करण्यास त्यास हूकूम झाला. इतक्यांत आणखी दोन स्फोट झालेच स्फोट झाले व त्यासरशीं लिबर्टे जहाज दगडाप्रमाणें पाण्यांत बुडालें. जहाजाचा लोखंडी पत्राच काय तो पाण्यावर तरंगत राहिला. लिबर्टेवरून ज्यांनीं पाण्यांत उड्या टाकल्या, त्यांना किनाऱ्यावरील होड्या व जहाजें यांनीं वांचविलें जे जहाजावर राहिले ते स्फोटामुळें हवेंत वरफेंकले गेले. किकिनाऱ्यावर या लोकांचीं नुसतीं प्रेतेंच जाऊन लागलीं. लिबर्टे जहाजावर १८ मिनिटांत एकंदर ५ स्फोट झाले. लिबर्टे जहाजावरील २७४ खलाशी जिवंत सांपडले असून त्यांपैकीं ४० घायाळ झालेले आहेत. ३९० खलाशांचा पत्ता लागलेला नाहीं. लिबर्टे जहाजावरील स्फोट इतका भयंकर होता कीं त्यामुळें आसपासच्या लढाऊ जहाजांवर देखील संकट ओढवलें ' डेमोक्रॅटिक ' नांवाच्या लढाऊ जहाजावरील २० खलाशीं ठार होऊन ५० घायाळ झाले. रिपब्लिक व जास्टिस या जहाजांवरीलही कित्येक लोक ठार व घायाळ झाले. लिबर्टे जहाजापासून दोन मैलांच्या अंतरावर असलेल्या फाउडंर नांवाच्या लढाऊ जहाजाचा कमांडर फुटलेल्या गोळ्याचा तुकडा लागून ठार झाला. लिबर्टे जहाजावरील लोकांनीं फारच धैर्यानें व शिस्तीचें वर्तन केलें. दुसरा स्फोटो होऊन पुष्कळ लोक मेले तरी शिल्लक राहिलेल्या लोकांनीं शिस्त मोडली नाहीं.

## पत्रव्यवहार

रा० रा० वऱ्हाड समाचार कर्ते यांस—

सुधारणेबरोबर आपणास ज्या अनेक गोष्टींचा लाभ झाला आहे त्यांत वर्तमान पत्राची संस्था हा एक विशेष लाभ आहे. वर्तमानपत्र जरी प्रत्यक्ष वाङ्मयांत भर घालीत नाहींत तथापि इतर तऱ्हेनें तीं राष्ट्राचे प्रगतीस अत्यंत कारणीभूत होत आहेत. सुधारलेल्या देशांत वर्तमानपत्रांची योग्यता फार मोठी समजतात. वर्तमानपत्रकार आणि त्यांत लिहणारे रिपोर्टर्स यास फार मोठा मान असून त्यांचें उत्तरही कित्येक प्रसंगीं आपले कल्पनेचे बाहेर असतें. वर्तमानपत्राचा बातमीदार हा चित्रगुप्ताप्रमाणें सर्वगामी असतो. मात्र चित्रगुप्ताप्रमाणें याचा रिपोर्ट नसून कित्येक प्रसंगीं त्याचे कल्पनासृष्टींतून उत्पन्न झाला असतो. वर्तमानपत्रावरून दर रोजचा इतिहास व रोजची प्रगति किती झाली हें कोणी लिहिण्याचा प्रयत्न केल्यास तसेंही करणें कठीण नाहीं. परंतु या सर्व गोष्टी आमचे गरीब बापड्या वर्तमानपत्रास लागू होतीलच असें नाहीं. वर्तमानपत्रें नुसत्या बातम्या अथवा इकडच्या तिकडच्या गप्पा मारण्याचेंच साधन नसून ती लोक शिक्षण देण्याची एक महत्वाची संस्था आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. आजचे पत्रांत आपणास एक सुचना करीत आहे तिकडे आपण लक्ष देऊन ती आपले पत्रांत जरूर आमलांत आणाल अशी आशा आहे.

प्रश्नोत्तर — नावाचा कॉलम ठेऊन त्यांत निरनिराळे विषयावर लोकांनीं केलेले प्रश्न छापून दुसरे पत्रांत सवडीनुसार उत्तरें देण्याची व्यवस्था केल्यास त्यापासून जिज्ञासूचे बरेंच मोठें काम होणार आहे. प्रथम आपण आपले इच्छेनुरूप विषयाची निवड करून, तितकेच विषयाचे प्रश्न घेऊं शकता. प्रश्नास नंबर देऊन उत्तरें देतांना फक्त नंबराचा दाखला देत जावा. आपण आपल्या प्रगतीपर पत्रांत या सुचनेचा. जरूर विचार करतील ]

हे वि०

चिं० ह० मराठे

सिताबर्डी

ता० ७।८।११

---

१ प्रश्न — क्रोमोपथीवर इंग्रजींत कोणकोणचे ग्रंथ उपलब्ध आहेत. क्रोमोपथी अथवा अशा तऱ्हेच्या पद्धतीचा आपले आर्यवैद्यकींत विचार झाला आहे काय?

चिं० ह० मराठे

---

वऱ्हाडसमाचार

भाद्रपद शुद्ध १० शके १८३३ दुंदुभिनाम संवत्सर

## शेतकऱ्यांची शंका

### ( अमर्याद जबाबदारी का घ्यावी? )

शेतकरी ह्मणतील अशी दुसऱ्याबद्दल जबाबदारी आह्मी कां घ्यावी? आह्मी आपणांपुरती घेऊं. दुसऱ्याकरितां जामीन कां राहू? हा गळफास कां व्यर्थ लाऊन घेऊं? या भीतीनें सहकारी पतपेढ्या खेड्यांतून निघत नाहींत, व निघाल्या आहेत त्याही या भीतीनें चांगल्या चालत नाहींत. प्रत्येक पेढींत कांहीं थोडे लोक खेड्याच्या मानानें श्रीमंत, कांहीं मध्यम, व बरेच गरीब असतात. श्रीमंतांत बहुतेक तेथील देशमुख, पाटील, पटवारी, सावकार हे होत. पेढी स्थापावी असा सरकारच्या अधिकाऱ्यांनें उपदेश केला—आग्रह केला—तेव्हां त्यांच्या भिडेभिडेनें कांहीं पेढ्या स्थापन झाल्या. परंतु सहकारी पतपेढीच्या मुळाशीं जी अमर्याद जबाबदारी आहे, तिचें रहस्य त्यांस कळलें नाहीं? तिजबद्दल त्यांची समजूत पटली नाहीं, असें उघड उघड दिसतें. पण ही जर समजूत पटली नाहीं, व अमर्याद जबाबदारी घेण्याला सर्व तयार झाले नाहींत, तर सहकारी पतपेढी स्थापन केली काय न केली काय असें होईल ती मरतमढें होईल. अशा मृतप्राय पेढ्यांत कसा व्यवहार होतो तो पहा- एखादा गरीब पण सचोटीचा— कारण सचोटीचा ह्मणून तर तो पेढींत घेतला असतो. शेतकरी कर्ज मागायला आला ह्मणजे कार्यकारी मंडळ ह्मणतें आह्मी तुला कर्ज देत नाहीं, कां? तर तुझी पत नाहीं. पण प्रत्येकाची पत कोठपर्यंत आहे हें दरवर्षीं सहकारी पतपेढीची साधारण सभा भरते त्यावेळीं ठरविलें पाहिजे. याकडे अजून पतपेढ्यांच्या व्यवस्थापक मंडळाचें अगर सामान्य सभासदांचें लक्ष गेलें नाहीं. तिकडे लक्ष द्यावें, अशी त्यास सुचना आहे. प्रत्येकाची अशी पत वार्षिक सभेंत ठरली, ह्मणजे एकंदर पतपेढीचीही पत ठरली. हा ठराव करतेवेळीं सर्वांनीं एकंदर पेढीचें व प्रत्येकाचें हित लक्षांत आणिलें पाहिजे. हा ठराव झाला असला ह्मणजे व्यवस्थापक मंडळास अथवा पंचांस बरेंच सुलभ जातें. या ठरावांत नमूद केलेल्या पतीच्या मर्यादेच्या आंत ह्मणजे कोणाची पत शंभर रु० ठरविली असेल, तर तिच्या आंत पंचांनीं कर्ज देण्यांस फारशीं हरकत घेऊं नये. व एकंदर पेढीची पत ह्मणजे एकएक इसमाच्या पतीची बेरीज ' तिच्या मर्यादेच्या आंत पंचास व्यवहार करितां येईल. ह्मणजे त्या मर्यादेच्या आंत खेड्यांतील सावकाराकडून किंवा इतराकडून ठेवी ह्मणून किंवा तसें नच जमलें तर अर्बन सेंट्रल बँक अकोला इजकडून कर्ज ह्मणून काढितां येईल. आकोले जिल्ह्यांतील खेड्यांतील पतपेढ्यांना भांडवल सोयीनें देण्याकरितां ही बँक मुद्दाम स्थापिली आहे. या रितीनें मध्यम स्थितींतल्या व गरीब अशा पेढीच्या भागीदारांच्या गरजा भागवितां येतील कोणाची मुळींच पत नसले, तर त्याला पेढींत घेऊं नये. परंतु पेढींत घेतल्यावर पत नाहीं असें ह्मणणें ह्मणजे पेढीचा उपयोग न करणें, व तिची वाढ होऊं न देणें असें होय. पेढीं असेंच इसम घ्यावें कीं त्यांची कांहींना कांहीं तरी पत आहे त्या पतीला ते महाग नसावे. त्या व तोपर्यंत त्यांच्या गरजा भागविल्या पाहिजेत. व गरज संपली ह्मणजे प्रत्येक कर्ज घेणारानें मुदतींत व्याजासह कर्ज परत केलें पाहिजे. असे इसम पांच सहा व श्रीमंत व मध्यम पांच सहा मिळाले व त्यांनीं एकमेकांच्या कर्जाबद्दल जबाबदारी घेतली, तर पेढीला जी रक्कम कर्जाऊ घेणें लागेल ती सोयीनें मिळेल. तीवर व्याज फार पडणार नाहीं. ही सोय कशानें निघाली? अमर्याद जबाबदारीनें. पेढीचा व्यवहार वाढत जाईल तसें तिचें बचत भांडवल वाढत जाईल. कारण प्रत्येक शंभर रुपयाच्या कर्जामागें तिला दरमहा कर्मांत कमी नफा चार आणे ( रिणको कडून येणरें व्याज १ रु० अर्बन सेंट्रल बांकेचें व्याज -।॥- ) राहील खेड्यांतल्या खेड्यांत ठेवी सावकारांकडून आठआणे व्याजावर मिळाल्यास हा नफा दरमहा दरशेंकडा -॥- राहील. व सर्व नफा बचत भांडवल ह्मणून गणिला जाईल, तेव्हां पेढीच्या एकंदर जबाबदारीचें तारणें वाढत जाऊन एकंदर पेढीची पतही वाढेल.

पेढीच्या पंचांनीं कर्ज मागणारास त्याची पत पाहून कर्ज द्यावें, असें जरी आहे; तरी सहकारि पतपेढी फुटली ह्मणजे चौकशी आलीच– "तुला कशाला कर्ज पाहिजे! " " लग्नाकरितां " " लग्नाकरितां इतका खर्च कशाला करितोस? " " अमकीं पांघरुणें इतक्या किंमतीचीं पाहिजेत, अमूक मंडळी बोलाविली पाहिजे. जेवणाला अमूक अमूक केलें पाहिजे. " " इतकीं पांघरुणें इतक्या किंमतीचीं नकोत, इतकीच मंडळी बोलाव. जेवणाला अमूक कर "– अशी रदबदली करून मागणाराची रक्कम रुपये ४०० पासून २००।२५० पर्यंत आणितां येईल. हीच पेढी नसती तर कर्ज मागणारानें सावकारापासून ४०० रु० कर्ज आणिलें असतें. व त्याला दरमहा आठ रु० व्याज देऊन कर्ज फेडण्यास दोन वर्षें लागलीं असतीं. तेव्हां सहकारीपतपेढीच्या मदतीनें त्याचा काय फायदा झाला? त्यानें आपणावर जें ४०० रुपयाचें ओझें करून ठेविलें असतें तें दोनशेंच झालें. शिवाय व्याज त्याला आठ रुपये द्यावें लागलें असतें तें २ च रुपये द्यावें लागणार. व व्याज हलकें झाल्यानें कर्ज एका वर्षाच्या आंत फिटणार! अशी रदबदली करण्याला खेड्यांतले **समंजसच लोक पंचांत सामील केलें पाहिजेत.** असेच लोक भावड्या शेतकऱ्याच्या पतीस त्याच्या हिताकरितां व सोयीकरितां त्याच्या पतीस बांध घालतील, व त्याबरोबरच पेढीचीही पत वाढवितील. असे

बांध घालणार पंच असल्यास अमर्याद जबाबदारी घेण्याला पेढीच्या कोणाही सभासदास भीति वाटूं नये. कारण ही जरी नांवची अमर्याद आहे, तरी ती इतरांच्या अंगावर शेकणार नाहीं अशीच मुळपासून खबरदारी घेतली पाहिजे. तरी हा व्यवहार आहे, कधींच जबाबदारी शेकणार नाहीं असें नाहीं. प्रसंग आहे. काळवेळ आहे. पाऊस पाणी कमीजास्त होतो. पीक कमी येतें व क्वचित् बुडतें. तरी कर्जाला शेत अगर शेतें तारण असतातच. तेव्हा एखाद्या शेतकऱ्याचें पीक अगदीं बुडालें, व शेत विकून वगैरे जरी सारें कर्ज फिटलें नाहीं तरी न फिटलेला भाग थोडा असणार व तो इतरांवर हिस्सेरशीनें येणार, तेव्हां अगदीं थोडाच असेल पण इतका हा थोडा भाग कधीं काळीं—प्रसंगीं—आपत्तींत— जे सोसण्यास तयार होणार नाहींत, त्यांनीं **पतपेढींत शिरूं नये, व त्यांना पतपेढींत कोणी सामील करून घेऊं नये.** खेड्यांतल्या लोकांविषयीं— त्यांतल्यात्यांत पचोटीच्या अब्रूदार गरीब शेतकऱ्यांविषयीं ज्यांना कांहीं कळवळा नाहीं, त्यांना मदत करण्याला जे पुढे होणार नाहींत, व प्रसंगीं त्यांच्या करितां थोडी बहूत पैशाचीही झीज सोसायला तयार होणार नाहींत असेच का खेड्यांतले सर्व श्रीमंत देशमुख, पाटील, पटवारी, सावकार आहेत ?आह्मांला वाटत नाहीं, कांहीं थोडे श्रीमंत लोक अंग मेहेनत, बुद्धिवाद, व शेवटीं पैसा या कामी लावण्यास तयार आहेत. त्यांची अझून समजूत झाली नाहीं, ह्मणून ते भराभर पुढें आले नाहींत, असें आह्मांस वाटतें. ती समजूत घालून द्यावी व प्रत्येक मोठ्या खेड्यांत पतपेढी व्हावी, या उद्देशानें हे लेख लिहिले आहेत.

**पतपेढ्या आणि सावकार.**

नकत्याच भरलेल्या परस्पर साह्यकारक मंडळ्यांच्या कानफरन्सपुढें कलकत्याचे ना० मि० कामिंग यांनीं जें भाषण केलें यांतला एक मुद्दा विशेषरीतीनें विचार करण्यासारखा आहे आणि उशीरा कां होईना पण सरकारी अधिकाऱ्यांचें तिकडे लक्ष जात आहे ही गोष्ट आह्मांस समाधानाची वाटते. तो मुद्दा हा:— आजपर्यंत अशी समजूत होती कीं पतपेढ्या स्थापन करण्याचा उद्देश ह्मणजे शेतकऱ्याची सावकाराच्या तडाख्यातून सुटका करणें हा होय. सावकार शेतकऱ्यापासून किती व्याज घेतात या बद्दलचे फुगवलेले आंकडे कित्येक पतपेढ्यांच्या रिपोर्टांतून अद्यापही देण्यांत येत असतात. ना० मि० कामिंग ह्मणतात कीं ही चूक आहे. सावकारांत सगळेच गरीब शेतकऱ्यांना अडवून लुबाडणारे असतात ही समजूत अत्यंत भ्रामक व घातक आहे. सावकार आणि शेतकरी यांचा संबंध तोडून टाकणें हा पतपेढ्यांचा उद्देशही नाही व तसें करणें इष्टही नाही. उलट सावकारांची सुधारणा करून त्यांचा पतपेढ्याकडे उपयोग करून घ्यावयास पाहिजे आहे. सावकारांत कित्येक इतके चांगले व सरळ व्यवहाराचे लोक आहेत कीं गांवकरी त्यांना मायबाप समजतात; गांवकऱ्यांना अर्ध्या रात्रीं पैशाची गरज लागली तर ते त्या सावकाराच्या दाराशीं जातात आणि त्यांना मदत मिळते; आणि पिढ्यान पिढ्या असा व्यवहार चालला असतो, पण सावकाराला कोर्टाची पायरी चढावी लागत नाहीं. सावकार हा लोकांना जर खरोखर छळकर्ता वाटता तर खोड्याशा गांवांत त्याचा निभावच लागला नसता. जळांत राहून माशांशीं वैर करण्याइतके मुर्ख सावकार लोक नसतातच. सावकारासंबंधानें सरकारी अधिकाऱ्यांच्या मनां अलीकडे जो हा फरक झाला आहे त्याला दोन कारणें आहेत. लहान लहान गावांतून असें अनुभवास आलें आलें आहे कीं सावकार लोकांची प्रतिकूलता संपादून किंवा त्यांच्याशीं द्वेषभाव ठेऊन पतपेढ्यांची संस्था चालविता येणें अशक्य आहे. निदान तसें करण्यानें पुष्कळ अडचणी येण्यासारख्या आहेत. पतपेढ्या शेतकऱ्याला शेत सुधारणेच्या कामासाठीं कर्जाऊ रकमा देईल, पण लग्नकार्य किंवा ज्या साठीं पतपेढ्याकडून कर्जाऊ रकम मिळूं शकत नाहीं अशा कित्येक गोष्टी आहेत. अशावेळीं सावकाराकडेच जावें लागणार आहे. तेव्हां त्याच्याशीं आपला संबंध तोडणें हितावह होणार नाहीं हें शेतकरी जाणून असतात. दुसरी गोष्ट खुद्द पतपेढ्यांना भांडवलाची जरूर लागेल तेव्हां गांवचे सावकार पतपेढ्याचे भागीदार मेंबर ह्मणून आपलें भांडवल पुढें करून साह्य करतील. सारांश, सावकार ह्मणजे शेतकऱ्यांचें रक्त शोषून घेणारी जळू अशी जी समजूत आहे ती चुकीची आहे ते शेतकऱ्याशीं देण्याघेण्याचा जो व्यवहार करतात तो परोपकार बुद्धीनें ते करीत नसले तरी त्यापासून शेतकऱ्याचें पुष्कळ हित आहे आणि खुद्द पतपेढ्यांनाही त्यांना अलग ठेवून काम करतां यावयाचें नाहीं. सावकारांचें साह्य पतपेढ्यांनी कोठपर्यंत घ्यावयाचें यालाही कांहीं मर्यादा पाहिजे हें उघड आहे. नाहीं तर त्या पेढ्यांच्या अस्थित्वावरच एखादेवेळीं गदा यावयाची ! पण योग्य दक्षता ठेवून पतपेढ्यांनीं सावकारांची सहनुभूति मिळवून काम केल्यास सावकारवर्गापासून अपाय न होतां हितच होईल असा ग्रह कित्येक सरकारी अधिकाऱ्यांचा होत चालला आहे हें पाहून कोणाला ही संतोषच वाटेल.

## कोठें काय चाललें आहे ?

पृथ्वीवर शांततेचें साम्राज्य स्थापन व्हावें अशी अंतःकरणापासून खरी खरी इच्छा किती राष्ट्रांची आहे तें मापण्याचें एखादें यंत्र असतें तर मोठी मौज दिसली असती. वेदांताच्या लांब लांब गप्पा सांगणारे अस्सल धादांती जसे आपले इकडे पुष्कळ आहेत, तसे शांततेचे स्तुतिस्तोत्र तोंडानें गात असतां हातानें ड्रेडनॉटवर ड्रेडनॉट बांधण्याच्या हुकुमावर सह्या करणारे राजकारणी धादांती युरोपमध्यें पुष्कळ आहेत. सर्वच प्रकारें युरोपची स्थिति ज्वालामुखी पर्वतासारखी झालेली आहे. इंग्लंडांत मजुरांचा प्रश्न फार बिकट झालेला आहे. फ्रान्समध्येंही जवळजवळ तीच स्थिति आहे. रशियाच्या बादशहाला राज्यक्रांति करूं पाहणाऱ्या निहिलिस्ट वगैरे लोकांचें भय क्षणोक्षणीं वाटत आहे. तुर्कस्थान व इटाली देश यांचें गुरगुरणें सुरूं आहे. फ्रान्स आणि जर्मनी यांचा मोरोक्को प्रकरणाविषयींचा तंटा मिटेल असें दिसत नाहीं. एशियाखंडांतलीं मोठालीं राष्ट्रें ह्मणजे पर्शिया, हिंदुस्थान, चीन व जपान हीं होत. पैकीं पर्शियामध्यें माजी शहा महमदअली यानें कांहीं वेळ बरीच धामधूम मांडली होती पण त्याचें कांहीं चाललें नाहीं. त्यानें एका सरदाराच्या हाताखालीं पाठविलेल्या सैन्याचा मोड होऊन त्या सरदाराला देहांत प्रायश्चित्त मिळालें ! आतां दुसरा एकजण शहाची गादी पटकावण्याची खटपट करीत आहे. एकंदरींत शहाचा मुगुट डळमळीत आहे. हिंदुस्थानांत सध्यां दिल्लीदरबाराची तयारी व तीच्या बरोबरच दुष्काळाच्या आपत्तीचे समयीं प्रजेला मदतकरण्याच्या तजाविजी यांची व टाघाट सुरूं आहे. जपानचें लक्ष रशियाशीं मागें झालेल्या युद्धाचेवेळीं झालेल्या कर्जाचे फेडीकडे लागलें आहे रशियावर त्यावेळीं जंगी विजय मिळविला खरा; पण त्यासाठीं भलतीच किंमत द्यावी लागली. ह्मणून तिजोरींत पडलेला मोठा खळगा औद्योगिक चळवळींच्या योगानें भरून काढण्याचा जंगी प्रयत्न सुरूं आहे. चीन लोकांतलीं व्यसनें कमी करून त्यांना सामाजिक सुधारणेच्या नव्या नव्या गोष्टींचा नाद लावून देण्यांत गुंतला आहे. तिबेटांत लामाचे पाय अद्याप जमिनीवर **टिकाव धरून राहत नाहीं.** राजकारणी झंजावात लामाला केव्हां वातावरणांत वर उंच फेकून देईल याचा नेम नाहीं. आफ्रिकेंत काळया गोऱ्यांचा प्रश्न विकोपाला **जाऊं पहात** आहे. गोरे लोक ह्मणजे भूदेवता. त्यांच्याकडे वांकड्या नजरेनें पाहणें हा घोर अपराध अशी समजूत करून घेऊन काळ्यांच्या हातून घडणाऱ्या सामान्य अपराधांना सुद्धां देहांत शिक्षा देण्याचा सपाटा सुरू आहे ट्रान्सवालमधला हिंदी लोकांचा प्रश्न अद्याप निकालाला लागलेला नाहीं. अमेरिकेंत कानडा व युनायटेड स्टेटस मधील रेसिप्रॉसिटी नांवाचा तह रद्द करण्याची जंगी खटपट सुरूं आहे. सदर तह घडवून आणणाऱ्या अधिकाऱ्यांची उचल बांगडी झाली आहे आणि आतां पुढें काय होते इकडे सर्वांचे डोळे लागले आहेत. अमेरिकेंत यंदा कापसाचें पीक यावें तसें येणार नाहीं असें भविष्य प्रसिद्ध झाल्यापासून व्यापारी व औद्योगिक वातावरणांतही बरीच चळवळ उडाली आहे. याप्रमाणें थोडक्यांत साऱ्या जगाच्या हालचालीचा वृत्तान्त आहे.

## नवे निझामसाहेब.

नव्या निझामसाहेबांनीं राज्यसुत्रें नुकतींच हातांत घेतलीं आहेत. पण इतक्यांतच आपल्या राज्यांतल्या एका ठळक गोष्टीकडे त्यांचें लक्ष जाऊन त्यांनीं तींतला दोष काढून टाकण्याचें काम धैर्यानें हातीं घेतलें आहे असें बांबेग्याझिटचा हैदराबादेचा बातमीदार कळवितो. मोगलाई राज्यांत पैशाची उधळपट्टी हा एक मोठा दोष आजपर्यंत चालत आला आहे. हल्लींच्या निजामसाहेबांचे दोघे बंधु व एक बहीण यांच्या तैनातीला आजपर्यंत एक डझनभर युरोपीयन नर्सेस होत्या, व त्यांच्या पगारप्रीत्यर्थ दरमहा ८४०० रु० खर्चीं पडत होते! हा प्रकार गेल्या पांच वर्षांत अविच्छिन्न सुरूं होता. पण ही निष्कारण उधळपट्टी नव्या निजामाला खपली नाहीं. ज्याप्रमाणें औदार्याचा त्याचप्रमाणें काटकसरीचा प्रारंभ स्वतःच्या घरापासून झाला पाहिजे या मताचे नवे निजामसाहेब दिसतात. त्यांनीं तिघांसाठीं तीन नर्सेस ठेवून बाकीच्यांना रजा दिली; इतकेंच नव्हें तर त्यांचा पगार पूर्वीं ७०० रु० होता तो कमी करून १५० रु० ठरविला. कामाच्या मानानें पगार असणें योग्य हें तत्त्व पूर्वींच्या कारकीर्दींत बारकाईनें पाळलें जात नव्हतें. तें या नव्या कारकीर्दींत पाळलें जाईल असा रंग दिसतो. तरुण निजामसाहेबांनीं कारकीर्दीला प्रारंभ उत्तम प्रकारें केला आहे यांत शंका नाहीं.

## साखर आणि आरोग्य.

बर्मिंगहाम येथें भरलेल्या ब्रिटिश मेडिकल असोसिएनपुढें एका शास्त्रज्ञानें असें सांगितलें कीं मिष्टान्न भोजनाची चटक अलिकडे इंग्रज लोकांना लागली आहे व तिचे आरोग्यावर दुष्परिणाम दिसूं लागले आहेत. मिष्टान्न हें एकंदरींत आरोग्याला प्रतिकूलच आहे—त्यांतून लहान मुलांना तर तें अधिकच वाईट. आपल्या देशांत अन्न पचविण्याच्या शक्तीचा जो ऱ्हास दिवसेंदिवस अधिक प्रमाणावर दिसत आहे. त्याला अन्य कारणें पुष्कळ आहेत, पण त्यांत मिष्टान्नभोजनाची संवय हें एक प्रधान कारण असावें अशी शंका घेण्यास जागा आहे. हिंदुस्थानांत साखरेचा खप वाढत्या प्रमाणावर आहे, आणि त्याबरोबर अपचनापासून होणाऱ्या रोगाचीही एकसारखी वाढ होत चाललेली दिसत आहे. आपण मनुष्यप्राणी साधे अन्नसुद्धां वाजवीपेक्षां पुष्कळ अधिक खातो, आणि जितकें ज्यास्त खावें तितकी अगांत ताकद जास्त येईल अशा चकीच्या समजुतीनें ज्यास्त खाण्याची संवय ठेवितो, पण त्यापासून हित न होतां आरोग्याची मात्र हानि होते असें अलिकडे शास्त्रज्ञ ह्मणूं लागले आहेत. मिष्टान्न हें तर साध्या अन्नापेक्षां अनेक प्रकारें अधिक वाईट आहे. आधुनिक लोक दररोजच्या खाण्यापिण्यांत साखरेचा उपयोग अधिक करूं लागले आहेत ही गोष्ट आनुभवसिद्ध आहे. दिवसांतून तीनचार वेळ चहा घेणारे थोडे नसतात. चहाकाफी बरोबर प्रत्येक वेळीं चमचा चमचा साखर पोटांत जाते. शिवाय, बिस्किटें, केक, शंखरपाळे वगैरे उपाहाराचे पदार्थ साखरेवाचून होत नाहींत. अशा रीतीनें प्रत्येक वेळीं अल्प प्रमाण धरले तरी एकदर साखरेचें प्रमाण बरेंच मोठें होतें. हें घातूक आहे हें लक्षांत ठेऊन शहाण्या माणसांनीं आपला आहार राखणें जरूर आहे.

## खरे ब्राह्मण.

दिवाण बहादुर आर. रघुनाथराव लिहितात—खऱ्या ब्राह्मणांना वैदिक धर्मानें अतिशय अडचणींत घातलें आहे. त्यानें परमेश्वराची मानस पुजा करावी, शिष्यांना सत्य ब्रह्म-

ज्ञान करून द्यावें, आणि नेहमीं विचार जागृत ठेऊन वागावें; कोणाला भिऊं नये, कोणाला भिवडावूं नये; शुचः क्षमा, दया शांति, करुणा इ० गुण धारण करावें इत्यादि आज्ञा वैदिक धर्मानें खऱ्या ब्राह्मणाचेमागें लावून दिल्या. हें कठोरव्रत चालवितां न आल्यामुळें आर्यांत प्रथम अधःपात झाला तो अर्थांतच ब्राह्मणांचा झाला. जितकी उंच त्यांची पदवी तितकें खोल त्यांचें पतन झालें. क्षत्रियांनीं ही संधी साधून ब्राह्मणांवर आपलें शस्त्र सुरूं केलें. त्यांनीं ब्राह्मण आपलेकडे घेण्याचा आणि ब्राह्मणाचें स्थान पटकावण्याचा यत्न केला. हा यत्न करणारे ते जैन होत. पण त्यांचा प्रयत्न फसला. त्यांच्या मागून बौद्ध आले. पण त्यांच्या नास्तिकवादामुळें ते अप्रिय झाले. पुढें वैश्य आणि शूद्र यांनीं ब्राह्मण मिळविण्याची खटपट करून पाहिली. विश्वबंधुत्वाचे नाते पुढें करून आदर्श ब्राह्मण जीवनांत कालक्षेप करण्याचा संकल्प त्यांनीं केला. पण ब्राह्मणांची कसोटी कांहीं सामान्य नाहीं तिला कोणीच उतरले नाहींत. हल्लीं जी भ्रष्टता दिसत आहे तिचें कारण हेंच आहे. अध्यात्मिक जीवन हें परमश्रेष्ठ जीवन, तिच्या पुढें आधिभौतिक संपत्ति, व वैभव तुच्छ असा उपदेश मनांत पूर्णपणें बाणला नाहीं तोंवर खरें ब्राह्मण्य कोणालाच लाभणार नाहीं. त्या मार्गाला परमेश्वर लावील तो खरा सुदिन !

## एकनाथी सहा ग्रंथ.

अलीकडे सुशिक्षितांच्या मनाची प्रवृत्ति जसजशी धार्मिक ग्रंथांच्या परिशीलनाकडे होत चालली आहे, तसतशी जुन्या ग्रंथांच्या सुधारलेल्या व सोयीच्या आणि स्वस्त आवृत्त्या बाहेर पडून मराठी वाङ्मयाचा प्रसार अधिकाधिक होऊं लागला आहे ही संतोषाची गोष्ट आहे. तुकारामाच्या अभंगाचा सार्थगाथा, सार्थज्ञानेश्वरी, वगैरे ग्रंथ बाहेर पडून त्यांनीं सामान्य मराठी वाचकांवर जे उपकार केले आहेत ते केवळ अवर्णनीय होत. तशा प्रकारचेच उपकार करणारा एक प्रचंड ग्रंथ पुण्याचें भारतभूषण छापखान्याचे मालक रा० गंगाधर गोविंद गोंधळेकर यांनीं अलीकडे प्रकाशित केला आहे. श्रीएकनाथ महाराजांची योग्यता जशी जुन्या भाविकांत तशी प्रार्थना समाजिष्टासारख्या नवशिक्षितांत ही फार मोठी मानण्यांत येते. पैठणचे नामांकित सत्पुरुष 'शिवदीन केसरी' यांनीं ह्मटल्याप्रमाणें 'प्रपंच साधुनि परमार्थाचा लाभ' करून भलेपणा मिळविणाऱ्या नररत्नांत एकनाथ हें एक अत्यंत तेजस्वी रत्न होतें. कांहीं वर्षांमागें न्या० रानडे यांनीं एकनाथी भागवतांतले वेंचे घेऊन त्यावर मुंबईच्या प्रार्थना समाजापुढें सुंदर व्याख्यानें दिलीं होतीं. त्या व्याख्यानांना श्रोत्यांच्या झुंडीच्याझुंडी लोटत. जुन्या लोकांत तर एकनाथी भागवता इतका दुसरा प्रिय ग्रंथच नाहीं ह्मटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं. भागवताशिवाय एकनाथांचे स्वात्मसुख, हस्तामलक, शुकाष्टक वगैरे दुसरेही कित्येक ग्रंथ आहेत या ग्रंथांची गोडी गरीब महाराष्ट्राला लावून देण्याला एकच उपाय आहे. हा उपाय ह्मणजे स्वस्त किंमतीत ग्रंथ देणें. ही गोष्ट रा० गोंधळेकर यांना पुर्णपणें पटलेली दिसते. एकनाथाच्या ग्रथांपैकीं तूर्त सहा ग्रंथ (भागवतासुद्धां) त्यांनीं एकत्र छापून तीन रुपयांत देण्यास काढले आहेत! यातले नुसतें एकनाथी भागवतच बाजारांत चारचार पांचपांच रुपयांस विकलें जातें! या दृष्टीनें पाहिलें ह्मणजे रा० गोंधळेकरांनी स्वस्तपणाची केवळ लूट मांडली आहे असें ह्मटलें पाहिजे. ११०० पानांचा मजबूत कापडी बांधणीचा २३०० ओव्यांचा ग्रंथ फक्त तीन रुपयांस देणें हें मोठें धाडस आहे, पण मराठी वाचकवर्ग आश्रय देऊन भार हलका करील या भरंवशावर रा० गोंधळेकरांनीं हें धाडस केलें आहे. या ग्रंथाची शिफारस आह्मी केवळ स्वस्तपणावरूनही करीत नाहीं. पुस्तकाचें अंतरंगही अधिक उपयुक्त करण्यासाठीं प्रकाशकांनीं शक्य ते प्रयत्न केले आहेत. हरिभक्तपरायण विष्णु बोवा जोग यांनीं भागवत संप्रदायाला शोभेलशी त्या संप्रदायाच्या दृष्टीनें प्रस्तावना लिहिली आहे. रा० माधवराव देशमुख यांनीं लहानसें पण वाचनीय असें नाथांचें चरित्र जोडलें आहे, आणि रा० माधवराव मोडक यांनीं कठीण शद्बावर अर्थद्योतक भरपूर टीपा दिल्या आहेत. या शिवाय प्रत्येक पृष्ठाखालीं निरनिराळ्या पोथ्यांतले पाठभेदही दिले आहेत. सारांश, पुस्तकाची उपयुक्तता वाढविण्याचे कामीं प्रकाशकांनीं बिलकूल कसूर होऊं दिली नाहीं. पुस्तक स्वल्प किंमतीत देतां यावें ह्मणून कागद मात्र रफ (तथापि जाड) वापरला आहे. येवढा प्रचंड ग्रंथ छापतांना छापखान्यांतल्या भुतांच्या लिला कमज्यास्त मानानें घडावयाच्याच, पण पुढल्या आवृत्तीचे वेळीं एखाद्या चांगल्या मांत्रिक प्रुफरीडराकडून त्याचा बंदोबस्त करावा अशी प्रकाशकांस आमची सुचना आहे. नाथांचें भागवत, स्वात्मसुख, शुकाष्टक, चतुःश्लोकीभागवत, आनंदलहरी, व हस्तामलक असे सहा ग्रंथ या पुस्तकांत आलेच आहेत. बाकी राहिलेले ग्रंथ ह्मणजे भावार्थ रामायण, प्रल्हादविजय, उद्धवबोध, रुक्मिणीस्वयंवर, व गाथा हेही दोन भागांमिळून असेच स्वल्प किंमतीचे काढून एकंदर नाथांच्या ग्रंथांचा लाभ महाराष्ट्रीयांना स्वल्पांत करून देण्याचें श्रेय रा० गोंधळेकर यांनीं संपादावें अशी आमची सूचना आहे. प्रस्तुत ग्रंथाला चांगला आश्रय मिळाल्यास दुसरेंही धाडस ते लवकरच करतील हें ध्यानांत आणून महाराष्ट्रवाचकवर्ग रा० गोंधळेकराच्या या प्रयत्नाचें योग्य चीज करतील अशी आमची खात्री आहे. पुस्तकें पुणें येथें भारतभूषण छापखान्यांत मिळतील.

## क्रांती.

[ विद्याखात्याचें नवें धोरण ]

आमचे प्रांताचे श्रेष्ठ अधिकारी रा. रा. क्रॅडाक साहेब हे कर्तृत्ववान् आहेत. यांच्या कारकीर्दीचें मुख्य लक्षण ह्मटलें ह्मणजे नवें जुनें फेरपालटून नव्या गोष्टी अमलांत आणणें हें होय. सध्यां त्यांनीं विद्याखात्याला चलन दिलें आहे. या प्रचलनाची मुख्य दिशा अशी कीं विद्येच्या प्रसाराबरोबरच शिकवावयाच्या विद्या अधिक तेजस्वी, वीर्यवती व सुलभ असाव्या इतकेंच नाहीं तर सरसकट सर्वच विद्यार्थ्यांनीं स्वतःची योग्यायोग्यता न पाहातां एकत्रिच विद्यामंदिरांतच गर्दी करूं नये. विद्यादानाचा खर्च ६ लक्षांनीं वाढविण्याचा संकल्प केला आहे. वाढत्या खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठीं फीचे दर वाढविले आहेत, आणि हायस्कुलें व मिडल स्कुलें या मधील विद्येची साहित्यसाधनें पुष्कळ वाढविण्यांत येत आहेत. या गोष्टी बरोबरच दुसरा विचार असा काढला आहे कीं रटफ करीत करीत विद्याशिकणारे मंद विद्यार्थी चालू इयत्तेमध्यें नापास झाले कीं त्यास शाळेंतून काढून द्यावे; ह्मणजे मध्यम व उच्च विद्यादानाला अपात्र असे विद्यार्थी शाळांतून आपोआपच कमी होतील. गरीब विद्यार्थी तरतरीत व तेज बुद्धीचे असतील तर त्यांस शिष्यवृत्ती देऊन त्यांची विद्या संपूर्ण करावी. श्रीमान लोकांनीं आपापल्या दगड मुलांच्या इयत्ता दोन दोन किंवा तीन तीन वर्षांनीं खानगी शिक्षणानें पुऱ्या कराव्या. पण त्यांच्या साठीं सार्वजनिक द्रव्याचा व्यय होऊं द्यावयाचा नाहीं.

हा नवा प्रयोग तत्वशः फार चांगला आहे. आणि आपले विचार अगदीं मोकळ्या मनानें व्यक्त केल्याबद्दल आह्मी राजश्री क्रॅडाक यांचे आभारी आहों. त्यांचें छिंदवाडा येथील संभाषण वरील विचाराचें पूर्ण द्योतक आहे. पुष्कदां ज्या अडचणी येतात त्या नव्या प्रयोगाच्या अंमलबजावणी संबंधानें येत असतात तेव्हां या बाबतींत योग्य दक्षता घेण्यांत येईल असा आह्मांस भरंवसा आहे.

## दसरा.

पुण्य दिवस हा दसरा अपुल्या भाग्यानें
लाधला। करूं या उत्सव आजी भला।
पाउस गेला अंबर निर्मल सारे घन लोपले
रवीचें तेज कसें फाकलें।
सुखावतारा नद्या जाहल्या झाली विमळें जलें
प्रमोदें दिङ्मंडल कोंदलें।
पीता शाली लवली भारें कदली वातें डुले
विकसलीं जिकडे तिकडे फुलें।
ज्वारीचें तें कणिस लोंबे शेंडी हळुहळु झुले
स्थिरतर नयन तिथें लोभले।
वन देवी दे किरिट तरुना सुवर्ण रजतीं खुले
लाभले कांहीं ललितें दलें।
फल भारानें विनम्र तरु हे आश्रय विहगा भले
तयामधिं लपती कीटक कुलें।
अवि कीटक हे गाती प्रेमें एक स्वर जाहला
करूं या उत्सव० ॥ १ ॥
प्रेमें सकलहि मिळूनि जाऊं सीमोल्लंघन करूं।
बरवी वाट गडे हो धरूं ॥
वनांत शोधुनि काढूं शमीला भावानें आदरूं।
यथोचित पूजेला उद्धरूं ॥
प्रार्थूं प्रतिनिधि करुनी तिजला--
लडिवाळें उपसरूं।
सुकरुणा वरुणालय सद्गुरू ॥
पापा शमवूं आयु वाढवूं धर्मी चिरमति ठरूं।
चिरंतन शांति सुखा स्वीकरूं ॥
काली वर्षुनि कृषीवलाचे श्रम सारे अपहरूं।
धनानें कोठारें विभु भरूं ॥
पुष्ट तुष्ट जन अर्जुनसा मग विजयाशेला वरूं।
उद्यमा उत्साहाला धरूं ॥
विजया निघतां दाशरथीला दिधला प्रियकर
गुरु-मंत्र तो निशिदिनि हृदयीं स्फुरू ॥
अशी प्रार्थना करुनि तोडूं या
सोनें ह्मणुनी दलां।
करूं या उत्सव आजी भला ॥ २ ॥

**साक्या.**

सणांत सण हा दसऱ्याचा
केंवा न चले दुसऱ्याचा ॥ ध्रु ॥
सुक्षेत्राची देवी देई वर्षोंवर्षीं धान्यें।
जीवाचें ती रक्षण करिते औदार्यें असमान्यें ॥
कापोसाच्या राशी पिकवी खंडोगणती घवरा।
आनपर्शीता पामुनि रक्षी रक्षी जन लज्जेला ॥
भांडार धन्याचें लुटूं लुटूं जरि भरला माळ अमूप।
निषेध नाहीं कुणास येथें न मनीं वर्ण न रूप॥
वदान्य देवीच्या उपकारा हा शुभ दसरा स्मरवी।
भक्तीं देवीं भाव रक्षितां श्रेयःपंथा सुचवी ॥
हें धन सारें सुवर्ण होई उपलक्षण कीं पर्णें।
परस्परांना सोनें ह्मणुनी देऊं हर्षे पूर्णें ॥
न जोखिजे हें सोनें तूलें मापेना मापांहीं।
शाणाचा कस घेना घे प्रेमाचा परि पाहीं ॥
सोनें देऊनि परस्परांना आलिंगूं बाहूंहीं।
प्रेमाचा हा प्रचार सात्विक लोपेना केव्हांही ॥
प्रिय मी आहे कोणाला तरि काय भाव थोर
क्षणभरि घेई स्वर्गच्छाया मृत्यु लोक संसार ॥

## वऱ्हाडवृत्त.

**हवामानः—** पाऊस अजून पाहिजे आहे आणि पीकाला जोम देणारा असा थोडा बहुत तरी पाऊस येईल असें तज्ज्ञ आकाशांतील चलावेचलांवरून सांगतात. प्लेगाचा रोग इतरत्र देखील कमजोर असून यंदा या शहराला समाधानकारक स्वस्थता मिळेल असा अंदाजा आहे.

**स्वागतम् —** अलिशान नामदार राजश्री क्रॅडाक साहेब हे शनिवारीं मेलगाडीनें आले. ते अशा सोनें लुटण्याच्या सुमुहूर्तावर आमच्यामध्यें आहेत ह्मणून नागरिक लोक त्यांचें अभिनंदन करीत आहेत. या सतकांत सर्व शहर बहुविध कार्यमालांनीं अगदीं गजबजून गेलें आहे.

**फुटबाल--** येथील भाटेक्लब व भुसावळची मंडळी यांच्यामध्यें गेल्या शनिवारीं सामना होऊन त्यांत या खेपेला येथील मंडळीस एका गोलाचा मार मिळाला.

रा० रा० प्लौडन साहेब डिपुटी कमिशनर यांच्या अध्यक्षतेखालीं येथील असिस्टंट सर्जन डाक्टर भणगे यांनी गेल्या गुरुवारीं प्लेगासंबधानें एक उत्कृष्ट सोपपत्तिक व्याख्यान दिलें आणि म्याजिक ल्यांटर्नच्या साह्यानें सर्व गोष्टी सप्रयोग समजावून दिल्या प्लेगाच्या देवी प्रचलित करण्याकडे अशा व्याख्यानानें लोकांचीं मनें लवकरच प्रवृत्त होतील.

सरस्वती महोत्सव– येथील वैदिक, नैय्यायिक व वैय्याकरणी विद्वान मंडळींनीं चालविलेल्या या समारंभाचें विसर्जन आज रात्रौ होईल. विद्यादेवीचे विलास कोणाला रमविणार नाहींत बरें.

रा० रा० रामचंद्र सदाशिव लेले बी. ए. यांस त्यांच्या विद्वत्तेला व कार्यदक्षतेला शोभा आणणारा असा नवीन बढतीचा हुद्दा ह्मणजे असिस्टंट इन्स्पेक्टर, वऱ्हाड शाळाखातें असा मिळाल्याकारणामुळें त्यांच्या उमरावतीच्या डिपुटी इन्स्पेक्टरच्या जागीं रा. रा. कुळकर्णी यांस बुलढाण्याहून बदलले, बुलढाण्यास येथील डिपुटी इन्स्पेक्टर रा. रा. कृष्णराव काळे यांस बदलून येथें रा. रा. जोग डिपुटी इन्स्पेक्टर यांस यवतमाळाहून आणिलें आणि शेवटच्या जागीं रा. रा. सहस्त्रबुद्धे असि. मास्तर हायस्कूल यांस बढती देण्यांत आली.

## Oriental Govrnment security
## LIFE ASSURANCE COMPANY
## Limited

ESTABLISHED IN 1874.
R. Paterson, Brown, Manager,
HEAD OFFICE—BOMBAY

**FUNDS Excede 3 3/4 crores**

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES
IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connectio with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under th policy be paid to the Claimants at the earliest possible date. This t- Directors of the 'Oriental' keep well before them and act to treating thei clients with the utmost liberality.

UNQUESTIONBALE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a give sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securitie and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms o the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through deceas of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, at onc create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which his danger is got over. Life being so uncertain, the sooner a man maket up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has left the family withou athe intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For term please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained ons Picationpl t—

M. DESOUZA.
CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

---

## Notice.

Notice under section 44 of the Berar Municipal Law of 1886

The Municipal Committee of Khamgaon have at their Special Meeting held on the 28*th*. August 1911 passed a resolution proposing the imposition of tax under section 41 (I) (A) (b) as set forth below:-

Any inhabitant objecting to the proposal should submit his objection in writing, within 30 days from the publication of this notice.

1 Class of persons or description of property to be taxed:-

Every person who practises within the limits of the Khamgaon Municipal Committee, the trade of ginning cotton and pressing the same into btales by means of steam or mechanical process shall be assessable to this atx.

2 nd Amount or rate of tax.

The tax shall be levied at the following rates:-

| | Rs. | As. | Pics |
|---|---|---|---|
| Per every boja of 10 Maunds ginned | 0 | 0 | 8 |
| Per every bale of 14 Maunds pressed | 0 | 0 | 10 |

3 rd. System of assessment.

(1) The tax shall be assessed in the first place by a Sub—Committee appointed for the purpose subject to the sanction of the General Committee.

(2) When the list of assessment is ready, a notice by tom—tom shall be given to the public and the list shall be open to every one for inspection at the Municipal office.

(3) Objections *to* the assessment shall be received and considered by ho Sub-Committee aforesaid if presented in writing within one month from the publication of the list of assessment.

(4) The tax shall be payable in one instalment on the 1 st. August every year.

(5) The tax will be collected through the managers of the factories when the bojas are ginned and bales are pressed.

K. S. Jatar
Chairman
Municipal Committee
Khamgaon.


सुधासिंधु सुधासिंधु

सुख संचारक कंपनी मथुरा यांची तयार केलेलीं व सरकारांतून रजिस्टर झाललीं औषधें, जीं वीस वर्षापासून लोकांत अनुभविलीं आहेत.

**सुधासिंधु**

हें कफ, खोकला, दमा, थंडीचा ताप, पटकी, शूळ, संग्रहणी, अतिसार, पोटांत दुखणें, वांत्या, मळमळणें, हात पाय व कंबर दुखणें, मुलांचे हिरवे पिवळे जुलाब, डांग्या खोकला, दूध ओकून टाकणें इत्यादींवर स्वादिष्ट व सुवासिक औषध आहे. किंमत प्रत्येक बाटलीस ०८ आणे.

**दद्रुगज केसरी**

गजकरणास समूळ नाहींसें करणारें हेंच फक्त एक पवित्र औषध आहे. कांहीं सुद्धां जळण अथवा आग होत नाहीं. यासच जर दारू अथवा लिंबाचे अर्कांत मिळविलें तर २ बाटल्या अर्क तयार होतो. किंमत प्रत्येक बाटलीस ०४ आणे १२ बाटल्या एकदम मागविल्यानें त्यांस एजंट समजून नोटिशी, हँडबिलें वगैरे फुकट पाठविलीं जातात, व कमिशनही दिलें जातें. चालू सालचें पंचांगही फुकट मिळतें.

मागविण्याचा पत्ताः—
पंडित क्षेत्रपाल शर्मामालक,
१९९ सुख संचारक कंपनी, मथुरा.

ॐ नमः श्रीगणेशाय.

**आर्यवनौषधालय——मुर्डी.**

अती उंचि सर्वोत्कृष्ट

**सुंगधी अत्तरांच्या पेट्या.**

आमचा सुगंधी अत्तराचा कारखाना सुरू होऊन आज बहुत वर्षे झालीं आहेत. आमचे कारखान्यांत तयार झालेला माल किती उत्तम, खात्रीचा व टिकाऊ असतो, याचा अनुभव लक्षावधि ग्राहकांला आलेला आहे. ह्मणून आमचे मालाची थोरवी विशेष वर्णनानें खुलवून सांगितली पाहिजे असें नाहीं. प्रथम अत्तरांचे पेट्यांची सर्वांस उपयुक्त अशी रचना करून पेट्या उत्तम सागाचे लांकडाच्या मजबूत बनवून वर उत्तम पालीशही केलेलें आहे. यामुळें पेटी फारच मनोहर बनली आहे. अशा पेटींत निरनिराळे जातींच्या उत्तम अत्तरांनीं भरलेल्या कुप्या (बाटल्या) ३, ऊंची बेलियाची बाटली एक, आणि सुगंधी उटणें, लालभडक गंधाचे रवे, व स्त्रिया करितां लालभडक सुगंधी कुंकू डबी एक, असे सुगंधी दहा पदार्थ ठेविले आहेत. यंदाचे पेट्यांत अशी जरी विशेष सुधारणा केली आहे तथापि पेटीची किंमत न वाढवितां ती फारच अल्प पोष्ट खर्चासह दोन रुपये आठ आणेच ठेविली आहे. या पेट्या एकदम ६ घेणारांस एक पेटी व एकदम १० पेट्या घेणारांस दोन पेट्या बक्षिसादाखल फुकट देऊं. करितां अशा या उपयुक्त वस्तुंचा अवश्य संग्रह करावा अशी विनंती आहे. रोखीनें किंवा व्हि. पी. नें पाठवूं खालील पत्त्यावर बिनचूक पत्र पाठवावें. अशा अल्पमोल पेटीचा लाभ आमचे सर्व ग्राहक मनःपूर्वक घेतील व आपल्या इष्टमित्रा कडून घेववून आमच्या स्वदेशी धंदास हस्ते परहस्ते मदत करतील अशी पूर्ण उमेद आहे.

**तारुण्यविलासिनी बादशाही अत्तरें.**

सुरंगी नं० १ ची उत्तम. .... तोळ्यास ४ रु.
मालती .... .... .... .... .... .... .... .... .... ३ रु.
पुष्पराज .... .... .... .... .... .... .... .... .... ३ रु.

हीं अत्तरें किती उत्तम असतात याचा सर्वांस अनुभव आहेच. हीं अत्तरें आह्मी मुद्दाम उत्तम तयार करून शक्य तितकी कमी किंमत ठेविली आहे.

## उत्तम सगंधी अत्तर वगैरे.

गुलाब, हिना, केवडा, अंबर, मोतिया, वगैरे अत्तरें १॥ रु. तोळा देऊं

## जीवनपुरी तैलें.

बेलिया, चमेली, हिना, मसाला, वगैरे तैलें. दर ८ तोळ्यांस १ रु.

## विशेष सूचना.

दिपवाळी नजीक आल्यामुळें आपल्यास लागणारा सुगंधी माल अगाऊ मी गणें चांगलें, करितां जरूर पत्र पाठवावें. सर्व माल व्ही. पी. नें पाठवूं. ग्राहकांनीं लागेल तो माल मागवावा उत्तम पाठवूं. तेलें व अर्क यांचा शेर ८० रुपये भर आहे. घाऊक माल घेणारांस भरपूर कमिशन देऊं. व्ही. पी. नें पाठवूं.

पत्ता:---मु. मुर्डी पो. हर्णै. जि. रत्नागिरी. } कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

नं. ४१२



श्री राधावल्लभाजयाति

## वर्षफल।

हमारे पास सिर्फ १ पोस्टकार्ड पर किसी फल या फूल का नाम लिख भेजो हम आप के एक वर्ष का सुख, दुःख लोभ, हानि, जीवन, मरण, रोग, सन्तान, तरक्की, मौकूफी, व्यापार में किस वस्तु स लाभ होगा दिसावरी काम में कैसा लाभ होगा और जो महीना हानिकारक उस का उपाय महीनेवार वर्षफल वी० पी० द्वारा २। रुपये में भेज देंगे. हमारे हांय जन्म पत्रादि उत्तमोत्तम बनते हैं अनेक प्रशंसा पत्र मौजूद हैं, विशेष परिचय के अर्थ ॥ आना का टिकट भेज कर सूचीपत्र मंगो लीजीये.

मिलने का पत्ता:—

गोस्वामी राधामोहन शर्म्मा

चित्तीखाना आगरा.


## नोटीस

चिरंजीव रा० रा० दीपचंद नारायण बाघ राहणार बोराळेखुर्द तालुका जळगांव जिल्हा बुलडाणा.

खालीं सही करणार नोटीस देते कीं तूं माझा मुलगा असून तूं सध्यां सज्ञान झाला आहेस. व तुझे ताब्यांत माझे नवऱ्याची सर्व जिनगी आहे. परंतु त्या जिनगीची अलीकडे तूं अफरातफर करून गहाण खरेदी बक्षीस वगैरे देत आहेस, असें माझे कानावर आलें आहे. ही जिनगी तूं स्वतः मिळविलेली नसून माझे नवऱ्यानें मिळविली आहे. ती अफरातफर करण्याचा मी जिवंत आहे तोपर्यंत तुला अधिकार नाहीं. आजपर्यंत तुला मी पुष्कळ उपदश केला परंतु तूं ताळ्यावर येत नाहींस. म्हणून तुला ही नोटीस देणें भाग झालें आहे. तरी आजपर्यंत तूं माझे नवऱ्याचे इस्टेटीसंबंधानें जो गहाण खरेदी किंवा बक्षिसाचा व्यवहार केला असशील तो मला कबूल नसून तो रद्द आहे असें समजावें व या पुढें कोणत्याही मनुष्याशीं तूं जिनगीचा किंवा पैशाचा व्यवहार करूं नयेस केल्यास मी किंवा माझे नवऱ्याची जिनगी जबाबदार रहाणार नाहीं कळावें तारिख २९-९-१९११

सही

अहिल्याबाई मर्द नारायण पाटील राहणार बोराळेखुर्द तालुका जळगांव जिल्हा बुलडाणा.

नो. नं. ४२३

## जाहिर नोटीस

मौजे बोराळेखुर्द तालुका जळगांव जिल्हा बुलडाणा येथील व इतर गांवचे तमाम लोकांस खालीं सही करणार जाहीर नोटीस देते कीं माझा मुलगा दिपचंद नारायण बाघ राहणार बोराळेखुर्द हा वाईट चालीचा निघाला असून माझे नवऱ्याची स्वतःची मिळविलेली मिळकत, (शेते मौजे बोराळेखुर्द येथील स० नं० ३९-४०-३८-१८ पैकीं ११ पैकीं व पांढरी, मळा या शिवाय बोराळेबुद्रुक येथील बेलदाराचा मळा व आंब्यांचे बाबरापैकीं हिस्सा व बोराळेखुर्द येथील २८ खांबाची बैठक ३० खांबाचा कोठा, १८ खांबाचे ज्यांत मुक्ताई रहातें तें घर, ३२ खांबाचा चौक, या शिवाय ओसरी, म्हशी बांधावयाची जागा व इतर पडित जागा,) ही सर्व जिनगी तो अफरातफर करित आहे व त्यानें आजपर्यंत अशी अफरातफर केलेली आहे असें माझे कानावर आलें आहे. ते सर्व व्यवहार गहाण खोदी किंवा बक्षीस भाडेपट्टा वगैरे रद्द आहेत असें समजावें व याशीं कोणी पैशाचाही व्यवहार करूं नये केल्यास त्याबद्दल वडिलोपार्जित जिनगी जबाबदार रहाणार नाहीं म्हणून नोटीस दिली आहे. तारिख २९-९-१९११

सही

अहिल्याबाई मर्द नारायण पाटील राहणार बोराळेखुर्द तालुका जळगांव जिल्हा बुलडाणा

नो. नं. ४२४

## नोटीस

विद्यमान सब जज्ज साहेब बहादूर अकोला यांचे कोर्ट.

किरकोळ मुकदमा नंबर २९ सन १९११ सक्सेशन सर्टिफिकेट मिळविण्याचा अर्ज.

रामरतन मांगीलाल मारवाडी हल्लीं रा० बुसरवाडी ता० आकोला अर्जदार.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं, अर्जदार यानें सक्सेशन सर्टिफिकेट मिळविण्याबद्दल दिलेला अर्ज आमचे कोर्टांत ता० १६-१०-१९११ इ० रोजीं नामला आहे त्या तारखेस ज्यांची कांहीं तक्रार असेल त्यानें सकाळीं १० वाजतां आमचे कोर्टांत हाजर व्हावें. तसें न केल्यास पुढें कोणत्याच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. कळावें. ता० २१-९-१९११ इ.

R. V. Alre.

सब जज्ज

नो. नं. ४२५ आकोला.

## नोटीस

विद्यमान सबजज्ज साहेब बहादूर आकोले यांचे कोर्टांत.

सक्सेशन मोकद्दमा नंबर २० सन १९११ सक्सेशन सर्टिफिकेट मिळविण्याचा अर्ज

अर्जदार

श्रीकृष्ण नरहर पाटील १, दामोधर नरहर पाटील २, शंकर नरहर पाटील ३, पैकीं २।३ अज्ञान पालन करणार इष्ट मित्र सखाभाऊ श्रीकृष्ण नरहर राहणार पातुर ता० बाळापूर.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें का अर्जदार यानें सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याबद्दल दिलेला अर्ज आमचे कोर्टांत ता० १६-१०-१९११ इ० रोजीं नेमिला आहे या तारखेस ज्यांची कांहीं तक्रार असेल यानें सकाळीं १० वाजतां आमचे कोर्टांत हाजर व्हावें. तसें न केल्यास पुढें कोण त्याच प्रकारची तक्रार ऐकिली जाणार नाहीं. कळावें. ता० २१-९-११ इ०

R. V. Alre.

सब जज्ज

नो. नं. ४२६ अकोला.

## नोटीस

बेशमी कोंडाजी वा॥ महादु बंजारी अडनाव सानप रा० पायडली ता० अकोट यांस—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझे लग्न तुमच्याशीं होऊन आजमास १४।१५ वर्षे झालीं. व मजला पदर येऊन अजमास ४ वर्षे झालीं मी अज्ञान असतांच अजमास वय १० झाली तुह्मी दुसरी पाटाची बायको केली. तिच्यापासून तुह्मास संततीही आहे. माझे आईबापानीं व पंचानीं अजमास ६ माहिने झाले मजला तुमचे घरीं आणून घातले परंतु तुह्मी मजला लागलींच माझे आईबापांचे घरीं परत लाविले. याचे पूर्वीही मी तुमचे घरीं आली होती परंतु तुह्मी बागविले नाहीं. तुमचे मनांत मजला वागविण्याचे असते तर तुह्मी दुसरी बायको मुळींच केली नसती. यांजकरितां ही नोटीस पावल्यापासून ४ दिवसाचे आंत मजला फारकती द्यावी तसें न केल्यास हीच फारकत समजून दुसरा घरठाव करीन मग तुमचा नवरेपणाचा हक्क मुळींच राहणार नाहीं. तुह्मी मजला न वागविल्यामुळें व परत लावल्यामुळें दरमहा रुपये पांचप्रमाणें तीन वर्षाची खावटी रुपये १८० माझे बापानें कर्ज काढून माझें पोषण केले ती रक्कम ही सदर्हु मुदतीचे आंत आह्मास देऊन आमची पावती घ्यावी तसें न केल्यास कोर्टाचे व या नोटीशीचे खर्चासुद्धां सदर्हु रक्कम तुमचेपासून भरून घेणें भाग पडेल कळावें ता० २८-९-१९११

सही

जनी मर्द कोंडाजी इचे हातची नि० बांगडी

द० विष्णू प्रभुराम पेनशनर आकोला

नो. नं. ४२७

## नोटीस

नोटीस बेशमी दत्तु वलद भगवान गवळी पाटील राहणार लोणी गवळी ता० मेहेकर जि० बुल्ढाणें यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मी तुमची लग्नाची बायको असून मजला तुह्मी सन १९०० सालीं ह्मणजे काळांत माझे बापाचे घरीं आणून घातलेत. आणखी माझे बापानीं व चार पंचानीं तुमचे घरीं मला आणून घातले. परंतु तुह्मी मजला माझे बापाचे घरीं पुनः आणून घातले. व माझा बाप मला वागवित नाहीं सबब मी लोकांचें कर्ज काढून खात आहे तरी तुह्मी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत झालेला खर्च रुपये ६६० मुद्दल व व्याज ६६० मिळून रुपये १३२० देऊन मला घेऊन जावें. मी येण्यास तयार आहे. तसें न केल्यास ही नोटीस फारकती समजून मी दुसरा घरठाव करीन मग माझेवर आपला कोणतेही प्रकारचा हक्क चालणार नाहीं ही नोटीस दिली कळावें ता० २७-९-११ इ. सही

आनाई मर्द दत्तु पाटील गवळी राहणार उटी नीशाणी बांगडी

नो. नं. ४२८

## जाहिर नोटीस

सर्व शेटसावकार लोकांस खालीं सही करणार यांजकडून जाहिर करण्यांत येतें कीं माझा धाकटा मुलगा रामू उर्फ सिताराम वलद गणपत नारखेड राहणार मौजे नांदरा खुर्द तालुके मलकापूर हा गैरचालीचा निघाल्यावरून त्याला मी घरांतून घालवून दिले आहे तर त्याजला माझे नांवावर व त्याचे नांवावर कोणी कर्ज देऊं नये व गहाण खरेदीची देवघेव करूं नये केल्यास त्याबद्दल मी कोणतेही प्रकारे जबाबदार नसून त्यांनीं केलेली देवघेव मजला कबूल नाहीं. ती सर्व रद्द असे कळावें. तारीख २७-९-१९११ इसवी

सही

गणपती इसनाजी नारखडे राहणार नांदरा द० खु०

नो. नं. ४२९

## नोटीस

तुकाराम वा॥ लक्षमण ठाकरे रा० धानोरी प्र० अमडापूर ता० चीखली

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यात येते कीं मी तुमची गयर्वाची बायको असून तुह्मी मजला नांदवित नाहीं मी दोन तीन वेळां मी होऊन तुमचे घरीं आले असता तुह्मी मजला घरांत येऊं दिले नाहीं तरी या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं नोटीस पावल्या दिवसा पासून आठ दिवसाचें आंत मजला नादविण्यास न्यावे तसें न केल्यास मी हीच फारकती समजून मी नवीन घरठाव करीन. मग मात्र तुमचा नवरेपणाचा हक्क चालणार नाहीं. तारिख २१-९-११ सही

सीता मर्द तुकाराम रा० गणपुर ता० मेहकर द० खु०

नो० नं० ४३०

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Registered No N. 4

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४५ ] आकोला—सोमवार तारीख ९ माहे आक्टोबर सन १९११ ई० [ अंक ३९

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
र्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्य नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुप याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक, G. A. Phillips.
आकोला ९।९।०९ एजंट
नं १

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६$\frac{२}{३}$ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक G. A. Phillips.
आकोला २१.९.१० एजंट.
नो० नं० २

## चांदीचीं भांडीं.

### खरें सचोटीचें दुकान.

आमचे दुकानीं शुद्ध चिनई चांदीचीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं विक्रीस तयार असतात. माल काळजीपूर्वक

वक्तशीर व्ही. पी. नें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल जोखिमदार राहूं. एकवार अनुभव घ्यावा.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन.
३३१ आदितवारपेठ, नाशिक

## किर्लोस्कर बंधूंनीं केलेलीं शेतकीचीं आउतें वगैरे.

१ कडबा कापण्याचें नंबर "ब" यंत्र—यानें कडबा कापून घातल्यास गुराचे पोट भरून निमा कडबा वाचतो. किं० रु० १०-९-०

२ **लोखंडी नांगर** नं १२ हा नांगर दोन बैलांनीं चालतो. माळ जमीन, मळीची जमीन, व भुईमुगाच्या शेंगा काढण्या करितां याचा फारच उपयोग होतो किं. रु० १०-९-०

३ **लोखंडी मोठें नांगर** हे नांगर सहा पासून आठ बैलानीं चालतात. विशेष करून काळ्या जमीनीकरतां याचा फार उपयोग होतो. किं० रु० ३८-०-०

४ **आंबोळयाचे तवे नंबर "ब"** हे तवे बिडाचे केलेले असून यावर एका बाजूस आंबोळ्या व दुसरे बाजूस पुरणाच्या पोळ्याकरितां येतांत यांचा व्यास ११ इंच असून वजन अजमासे चार पक्के शेर आहे हा तवा बायकांना फारच आवडला आहे. किं० रु० १-४-०

किर्लोस्कर बंधु
पोष्ट किर्लोस्करवाडी
[स. औंध, जिल्हा सातारा.]
नो० नं० ३९६

श्री राधावल्लभाजयाति

## वर्षफल।

हमारे पास सिर्फ १ पोस्टकार्ड पर किसी फल वा फूल का नाम लिख भेजो हम आपके एक वर्ष का सुख, दुःख लोभ, हानि, जीवन, मरण, रोग, सन्तान, तरक्की, मौकूफी, व्यापार में किस वस्तु स लाभ होगा दिसावरी काम में कैसा लाभ होगा और जो महीना हानिकारक उस का उपाय महीनेवार वर्षफल वी० पी० द्वारा २। रुपये में भेज देंगे. हमारे हांय जन्म पत्रादि उत्तमोत्तम बनते हैं अनेक प्रशंसा पत्र मौजूद हैं, विशेष परिचय के अर्थ ०॥ आना का टिकट भेज कर सूचीपत्र मंगो लीजीये.

मिलने का पत्ताः—
गोस्वामी राधामोहन शर्म्मा
चित्तीखाना आगरा.

## जाहिर नोटीस

सर्वत्र साहू व शेट सावकार यांसः—

खालीं सही करणार याजकडून कळवि-ण्यांत येतें कीं माझी आई मंजाई मर्द रामजी टिकार राहणार टेंभुरणें ता० खामगांव जि० बुलढाणें हिचे नांवानें मी माझी स्थावर जंगम जिन्नगी सावकाराचें भयानें पोकळ खरेदी दिलेली आहे. हल्लीं माझी आई सदर्हू जिनगीची अफरातफर करण्याच्या विचारांत आहे तरी तिच्याशीं सदर्हू जिन्नगीबद्दल कोणीही गहाण, खरेदी, फरोक्त वगैरे व्यवहार करूं नये केल्यास तो रद्द समजला जाईल. कळावें. ता० ३ १०-११ इ०

सही
उकर्डा व० रामजी टिकर राहणार
टेंभुरणेंकर द० खु०
नो० नं० ४३६

## नोटीस

नोटीस बेशमी— मंजाई मर्द रामजी टिकार कुणबी राहणार मौजे टेंभुरणें ता० खामगांव हिसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, मजला सावकाराचें कर्ज वगैरे झाल्यामुळें माझे मालकीची स्थावर जंगम इस्टेट खालींलिहिल्या प्रमाणें तूं माझी प्रत्यक्ष आई असल्या कारणानें मी तुजला पोकळ खरेदी दिली होती त्यास अजमासें आठ नऊ महिने झाले. हल्लीं तुझी जिनगीची अफरातफर करण्याच्या विचारांत आहां असें मला समजलें आहे. तरी मी पोकळ खरेदी करून दिलेली जिनगी मजला परत द्यावी व माझे सर्व जिनसा जंगम माल खालीं लिहिल्या प्रमाणें आहे तो ही मजला परत द्यावा सावकाराचें देणें देण्यास मी तयार आहे. जंगम मालाचें वर्णन.

सोन्याचे दागिने कडे एक १ वजन तोळे १२ अजमासे, १ मुद्द एक वजन तोळे २ अजमासें, ५ पुतळ्या व पदक तोळे १॥। अजमासे, १ वज्रटीक तोळा १। अजमासे, १ नथ सरजाची तोळा १ एक अजमासें. एकंदर ९ जिनस.

चांदीचे दागिनें एक तोड्याचा जोड तोळे ११५ अजमासे, कडे एक तोळे २० अजमासे, गोफ दोन, तोळे २२ अजमासे, दंडांतील कडे दोन, तोळे २० अजमासे, करदोडा १ एक, तोळे ४५ अजमासे, एकंदर ७ जिनस.

कपडे वगैरे एक जरीचा दुपटा किंमत रुपये ४०, १ कोट लाल मखमालीचा किंमत रुपये १५. धोतरजोडा रेशमी १ एक किंमत रुपये ३०. १ शालू लाल रेशमी किंमत रुपये २०. १ लुगडे गर्भरेशमी उदी रंगाचें किंमत रुपये ४०. १ पितांबर लाल येवली किंमत रु० ५०. चोळ्या जरीच्या रेशमी ८ किंमत रु० १५.

बैल तीन वर्णन खालील प्रमाणें
दोन बैलांचा रंग लाल किंमत रु० ७५.
एक ढवळा रंगाचा किंमत रु० २५.

सदर्हू प्रमाणें माल ही नोटीस पावतांच माझे ताब्यांत द्यावा न दिल्यास कोर्ट मार्फत योग्य तजवीज केली जाईल व ह्या नोटिशीच्या खर्चासुद्धां सर्व खर्च आपल्या कडून भरून घेतला जाईल ही नोटीस दिली. ता० ३ १०-११ इ०

सही
उकर्डा वल्द रामजी टिकर राहणार
टेंभुरणेंकर द० खु०
नो० नं० ४३७

## नोटीस

रा० रा० मदन गोपाळ सेवाराम मारवाडी रा० तेल्हारा यांसः—

नोटीस देणार रामधन गोवरधन मारवाडी रा० तेल्हारा तर्फे वकील के. ई. संजाना रा० आकोला याजकडून नोटीस देण्यांत येते कीः—

सेवाराम मदन गोपाळ दुकान शेगांव दुकानचे मार्फत ता० १३ १४ माहे डिसेंबर सन १९१० चे सुमारास सरकी खंडी २०० दोनशे दर खंडीस १५॥।= पंधरा रुपये चौदा आणे प्रमाणें तुमचे अडतींत आमचे पक्षकार रामधन गोवरधन यांनीं खरेदी केली. सदर्हू सरकीची रकम आमचे पक्षकार यांनीं तुह्मास रुपये ३००० तीन हजार ता० २३-१२-१९१० रोजीं हुंडीच्या रूपानें दिली. त्या नंतर आमचे पक्षकार यांनीं तुह्मास ता० २६-९-१९११ रोजीं शेगांव मुक्कामीं सदर्हू सरकी मागितली असतां तुह्मी सरकी देण्याचें नाकारिलें सबब तुह्मास या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्या पासून ४ चार दिवसांत आमचे पक्षकाराची सरकी आमचे पक्षकारास मोजून द्यावी. सदर्हू मुदतींत तुह्मी सरकी आमचे पक्षकारास न दिल्यास आमचे पक्षकारांचें जें नुकसान होईल तें तुह्मापासून भरून घेतलें जाईल सबब तुह्मास नोटिशीनें कळविलें आहे. कळावें. ता० २९-९-१९११ इसवी.

दस्तुर— भिकाजी कृष्णाजी चितळे
राहणार आकोला.
सही (इंग्रजींत)
के. ई. संजाना.,
नो० नं० ४३८

# वर्तमानसार.

इटलीची राजधानी रोम येथें सरकारी रिनामा निघून, शुक्रवार ता. २९ सप- ा दिवशीं दुपारचे २-३० वाज- ासून तुर्कस्थान व इटली ह्या राष्ट्रां- युद्धस्थिति उत्पन्न झाली आहे व ालीचा सर्व किनारा वेढण्यांत येणार हे, असें जाहीर करण्यांत आलें. तुर्क- नच्या सैन्यांत कामांवर असलेल्या लीयन अंमलदारांस परत बोलावण्यांत लें आहे. तुर्कस्तानाच्या मुख्य आरमारच्या क्षिततेस धोका येण्याची भीति पडल्यामुळें बीरतहून डार्डानेल्सकडे जाण्याकरितां ालें होतें. इटालीयन आरमारास चुकवि- ाकरितां त्यास प्रदक्षिणा घालून आपण रमारासह सुरक्षित डार्डानेल्स येथें चलों असें तुर्की आरमाराच्या कमांडरनें ळविलें आहे. इटलींत सरकारी रीतीनें सिद्ध करण्यांत आलें आहे कीं, दोन टालियन डिस्ट्रॉयर बोटींनीं शनिवारीं काळीं प्रेवेझजवळ तुर्कांच्या दोन टॉर्पेडो ाटी बुडविल्या. तुर्कांची एक नौका व ६७ लष्करी लोक असलेली एक आग- ाट त्यावरील युद्धसामुग्रीसह इटालियन ाकांनीं काबीज केली. इटालियन लोकांच्या ाळयांच्या भाडिमारांत टर्कीश कप्तान गोळी ागून ठार झाला व आठ खलाशी बुडाले. ुरुवारची रात्र त्रिपोलींतील लोकांनीं ागरणांत काढली. इटालियन व इतर इटालियन परकी लोक वकिलातींत जमले. मुसलमान लोक मसिदींतून प्रार्थना करीत होते. ग्रीसच्या थेसालीवरही तुर्कांची करडी नजर फिरेल अशी स्थिति होती; परंतु इतर राष्ट्रांचें अनीतीचें धोरण स्वीकारणें हें तुर्कस्तानचें ब्रीद नाहीं असें लंडनमधील तुर्क वकीलमंडळानें जाहीर केलें आहे. एका इटालियन डिस्ट्रॉयर बोटीनें एका अंमलदाराच्या हातांत पांढरें निशाण देऊन त्यास त्रिपोलीच्या किनाऱ्यावर उतरविलें. त्रिपोलींतील किल्ले स्वाधीन करण्याविषयीं त्यानें मागणी केली, तुर्कांच्या कमांड- रनें असें करण्याचें नाकारिलें. त्रिपोलीवर स्वारी करण्याकरितां पाय- दळाच्या आठ पलटणी, बर्साग्लिएरीची एक पलटण व जलदीनें अचूक गोळ्या झाडणाऱ्या लोकांची एक पलटण असें एकंदर २५००० पायदळाची फौज, घोडेस्वार, तोफखाना, इंजिनीयर वगैरे मिळून ?००००० फौज—ह्याप्रमाणें सैन्य इटलीनें सिद्ध केलें आहे. जन- रल गानेव्हा यांच्याकडे सेनानायकत्व देण्यांत आलें आहे.

इटलीच्या आरमारानें व सैनिकांनीं त्रि- पोली वेढलें असल्यामुळें तेथील हकीकत तूर्त समजत नाहीं. त्रिपोलीचे सर्व भाग व्यापून टाकल्यावर तहाचें बोलणें सुरू करण्याची इटलीची तयारी आहे!!!- असें ह्मणतात. आल्बेनियाच्या किनाऱ्यावर इटलीची गडबड सुरू झाल्यामुळें ऑस्ट्रियन वर्तमान- पत्रें चिडलीं आहेत. इटलीनें आल्बेनियन किनाऱ्यावरील आपल्या हालचाली बंद कराव्या असें त्यांचें बजावून सांगणें आहे.

ता० १४ आक्टोबर रोजीं तुर्कस्थानचें पार्लमेंट उघडण्याचें ठरलें आहे. इटलीच्या दुराग्रहामुळें उत्पन्न झालेल्या ह्या प्रकरणांत मध्यस्थी करून घोर युद्धाचा प्रसंग टाळावा अशा तुर्कस्थाननें तिसऱ्यांदा केलेल्या विनंतीस पोकळ आशीर्वादापलीकडे परराष्ट्रांकडून दुसरा कांहीं मान मिळत नाहीं. कारण इटलीनें परराष्ट्रांचे अगाऊ अभिप्राय घेऊन आपला मार्ग निःष्कंटक केला आहे; त्यामुळें परराष्ट्रांना आतां इटलीस प्रतिबंध करितां येत नाहीं. तेव्हां आतां त्रिपोलींत व इतर बंदरांत काय प्रकार घडतात तेवढेंच पाहण्याचें राहिलें आहे.

त्रिपोलीवर चाल करून जाणारें इटलीचें सैन्य लौकरच जहाजांतून त्रिपोलीकडे जाण्याकरितां निघणार आहे. इटलींत वर्तमानपत्रांच्या मजकुरांवर अधिकाऱ्यांची सक्त देखरेख असल्यामुळें कसल्याही बातम्या बाहेर येत नाहींत. एवढें खरें कीं, त्रिपोलींतील तुर्कांचे किल्ले व फौज शरण आल्या खेरीज किंवा तोफांच्या भडिमारानें त्यांचा शक्तिपात केल्या- खेरीज. इटलीच्या सैन्याला त्रिपोलीच्या किना- ऱ्यावर उतरणें शक्य नाहीं. त्रिपोलींत अरब लोकच प्रतिकारार्थ पुढें येतील असा संभव दिसतो. रक्तपात होऊं नये अशी इटा- लियन लोकांची मनापासून इच्छा आहे!!! व ते त्रिपोलीच्या ताब्याकरितां २५ लक्ष पौंड तुर्कस्थानला देण्यास तयार आहेत!

तांबडा समुद्र, डार्डानेल्स वगैरे ठिकाणीं, युद्धप्रवृत्त पक्षांनीं समुद्रावरील दिवे मालवून टाकिले असल्यामुळें काळा समुद्र, हिंदुस्थान व आस्ट्रेलिया ह्यांतील ब्रिटिश व्यापारास धक्का पोंचण्याची भीति आहे ह्या गोष्टीकडे ब्रिटिश व्यापाऱ्यांनीं सरकारचें लक्ष्य वळविलें आहे.

### युद्ध रंगास येत चाललें!

ताज्या तारेवरून समजतें कीं, इटली व तुर्कस्तान यांच्यामधील युद्ध आतां कांहीं रंगास येत चाललें आहे. डार्डानेल्स सामुद्रधुनीच्या उत्तरेकडे तोफांची सरबत्ती झडत आहे. त्रिपोलीच्या किल्यांवर इटालियन लढाउ जहाजांनीं पुनः भडीमार सुरू केला आहे. तुर्कांनीं किल्ले सोडून दिले असून ते आतां त्रिपोलीच्या अन्तःप्रदेशांतील टेंकड्या व्यापून त्यांची तटबंदी करीत आहेत. डर्ना व बेंगाझी ह्या ठिकाणांवर तोफांचा भडिमार करण्याचा इटालियन आरमारास व सैनिकांस हुकूम झाला आहे. युद्धास सर्वतोपरी अनकूल असलेले सोशियालिस्ट डेप्युटी डी फेलिस हे इटलियन आरमारानें त्रिपोलिवर केलेल्या भाडिमाराचें वर्णन करितांना ह्मणतात कीं इटालियन लढाऊ जहाजें बंदोबस्तानें युद्धाच्या तहकुबीचीं निशाणें घेऊन त्रिपोलीभोंवती फिरलीं; उद्देश हा कीं, तुर्कांनी शरण यावें, परंतु तो उद्देश सिद्धीस न जातां तुर्कांनीं आपल्या तोफा डागल्या.

कैद केलेले ५०० तुर्क लोक इटलींत नेण्यांत आले आहेत. त्रिपोलीवर चाल करून जाणाऱ्या इटालियन सैन्याचा पहिला भाग २०००० चा आहे सैन्य निघण्यास सिद्ध आहे; परंतु समुद्रांत तुर्कांच्या टार्पेडो बोटी दिसून आल्याची बातमी इटलीस कुणा ीं कळविल्यामुळें सैन्याचें निघणें कांहीं वेळ तहकूब ठेवण्यांत आलें आहे.

समुद्रांत इतस्ततः संचार करणाऱ्या तुर्कांच्या टार्पेडो बोटींच्या पाठीमागें इटालियन लढाऊ जहाजें लागलीं; परंतु टार्पेडो बोटींनीं ह्या जहाजांस चुकाविलें. एका आठवड्यांत त्रिपोलिच्या किनाऱ्यावर ४०००० सैन्य उतरविण्याचा इटलीचा संकल्प आहे.

तुर्कस्तानही हार खाणार नसून निर्धारानें आपल्या शौर्याची कमाल करणार आहे असें एका बातमीवरून समजतें.

ह्या युद्धामुळें बादशहांचें हिंदुस्थानांत येणें रहित होईल काय?

अशी शंका उद्भवली असून "इंग्लिशमन" पत्र ह्मणतें कीं, "युरोपांतील सद्यःस्थितिकड पाहतां तसें झाल्यास आश्चर्य नाहीं वेळ निघून जात चालला आहे व ह्यासंबंधांत अधिकारयुक्त बातमी प्रसिद्ध झाल्यास ठीक होईल

एका इटालियन लढाऊ जहाजानें तांबड्या समुद्रांत दोन बोटी बुडविल्या. सदरहू इटालियन जहाज नंतर एका डिस्ट्रॉयरच्या पाठीमागें लागेल. परंतु डिस्ट्रॉयर सुटून गेली.

प्रिव्हेझा बंदर आमच्या हवाली करा; नाहीं तर शहरावर तोफांचा भडिमार करूं असें स्पॅनिश आरमारी अधिकारी डगर्डा अब्रुझी यांनीं कळविलें आहे. सोमवार दुपारपर्यंत तुर्कांच्या कमांडरला विचार करविचार करण्यासाठीं आपण फुरसत दिल्याचें आडमिरल फाराबेल्ली यांनीं कळविल्यासंबंधी बातमी रोम राजधानींतील वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाली आहे. तुर्कस्तानाला मात्र भरपूर सल्ला देण्यांत परराष्ट्रें एकमेकांवर ताण करित आहे. आद्रिया, रशिया वगैरे राष्ट्रांचे वकील ग्रॅंड वजिरांच्या मुलाखती घेत आहेत भूमध्य समुद्रांततून निष्कंटक मार्ग होईपर्यंत त्रिपोलीवर स्वारी करण्याकरिता पात्र झालेले सैन्य थांबणार आहे.

तुर्कस्तानचें आरमार कोठें आहे ? तुर्कस्तानचें सर्व आरमार डार्डानेल्स येथें असल्याच्या बातमीवर इटलीच्या आरमारी अधिकाऱ्यांचा विश्वास नसून तें निळनिराळ्या ठिकाणीं फांकलें असावें असा त्यांचा समज आहे. त्रिपोलीजवळ तुर्कांची लढाऊ जहाजें येऊं नयेत ह्मणून ग्रीसपासून तें आफ्रिकेच्या किनाऱ्यापर्यंत इटलीनें आपलीं जहाजें अंतराअंतरावर उभीं केलीं आहेत गनिमी काव्याचें युद्ध सुरू होईल असा संभव दिसत आहे. तुर्कस्तानांतील मार्गील राज्यक्रांतीचे पुढारी एनव्हर हे जमिनीच्या मार्गानें ईजिप्तवरून त्रिपोलींत जाऊन गनिमी काव्याच्या युद्धास लोकांना प्रवृत्त करणार आहेत.

---

वऱ्हाडसमाचार

आश्विन वद्य १ शके १८३३ दुंदुभिनामसंवत्सरे

## विमा कंपन्यां विषयींचें बिल.

व्हाईसराय साहेबांच्या वरिष्ठ कायदेकौन्सिलाच्या गेल्या बैठकीचे वेळीं विमा कंपन्यासंबंधाचें एक व प्राव्हिडेंट सोसायट्यासंबंधाचें एक अशीं दोन महत्वाचीं बिलें सादर करण्यांत आलीं. आपले पश्चात् आपल्या बायकामुलांच्या पोटापाण्याची तजविज करून ठेवणें हें कर्तव्य प्रत्येक सुशिक्षितास—विशेषतः दरिद्री स्थितींतल्या माणसास—कळत असतें. घरदार, शेतीवाडी, व्यापार, वगैरे उत्पन्नाच्या बाबी ज्यांना वंशपरंपरेनें अनुकूळ असतील अशांची गोष्ट निराळी. अशांनाही भाऊबंदांत इस्टेट विभागली जाण्याची किंवा वाटणीसाठीं आणिलेल्या दाव्याचा दिवाणी कोर्टमार्फत निकाल लागे तोपर्यंत व वकिलांची फी स्टांप, प्रोसेसफी, अपिलाचा खर्च वगैरे तोपस्कार करतां करतां बाकी इस्टेट मुलांसाठीं शिल्लक राहील किंवा नाहीं याची काळजी असतेच. पण ज्यांना विभागण्याला इस्टेटच नाहीं, कुटुंबाचा कर्तासवरता मनुष्य गमावला कीं कुटुंबांची स्थिति ऊर्ध्वाये दिशे ब्रह्मणेनमः अशी व्हावयाची अशांना आपल्यामागें बायकामुलांचा निर्वाह कसा चालेल, मुलींचीं लग्नें कशीं होतील, किंवा मुलाचें शिक्षण कसें होईल अशी विवंचना लागलेली असते. सरकारी नोकरासाठीं फ्यामिली पेन- शन फंडाची तरी कांहीं व्यवस्था असते. या फंडांत दरमहा कांहीं ठराविक लहानशी रक्कम टाकीत गेले ह्मणजे त्या माणसाच्या पश्चात् कांहीं ठराविक पेनशन सरकारमार्फत मुलाबाळांना पोचती होते. ही सरकारी नोकरांची व्यवस्था झाली. याच नमुन्यावर इतरांचीही सोय करणाऱ्या सोसायट्या अलीकडे हिंदुस्थानांत बऱ्याच झाल्या आहेत. पण या सोसायट्यांपैकीं थोड्यांच्याच जवळ या कामाला अवश्य लागणारें भांडवल किंवा धंद्याचें ज्ञान असल्यामुळें या संस्था पावसाळ्यांतल्या बांडगुळाप्रमाणें निर्माण होतात, कांहीं काळपर्यंत भपकेदार जाहिराती देऊन गरीब कारकुन व नोकर यांच्यापासून त्यांनीं निढळाच्या घामानें मिळविलेला पैसा काढतात, आणि दिवाळें काढून किंवा परागंदा होऊन गरिबांना धायाधाया रडण्याला लावतात. अशीं उदाहरणें पुष्कळ घडलीं आहेत. या संस्थावर सरकारची योग्य नजर राखणें हा या बिलाचा उद्देश आहे. या नव्या बिलानें असें ठरविण्यांत येणार आहे कीं अशा संस्था सरकारांत नोंदविल्या पाहिजेत व त्यांच्या कामकाजाची हकीकत गुप्त न ठेवतां जाहिर केली पाहिजे. ज्या संस्था हिशेब वगैरे ठेवण्यांत किंवा अन्य तऱ्हेनें लबाडी किंवा फसवणूक करतांना आढळतील त्या ताबडतोब बंद करण्याचा अधिकार प्रांतिक सरकारास देण्यांत येणार आहे.

हें प्राव्हिडेंट सोसायट्यांसंबंधानें झालें. याहून थोड्या निराळ्या उद्देशानें मनुष्याच्या आयुष्याचा विमा उतरणाऱ्या कंपन्याही आपल्या देशांत आहेत. यांतल्या ठळक व श्रीमंत कंपन्या बहुतेक युरोपियन किंवा अमेरिकन आहेत, व कांहीं थोड्याशा स्वदेशी आहेत. या कंपन्याचें काम किफायतशीर रीतीनें चालण्याला बरेंच शास्त्रीय ज्ञान लागतें. पण हें शास्त्रीय ज्ञान मिळविलेलीं माणसें पदरीं ठेवण्यांस खर्च फार येतो, आणि त्यामुळें विमा उतरण्याबद्दलचे फीचे दर कमी ठेवण्यांतच एक प्रकारची स्पर्धा कंपन्या कंपन्यांत लागून त्यामुळें विमा उतरणाऱ्या कंपनीच्या शाश्वतीविषयीं बेभरंवसा उत्पन्न होतो. हा प्रसंग टाळण्याकरितां सरकारनें एक ३८ कलमांचें नवें बिल कौन्सिलपुढें आणिलें आहे. हें बिल विलायतेंतल्या कंपन्याविषयींचा जो कायदा तिकडे अमलांत आहे त्याचीच बहुतेक नक्कल आहे. फरक केला आहे तो फक्त दोन तीन गोष्टींत आहे. त्या गोष्टी ह्या:— १ हें बिल फक्त आयुष्याचा विमा उतरणाऱ्या कंपन्यापुरतेंच आहे. २ कंपनी नादार झाली आहे असें दिसतांच ती बंद करण्यासाठीं कोर्टाला अर्ज करण्याचा अधिकार सरकारचे हातीं ठेवला आहे. ३ कंपन्यांचे हिशोब तपासण्यासाठीं एखादा लायक अधिकारी नेमण्याचा अधिकार सरकारचा आहे. विलायतेंत या शेवटल्या दोन गोष्टी लोक किंवा कंपनीचे अधिकारी यांच्या मर्जीवर सोपविण्यांत आल्या आहेत. तसें इकडे केलें नाहीं. याचें कारण अशा कंपन्या चालविण्याचें सामर्थ्य आह्मा लोकांचे अंगीं अद्याप आलें नाहीं हें होय. ही सगळी ठीक व्यवस्था आहे. पण या कंपन्याजवळून एक लक्ष रुपयांची रक्कम जामिनादाखल ठेवण्याचें जें कलम आहे. तें मात्र पुष्कळ छोट्या छोट्या कंपन्यांना जड जाणार आहे. सरकारानें न्यूयार्क ला. इं. कंपनीसारख्या कोट्याधीश कंपनीपासून एक लक्षाचा जामीन घ्यावयाचा आणि एखाद्या तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणीं स्थापन होणाऱ्या भिकार कंपनीपासूनही तितकीच जामीनकी मागावयाची हा सबघोडे बारा टक्क्यांचा प्रकार पुष्कळांना संमत होईल असें आह्मांस वाटत नाहीं. यापेक्षां प्रत्येक कंपनीनें आपल्या शिरावर घेतलेली जोखीम, तिचे भांडवल, रिझर्वफंड, वगैरे गोष्टी ध्यानांत घेऊन तिच्या ऐपतीप्रमाणें प्रत्येक कंपनीची जामिनकीची रक्कम निरनिराळी ठरवावयास पाहिजे होती असें आह्मांस वाटतें. त्याचप्रमाणें एखादी कंपनी बंद करण्याविषयींचा अर्ज सरकारनें कोर्टाला केल्यावर त्या विषयीं कंपनीच्या व्यवस्थापकांचें ह्मणणें ऐकून घेतल्याशिवाय निकाल देऊं नये अशी ही कांहीं तजविज या बिलांत होणार आहे. बाकीचीं सगळीं कलमें सरकारनें सद्बेतूनें प्रेरित होऊनच लोकांच्या हितासाठीं घातलीं आहेत व त्यांच्यासंबंधानें कोणाकडून हरकत येईल असें आह्मांस वाटत नाहीं.

## सरकारनें काय केलें आहे?

गेल्या दहा वर्षांचे अवधींत हिंदुस्थानांतल्या कांहीं भागांतून प्लेग व मलेरिया यांनीं सत्यानास करून सोडला आहे. संयुक्त प्रांतांत मागल्या दहा वर्षांपेक्षां गेल्या दहा वर्षांत मलेरिया व ताप यांनीं झालेल्या मृत्यूंची संख्या १९ लक्षांनीं वाढली! ! व प्लेगनें तेरा लक्ष प्राणांचे बळी घेतले! पंजाबांत गेल्या दहा वर्षांत नुसत्या प्लेगनें वीस लक्ष प्राणांचा संहार केला. ही अत्यंत शोचनीय हानी चालली असतां ती टाळण्याचे उपाय योजण्यांत हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकार यांनीं आपली शिकस्त केली. निरनिराळ्या प्रांतांचें आरोग्य सुधारण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें दरसाल ३० लक्ष रुपयांची मदत दिली. मलेरिया नाहींसा करण्यासाठीं आणखी ९७ लक्ष रु० दिले. मलेरियाचा बंदोबस्त करण्याचे कामीं शिक्षण मिळालेले अधिकारी तयार करण्याची शाळा अमृतसर येथें काढण्यांत आली. मलेरिया हा मच्छरांच्या द्वारें पसरत जातो अशी कल्पना बसविणारे सर डोनाल्ड रॉस यांच्याकडे सरकारनें मलेरियासंबंधांच अधिक शोध लावण्याचें काम सोपविलें. याशिवाय हिंदुस्थानच्याच नव्हे तर सामान्यतः सगळ्या जगाच्या हिताची अशी एक गोष्ट हिंदुस्थानसरकारनें केली. ती गोष्ट ह्मणजे सिंकोना वनस्पतीची लागवड करून तिच्यापासून क्विनीन काढण्याचा कारखाना ही होय. या कारखान्यामुळें क्विनीन हें औषध अगदीं गरिबांनासुद्धां सुलभ झालें आहे. ज्याप्रमाणें मलेरियाच्या उत्पत्तीचा त्याचप्रमाणें प्लेगच्या ही उत्पत्तीचा शोध सरकारच्या परेळ येथील रसायन शाळेवरील अधिकाऱ्यांनीं लाविला आहे. आणि प्लेगची लस टोंचून घेण्याचा उपाय लोकांना समजावून देण्याचे आणि प्लेगपासून होणारी हानि टाळण्याचे शक्य तेवढे उपाय आजपर्यंत सरकारनें केले आहेत.

## आतां लोकांनीं काय करावें?

पहिली गोष्ट ह्मणजे ही कीं लोकांचे जीव वाचविण्याच्या या परोपकाराच्या व पुण्य कृत्यांत लोकांनीं सर्वतोपरी सरकारास साह्य करावें हें त्यांचें कर्तव्य आहे. आमच्या लोकांच्या अंगीं जडलेल्या कित्येक संवयी आरोग्य रक्षणाला अत्यंत प्रतिकूळ आहेत. आह्मी लोक गरीबीमुळें निष्कारण पुष्कळसा केरकचरा व अडगळ घरांत जमा करून ठेवतो. जुनीं मडकीं, केरोसिनचे निकामे डबे, व दुसऱ्या शेकडों सटरफटर जिनसा घरांतून काढून घर स्वच्छ ठेवावयास आह्मी शिकलें पाहिजे. त्याचप्रमाणें घरापाशीं घाणेरड्या पाण्याचीं डबकीं सांचलेलीं असतात तीं माती टाकून बुजविलीं पाहिजेत. प्लेगच्या दिवसांत तरी निदान उंदरांना खाण्याजोगे पदार्थ अगदीं बंद करून ठेविले पाहिजेत. उंदरांची उपासमार झाली ह्मणजे ते घर सोडून जातील व त्यामुळें त्यांच्या द्वारानें जें प्लेगचें विष घरांत यावयाचें तें येणार नाहीं. केरकचरा, सडकेपदार्थ, चिंध्या वगैरे जाळून टाकाव्या. अशा रीतीनें प्रत्येकानें स्वतः जपून वागावें, व आपल्याहून कमी शिक्षणाच्या माणसांस या गोष्टी समजावून देऊन तसें वागण्यास लावावें यांप्रमाणें हरएक कामांत सरकारच्या व्यवस्थेस लोकांकडून साह्य मिळत गेलें तर हिंदुस्थानच्या आरोग्याचा प्रश्न आज जितका बिकट वाटत आहे, तितका बिकट तो पुढें राहणार नाहीं.

## यंदाची कांग्रेस.

येत्या दिसेंबरांत कलकत्ता येथें भरणाऱ्या कांग्रेसच्या तयारीविषयीं आतांपर्यंत कोठें कांहीं बातमी ऐकूं येत नव्हती, आणि आतां ज्या बातम्या येत आहेत त्या अशुभ आहेत! प्रथम मि० रामसे म्याकडोनल्ड यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारण्याचें कबूल करून मागाहून खाजगी कारणामुळें यांनीं तो मान नाकारला. एका दृष्टीनें यंदाच्या राष्ट्रीय सभेला हा मोठा धक्काच ह्मटला पाहिजे कारण कीं यंदाची कलकत्त्याची कांग्रेस ही लहानशा प्रमाणावर सुरतची कांग्रेसच होणार आहे अशीं अशुभ चिन्हें दिसूं लागलीं आहेत. कांग्रेसची नवी रचना ज्या उत्कृष्ट तत्त्वांवर झाली आहे तीं तत्त्वें ज्यांना मान्य नाहींत अशांनीं कांग्रेसचा खेळ खंडोबा करण्याचें मनांत आणिलेलें दिसत आहे. गेल्या दोनतीन वर्षांत राजकीय परिस्थितीनें शिकविलेला खडतर धडा जहाल मंडळी इतकी लवकर विसरेल असें वाटलें नव्हतें. पण फरीदपूरच्या कान्फरन्ससाठीं जमलेल्या जहालकंपूच्या गोटांत कांहीं तरी गुप्त मसलत होऊन यंदाची कांग्रेस सुरळीत पणें पार पडूं द्यावयाची नाहीं, जरूर पडल्यास नेमस्त कांग्रेसच्या छातीवर दुसरी जहाल कांग्रेस भरवून हिंदुस्थानच्या राजधानीच्या शहरांत जहालांच्या संयुक्त अकलेचें प्रदर्शन करावयाचें असा विचार ठरलेला दिसतो. पुण्याच्या जहाल पत्रानें लढाईचें शिंग अगोदर फुकून ठेवलेंच आहे, आणि गेल्या आठवड्यांत कलकत्याहून ज्या बातम्या आल्या आहेत त्याही कलकत्याच्या पुढारी मंडळीच्या शहाणपणाला किंवा कर्तृत्वशक्तीला मोठ्या भूषणावह आहेत असें ह्मणतां येत नाहीं. अशा आणिबाणीच्या प्रसंगीं एखादा खंबीर इंग्रज मुत्सद्दी कांग्रेसच्या अध्यक्षाचे जागीं बसण्यास मिळाला असतां तर त्यानें जहालपक्षाचें चांगलें कर्णोत्पाटन करून त्याला ताळ्यावर आणण्याचा यत्न केला असता. निदान प्रवेशपत्रिकवर सही करून कांग्रेस मध्यें आल्यावर दंगा करण्याची जी प्रवृत्ति कित्येक जहालांच्या ठायीं दिसत आहे तिचा स्पष्ट निषेध करून बेडखोरपणाच्या प्रवृत्तीला वर मान काढतां येऊं नये अशी खबरदारी ठेविली असती. मि० रामसे म्याकडोनल्ड सारखा खंबीर इंग्रज मुत्सद्दी यंदाच्या राष्ट्रीयसभेला न लाभल्याबद्दल आह्मांस वाईट वाटतें तें यासाठींच. हें काम नेमस्त पक्षांतल्या एखाद्या पुढाऱ्यालाही करतां येईल. पण घरच्या माणसापेक्षां सोनारानें कान टोंचलेले बरे.

## तीन शिंप्यांची गोष्ट.

एका इंग्रजी कादंबरींत टुलीस्ट्रीट मधल्या तीन शिंप्यांची गोष्ट आहे. सगळ्या इंग्रजी राज्याचे आधार स्तंभ आपण असें या तिघांना वाटत होतें. ना० मि० बसु यांच्या विशिष्ट विवाहसुधारणेच्या बिलानें हिंदुधर्म रसातळाला जाऊं पाहत आहे, आणि या बिलाला पुष्टी देणारे यच्चावत् विद्वान् हिंदुधर्मा विरुद्ध बंडखोर बनले आहेत, अशावेळीं त्या धर्माला आधार जर कोणाचा असेल तर तो त्या बिलाला निषेध करणाऱ्या आपल्या तिघांचा आहे असें समजणारे तिघे (पाध्ये, खरे आणि भाजेकर) मुंबईंत निघाले आहेत! मुंबईस फ्रामजीकावसजी हाल मध्यें बिलाला पुष्टी देण्यासाठीं जमलेले शेकडो जगद्विख्यात् विद्वान् आणि कायदेपंडित यांना धर्मशास्त्र व कायदा दोन्ही कळलीं नाहींत. तें अपूर्व अंतर्ज्ञान परमेश्वरानें या तिघा लाडक्या पुत्रानाच दिलें आहे असें ते स्वतः समजत आहेत. दुःखाची गोष्ट ही आहे कीं बाकीचें जग अद्याप तसें समजूं लागलें नाहीं.

## सौ. लेडी चंदावरकर

ना० मि० बसु यांचे बिल पास झालें तर त्याच्यायोगानें आमच्या समाजावर नसलेलें एक नवें संकट—काडी मोडण्याची सुलभता—येऊं पाहणार आहे असा एक आक्षेप वर सांगितलेल्या त्रयीनें बिलाविरुद्ध आणिला आहे. सौ० लेडी चंदावरकर यांनीं या आक्षेपास समर्पक उत्तर दिलें आहे. स्त्री वर्गाच्या एका पुढारिण बाईकडून हें उत्तर आलें असल्यामुळें त्याचें महत्व विशेष आहे. त्या ह्मणाल्या:— -या बिलानें बायकांना हवें त्यावेळीं काडी मोडून मागतां येईल असें सांगण्यांत यतें. तें खरें आहे असें धरून चाललें तरी त्यांत काय वावगें होणार आहे? बायकांना खुशाल टाकून देण्याचा आपला पुरुषांना हक्क आहे तो उद्यां बायकाही पटकावतील अशी भिती पुरुषांना येऊन पडली आहे हा या आक्षेपाचा स्पष्ट अर्थ आहे. या संबंधात पुरुषांच्या बरोबरीनें बायकांना हक्क प्राप्त झाला तर पुरुषांच्या स्वच्छंदी वर्तनावर एक प्रकारचा इष्ट दाब राहील यांत वावगें काय आहे? सौ० लेडी चंदावरकर यांच्या या उत्तरांत निःसंशय पुष्कळ अर्थ आहे. मात्र तो मुंबईच्या खरे, पाध्ये, भाजेकर आणि कं.स कळेल तर कांहीं उपयोग!

## ख्रिस्तीधर्माचा प्रसार

गेल्या दहा वर्षांत संयुक्त प्रांतांत व पंजाबांत ख्रिस्ती धर्मीयांची वाढ अनुक्रमें शेंकडा ७९ व ३०० याप्रमाणानें झाली आहे असें नुकतेंच कोठें वाचण्यांत आलें! आणि आश्चर्य हें कीं एकंदर लोकसंख्येची वाढ न होतां उलट ती कमी झाली असतां ख्रिस्ती धर्मीयांतच ही वाढ अशा विलक्षण रीतीनें दृष्टोत्पत्तीस येत अ[illegible] इतर प्रांतांची लोकसंख्या धर्मवारीनें काईनें तपासून पाहिली तर हाच तेथेंही नजरेस येईल असें असें कसें घडलें याविषयीं आश्चर्य वाटतें. पण खरे कांहींच नाहीं. ख्रिस्ती लोकांपैकीं शेंकडा लोक आहेत. हे हिंदुधर्मी— स्पर्शास्पर्शाच्या

परके झाले आहेत. अशी वस्तुस्थिती असतां अजून आमचा सनातन धर्म आपलें ठाणें कायम धरून बसला आहे, तो मेरूसारखा अचल आहे— अक्षय्य आहे— असें समजणाऱ्या व भासविणाऱ्या माणसाचें समाधान कशानें ही होणें शक्य नाहीं हें उघड आहे.

## उपासाचें महात्म्य.

सध्यां देशांत जिकडे तिकडे दुष्काळ पडण्याचीं चिन्हें दिसत आहेत. ह्मणून उपोसाचें महात्म्य आह्मीः वर्णीत आहों असें नाहीं तर खरोखरच आरोग्याच्या दृष्टीनें उपासाचा विचार केला व अनुभव घेतला तर त्यापासून घडणारे सुपरिणाम दृष्टोत्पत्तीस आल्यावांचून राहणार नाहींत. वर्षांतून पांच पन्नास उपासाचे दिवस सांगितले नाहींत असा पृथ्वीच्या पाठीवर एकही धर्म नाहीं. जैन व हिंदुधर्म यांत तर उपासाची उपयुक्तता फार मोठी सांगितली आहे. मुसलमानी धर्मांतही उपासाचे ठरलेले दिवस आहेत व त्या दिवसांत प्रत्येक श्रद्धाळु मुसलमानानें उपास केलाच पाहिजे अशी सक्ती आहे. आतां कित्येक अमेरिकन शास्त्रज्ञांचें लक्ष इकडे लागलें आहे. मि० कार्नेजी यांच्या शास्त्रीय इन्स्टिटयूटमध्यें प्रयोग करून पाहिल्यावरून उपासाची उपयुक्तता निश्चित झाली आहे. डा० गुएल्या नांवाच्या फ्रेंच डाक्तरानें यां बद्दलचे प्रयोग करून पाहून आपला अभिप्राय जाहिर केला आहे. मनुष्यजातीला होणारे पुष्कळसे रोग योग्य तऱ्हेनें व योग्य मुदतीपर्यंत केलेल्या उपासानें बरे करतां येतात यांविषयीं पुष्कळ विद्वान डाक्तरांचें एक मत आहे. डा० आरनॉल्ड, सिंक्लेअर हे आतां या विषयाच्यामागें सारखे लागले आहेत पाश्चात्य शास्त्रज्ञ याप्रमाणें आमच्या इकडच्या एका धार्मिक गोष्टीचा [illegible]रीक छडा लावण्यांत गुंतले असतां आ[illegible]च्यांतले सुशीक्षित नुसती जुन्याचालींची टर उडविण्यांत बहादुरी मानीत आहेत!

## ही पत्नी कीं संकट?

परमेश्वरानें अमेरिकेंतल्या लोकांना सधन [illegible]रून डॉलर नांवाचा एक प्रतिईश्वरच [illegible]र्माण कां केला तें कळत नाहीं. मनुष्य[illegible]भावांतली काळीकुट बाजू जगाच्या दृष्टीनाला आणणें हातर त्याचा हेतु नसेलना? [illegible]का अमेरिकन बाईला दरमहा तीन हजार [illegible]ये खर्चण्यास पुरत नाहींत ह्मणून ती [illegible]र्टाच्या पायऱ्याचढून नवऱ्यावर फिर्याद [illegible]मास गेल्याची बातमी आली आहे! [illegible]रिकन स्त्रियांची छाती देवानें दगडाची [illegible] केली नसेलना? बिचारीची मागणी [illegible]हीं फार नाहीं. तिळ पोषाखासाठीं दरमहा [illegible] ६० पौंड ह्मणजे ९०० रुपयांची [illegible]णूक पाहिजे आहे, मोटारगाडी साठीं [illegible]हा ५९ पौंड, नोकराचा करांचा पगार [illegible] पौंड, शिंप्याचें बिल ७० पौंड, हिंडणें [illegible]णें मौजा पाहणें यासाठीं फक्त २२ [illegible] खाणेंपिणें वगैरेचा खर्च निराळा. [illegible]र्मकरण्याला बाई साहेबांचा हात कधीं [illegible]मा नसतो, तरी पण त्यासाठीं ३ पौंड [illegible]हे यादींत घालून ठेवले बरे. याप्रमाणें दरमहा सारी तीन चारशें पौंडांची मागणी बाईनें केली. कोर्टाला ही तिची [illegible] पाहून तिची कींव आली, आणि तिला दरमहा ५०० पौंडांची नेमणूक करून देण्याचा कोर्टानें तिच्या पतीवर हुकुमनामा सोडला. हिंदुस्थानच्या बायका भोळ्याभाबड्या, त्यांना दरमहा पंचवीस रुपये दिले तरी इतके कशांत खर्च करूं असा प्रश्न त्यांना पेऊन पडेल. अमेरिकन बायांचें अनुकरण करणाऱ्या बाया हिंदुस्थानांत निघाल्या तर त्या पारशांत निघतील. उठा, पिरोजा, दिनबाई, आईमायी, माणकबाई, उठा, वासकुटाच्या, पोलक्याच्या वगैरे शिलाईचें बिल, नाटकांच्या तिकिटांचा खर्च, माथेरानच्या थंडगार हवे प्रीत्यर्थ हॉटलचें बिल, फयन्सी फेटमध्यें झालेला खर्च, जुगारींत उडविलेले पैसे सर्वांची एक यादी कोर्टापुढें टाका. वर्षाचे कांहीं दोन आण्यांचा केलेला दानधर्म यादींत घालण्यास विसरू नका. आणि मग पहा, तुह्मालाही कोर्ट नवऱ्याच्या मिळकतींतून दरमहा हजार पांचशें रुपयांची नेमणूक करून देतें कीं नाहीं? असा हुकुमनामा मिळविण्यासाठीं दावा आणणाऱ्या बायकांना पत्नी ह्मणावें कीं संकट ह्मणावें येवढाच काय तो नवऱ्याला प्रश्न राहील. पण तो विचार त्याचा आहे. तुमचा नाहीं.

## पतपेढी.

आकोले जिल्ह्यांतील सहकारी पतपेढ्यांस जरूर लागेल तसें कर्ज त्या त्या पतपेढीची ऐपत व पत पाहून दरसाल दरशेकडा नऊ रुपये व्याजानें सेंट्रल अर्बन बँक अकोला देण्यास तयार आहे. तिजकडे त्या त्या सहकारी पतपेढीनें कर्ज काढण्याच्या बाबतींत साधारण सभेनें जो सामान्य ठराव केला असेल, व पंचांनीं जो ठराव केला असेल त्यांची नक्कल सरपंचांच्या सही निशीं पाठवावी. साधारण सभेचा ठराव दरवर्षास होतो, तो लागलीच पाठवावा; त्यावरून प्रत्येक सभासदाची पत व एकंदर कर्जाची मर्यादा कळून येईल. या ठरावाच्या नक्कलेबरोबर पेढीस किती कर्ज पाहिजे आहे, याचा अर्ज असावा. त्यांत कर्ज किती हप्त्यांनीं- किती रकमांनीं व कोणत्याकोणत्या तारखेस फेडण्याचें सहकारी पतपेढी कबूल करिते याचा खुलासा असावा. हा अर्ज तहशिलदार सबडिव्हिजनल आफिसर इनचार्ज पतपेढ्या यांच्या मार्फत यावा. त्यावर ते अंमलदार अर्जांत दिलेली माहिती खरी आहे अशी खातरी करून घेऊन योग्य वाटेल ती शिफारस करितील. ती शिफारस पाहून व दुसरी कांहीं जरुरीची माहिती पाहिजे असल्यास ती मागवून घेऊन सेंट्रल बांकेचे कार्यकारी मंडळ कर्ज किती द्यावें— त्याची फेड कशी कशी करून घ्यावी. याबद्दल ठराव करितील. व तो ठराव सदर्हु पतपेढीस कळवितील. त्या ठरावास अनुसरून पुढील व्यवस्था होईल. ह्मणजे सदर्हु सहकारी पतपेढीनें अध्यक्ष व सेक्रेटरी यांच्या सहीनिशीं कर्जरोखा ठरलेल्या अटीवर लिहून दिला पाहिजे. तो नमुन्या बरहुकूम असावा—ह्मणजे सेंट्रल बांकेंतून त्यांस स्वतः किंवा मे. तहशिलदारांच्या मार्फत रकम पोहोंचती केली जाईल. सदर्हु रोख्यांत ठरलेल्या [illegible]प्रमाणें [illegible]ची फेड होत गेली, ह्मणजे [illegible] पेढीची पत वाढेल. ही वाढावयाला दुसरी दोन कारणें आहेत. सहकारी पतपेढीचा रिझर्व फंड हळूहळू वाढत जाईल व पेढीची प्रवेश फी ही नवीन इसम सामील केल्यामुळें वाढत जाईल.

## सरकारी देणगी

आमच्या नगरीची मोठी उणीव ह्मटली ह्मणजे पाण्याची कमताई ही होय. हल्लीं ही उणीव दूर करण्यासाठीं सर्व बाजूंनीं प्रयत्न चालूं आहेत. आमचे लोकप्रिय डिपुटी कमिशनर राजश्री फ्रैडनसाहेब यांनीं हा प्रश्न पक्केपणीं हातीं घतला आहे आणि लवकरच सुयश येईल असा रंग दिसतो. रा. रा. स्लाय साहेब हे या बाबदींत फार अनुकूळ आहेत या संबंधाची विशेष हालचाल गेल्या बुधवारीं सकाळीं मुनसिपल हालमध्यें झाली. खुद्द चीफ कमिशनर राजश्री क्राडॉक यांनीं मुनसिपालिटीच्या उत्पन्नाच्या व खर्चाच्या बाबी चौकस दृष्टीनें पाहिल्या आणि सध्याचें सालीना ८४ हजारांचें उत्पन्न वाढविण्याविषयीं कांहीं सूचना केल्या व भंगीपट्टी दुप्पट करण्याची थोडी सक्ती केली. त्यांनीं राजश्री डुबे एक्झिक्युटीव इंजिनिअर यांच्यापाशीं कापशीच्या तलावावरील नवीन व्हावयाच्या कामासंबंधानें चौकशी केली आणि पूर्ण शहानिशा झाल्यानंतर पाण्याच्या कामानिमित्त जो खर्च येईल त्यापैकीं निम्मी रक्कम देणगी ह्मणून स्थानिक सरकार देतील असें व्हाइस चेअरमन रा० रा० महाजनी यांच्या तोंडून सर्व सभासदांस आनंदानें कळविलें. ही देणगी आह्मी आभारपूर्वक स्वीकारतो आणि पाणी विपूल आणण्याचा कारखाना लवकरच सुरू होईल असा आह्मांस भरंवसा आहे. राजश्री क्राडॉक यांच्या भेटीचा हा पहिला मोठा लाभ होय. निम्मी रक्कम सरकारांतून मिळाली ह्मणजे बाकीची निम्मी रक्कम वर्गणी व कर्ज यांच्या द्वारें उभी करण्याचा विचार पूर्वींपासूनच कृतींत ये[illegible] पहात आहे.

## दसरा.

विशीष्ट कार्या उमजावें जिवें निशिदिनि ।
तें ध्यावें ॥ ध्रु ॥ ३ ॥
अक्कलकोटा जाऊं आतां पाहूं दुर्गा देवी ।
महिषासुरमथिनी कार्या अवताराच्या सुचवी ॥
असुरें त्रस्ता भीता उर्वी सोडविली देवीनें ।
तें बल, तेंचि प्रज्ञा समजा, आर्त भीति विलयाःते ॥
देवीनें जो असुर मारिला त्याच्या नांवावरुनी ॥
महिष वधाची रूढि घातली अवनीवरी मुढांनीं ॥
देवी करुणा गाढा कोठें कोठें क्रौर्य विधीचें ।
अनागतांचे छळ कां करितां? घेतां जीव पशूंचे? ॥
पशुवध दर्शन पोषी मानव हृदयीं क्रूरा वृत्ति ।
नरहर ! ही महिष वधाची दुसरी कीं आवृत्ति ।
सोडुनि या हा प्रचार वेडा वाळा नवा शहाणा ।
अज्ञानाचा महिष मातला मारा बांधा हाणा ॥
गांवोगांवी वरोवरीं हा मांडितसे कल्होळ ।
नवल ! वेदना न जाणती ते ज्याचे करितो लोळ ।
जगीव तयाची नागी करणें प्रथम सुलभ उपचार ।
करावयाला सिद्ध होऊं या—सांगू गोष्टी चार ॥
ज्ञानाचा हो प्रचार करण्या बांधू कंकण हातीं ।
हें पुण्याहोवाचन झालें नच सिद्धीला भ्रांति ॥
सर्वांचा अवतार जगीं या विशिष्ट कार्या करितां ।
समजानि घेऊं ध्याऊं निशिदिनि टाकूनि आळस
परता ॥
कार्य लक्षुनी मार्ग चालुंया न थकूं पंथ अव्हाटा ।
स्वबांधवांना सहाय होऊं कशास घालूं फांटा ॥
मी तूं विसरूं कार्यावरती एकदृष्टी ठेवूं ।
जितुकें अपुल्या हातुन होइल तितकें करुनि
दावूं ॥
कार्यसिद्धिचा धन्य दिवस जरि पाहूं ना या
नयनीं ।
"आरंभाला होतों" दइल सुख काय थोडें मनीं ॥
जेथें थकले हस्त आपुले कामा येतिल [illegible] ।
परंपरेनें ईशकृपेनें चाले पवित्र सत्र ॥ ४ ॥

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**— वर्धेच्या पूर्वे कडील भागांत पाऊस झाला आणि आतां पश्चिमेकडील भागांत लवकरच सुरू होईल असा रंग दिसतो. आकाश मलाभ्रांनीं व्याप्त आहे, विजा चमकतात आणि कित्येक स्थळीं तर थोडा पाऊसही झाला. तेव्हां हतीच्या पर्जन्यानें पीकें लवकरच आनंदानें डुलूं लागतील. रोगराई ह्मणण्या सारखी मोठी नाहीं पण हिंवतापाची सांथ जोरावर आहे.

अलिशान नामदार राजश्री क्राडॉक साहेब हे गेल्या गुरुवारीं येथून पचमढीकडे रवाना झाले. साहेब बहादुरांचा मुक्काम ७ दिवस होता. आणि सर्व काल आधिकारी मंडळी, सुखवस्तु प्रतिष्ठित गृहस्थ व दरबारी लोक यांच्या मुलाखती घेण्यांत कुशलप्रश्न विचारण्यांत आणि आबादानीचा सुखसंवाद करण्यांत गेला इतकेंच नाहीं तर राजश्री क्राडॉक यांनीं सार्वजनिक सर्व संस्थांची चांगली माहिती करून घेतली आणि आमच्या दृष्टीनें त्यांचा समागम नागरिक लोकांस विशेष आनंदकारक वाटला.

**पानसुपारी**—येथील वऱ्हाड आईल वर्क्स' या तेलाच्या गिरणीच्या डायरेक्टरांनीं अलिशान चीफ कमिशनर साहेब यांस गेल्या दसऱ्याच्या मुहूर्तावर पानसुपारी दिली. नामदार रावबहादूर मुधोळकर हे मुद्दाम आले होते आणि त्यांनीं आकोल्याची व्यापारवृद्धी वर्णन करितांना राव बहादूर देवराव विनायक यांच्या कारखाने उभारण्याच्या कर्तृत्वाविषयीं व राव बहादूर भागवत यांच्या स्वकीय कार्यबलाविषयीं मोठी तारीफ केली आणि विनयानें आनंदी आनंद करीत करित राजश्री क्राडॉक हे परत डेऱ्यावर गेले.

रा. रा. इ. एम. किरन्यांडर ए. अ. कमि. इलिचपूर हे १६ महिन्यांच्या रजेवर जात आहेत.

वऱ्हाडासाठीं नोंदणी खात्याचे एक जादा इन्स्पेक्टर देण्यांत आल्याकारणानें पश्चिमवऱ्हाड साठीं रा. रा. अहमद हुसेन यांस नेमण्यांत आलें.

जी. आय. पी. कंपनी हल्लींचे उतारूंचे ३ वर्ग मोडून ४ वर्ग करणार आहेत. आणि त्याअन्वयें इंटरमिजिअट वर्गाचे निराळे डबे चालू होतील. मध्यम श्रीमंताला ही गोष्ट सोयीची होईल.

येत्या ३० वे तारखेला डिपार्टमेंटल परीक्षा नागपुरास होतील.

सुख संचारक कंपनी मथुरा यांची तयार केलेलीं व सरकारांतून रजिस्टर झालेलीं औषधें, जीं वीस वर्षांपासून लोकांत अनुभविलीं आहेत.

**सु धा सिं धु**

हें कफ, खोकला, दमा, थंडीचा ताप, पटकी, शूळ, संग्रहणी, अतिसार, पोटांत दुखणें, वांत्या, मळमळणें, हात पाय व कंबर दुखणें, मुलांचे हिरवे पिवळे जुलाब, डांग्या खोकला, दूध ओकून टाकणें इत्यादींवर स्वादिष्ट व सुवासिक औषध आहे. किंमत प्रत्येक बाटलीस ०८ आणे.

**दद्रुगज केसरी**

गजकरणास समूळ नाहींसें करणारें हेंच फक्त एक पवित्र औषध आहे. कांहीं सुद्धां जळण अथवा आग होत नाहीं. यासच जर दारू अथवा लिंबाचे अर्कांत मिळविलें तर २ बाटल्या अर्क तयार होतो. किंमत प्रत्येक बाटलीस ०४ आणे १२ बाटल्या एकदम मागविल्यानें त्यांस एजंट समजून नोटिशी, हँडबिलें वगैरे फुकट पाठविलीं जातात, व कमिशनही दिलें जातें. चालू सालचें पंचांगही फुकट मिळतें.

मागविण्याचा पत्ताः—
पंडित क्षेत्रपाल शर्मामालक,
१९९. सुख संचारक कंपनी, मथुरा.

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधालय--मुर्डी.

अती उंचि सर्वोत्कृष्ट

# सुंगधी अत्तरांच्या पेट्या.

आमचा सुगंधी अत्तराचा कारखाना सुरू होऊन आज बहुत वर्षें झालीं आहेत. आमचे कारखान्यांत तयार झालेला माल किती उत्तम, खात्रीचा व टिकाऊ असतो, याचा अनुभव लक्षावधि ग्राहकांला आलेला आहे. ह्मणून आमचे मालाची थोरवी विशेष वर्णनानें खुलवून सांगितली पाहिजे असें नाहीं. प्रथम अत्तरांचे पेट्यांची सर्वांस उपयुक्त अशी रचना करून पेट्या उत्तम सागाचे लांकडाच्या मजबूत बनवून वर उत्तम पालीशही केलेलें आहे. यामुळें पेटी फारच मनोहर बनली आहे अशा पेटींत निरानिराळे जातींच्या उत्तम अत्तरांनीं भरलेल्या कुप्या (बाटल्या) ऊंची बेलियाची बाटली एक, आणि सुगंधी उटणें, लालभडक गंधाचे रवे, व स्त्रिया करितां लालभडक सुगंधी कुंकू डबी एक, असे सुगंधी दहा पदार्थ ठेविले आहेत. यंदाचे पेट्यांत अशी जरी विशेष सुधारणा केली आहे तथापि पेटीची किंमत न वाढवितां ती फारच अल्प पोष्ट खर्चासह दोन रुपये आठ आणेच ठेविली आहे. या पेट्या एकदम ६ घेणारांस एक पेटी व एकदम १० पेट्या घेणारांस दोन पेट्या बक्षिसादाखल फुकट देऊं. करितां अशा या उपयुक्त वस्तुंचा अवश्य संग्रह करावा अशी विनंती आहे. रोखीनें किंवा व्हि. पी. नें पाठवूं खालील पत्त्यावर बिनचूक पत्र पाठवावें. अशा अल्पमोल पेटीचा लाभ आमचे सर्व ग्राहक मनःपूर्वक घेतील व आपल्या इष्टमित्रा कडून घेववून आमच्या स्वदेशी धंद्यास हस्ते परहस्ते मदत करतील अशी पूर्ण उमेद आहे.

**तारुण्यविलासिनी बादशाही अत्तरें.**

| | |
|---|---|
| सुगंधी नं० १ ची उत्तम. | तोळ्यास ४ रु. |
| मालती .... .... .... .... .... .... .... .... | ३ रु. |
| पुष्पराज .... .... .... .... .... .... .... .... | ३ रु. |

हीं अत्तरें किती उत्तम असतात याचा सर्वांस अनुभव आहेच. हीं अत्तरें आह्मी मुद्दाम उत्तम तयार करून शक्य तितकी कमी किंमत ठेविली आहे.

### उत्तम सुगंधी अत्तरें वगैरे.

गुलाब, हिना, केवडा, अंबर, मोतिया, वगैरे अत्तरें १॥ रु. तोळा देऊं.

### जीवनपुरी तैलें.

बेलिया, चमेली, हिना, मसाला, वगैरे तैलें. दर ८ तोळ्यांस १ रु.

### विशेष सूचना.

दिपवाळी नजीक आल्यामुळें आपल्यास लागणारा सुगंधी माल अगाऊ मागणें चांगलें. करितां जरूर पत्र पाठवावें. सर्व माल व्ही. पी. नें पाठवूं. ग्राहकांनीं लागेल तो माल मागवावा उत्तम पाठवूं. तैलें व अर्क यांचा शेर ८ः रुपये भर आहे. घाऊक माल घेणारांस भरपूर कामिशन देऊं. व्ही. पी. नें पाठवूं.

पत्ताः---मु. मुर्डी पो. हर्णै. जि. रत्नागिरी. — कृष्णशास्त्री पेंडसे. वैद्य.
नो नं१२

Oriental Govrnment security.
# LIFE ASSURANCE COMPANY
## Limited

ESTABLISHED IN 1874.
R. Paterson, Brown, Manager,
HEAD OFFICE—BOMBAY

**FUNDS Excede 3 3/4 crores**

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES
IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connectio with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under th policy be paid to the Claimants at the earliest possible date. This t— Directors of the 'Oriental' 'keep well before them and act to treating thei clients with the utmost liberality.

UNQUESTIONBALE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a give sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securitie and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms o the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through deceas of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, at onc create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may ave money yet, if he dies early before he had time to save much, his JLM and family may be in distress. Life Assurance is a means by which his danger is got over. Life being so uncertain, the sooner a man make up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety o the step, do not delay. There are numerous instances in the records of th Oriental' where the delay of a month or less, has left the family withou athe intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For term please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on pplicationpl to—

M. DESOUZA,
CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

## विलक्षण नयन रुक्कुठार.

**विलक्षण नयन रुक्कुठार** - ह्या अप्रातिम औषधापासून डोळ्याचे साधारण विकार- **खुपऱ्या, लाली, ठणका, पाणी गळणें, कंडू, भूरी, फुल** इ० जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जाग्रणानें, उन्हांत फिरल्यानें अग्नितापानें, उपदंशविकारानें, अतिवाचनानें, कडकीनें इ. अनेक कारणांनीं डोळे बिघडतात ह्यावरही हें अप्रातिम गुणकारी असून लहान मुलांसही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदर औषधाचे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल. बरेच दिवसांचा विकार असल्या तीन कुप्या लागतील; सोबत औषध घाल करितां कांचेची नळी फुकट मिळेल, ए कुपीची किं. १ एक रुपया. तीन कुप एकदम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च मा एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च पडतां दहा रुपयांत मिळतील.

जी. पी. कंपनीचा उत्तम निळिकाळी श ०६ आण्याची घेणारास पुढील सालची डाय बक्षीस मिळेल. आमचेकडे शालोपयोगी मरा व इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारचा स्टेशन माल फारच माफक दरानें मिळेल. विशे माहिती खालील पत्त्यावर,

जी. एन. घारपुरे. पोष्ट- अहि[illegible]

## आर्यवनौषधालय मुर्डी.

व्हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांचेकडील आनररी असिस्टंट सर्जन माजी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोले यांनीं आमचीं औषधें बारिक हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत त्याहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट आह्मास दिलें आहे. हे अवश्य लक्ष ठेवावें.

आमच्या अत्यत खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देऊनही त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

### मदनामृत संजविनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टिक, वीर्यस्तंभक,
कृशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सुवर्ण माक्षीक
मौक्तिक वस्तुगि व अनेक वनस्पती मिश्र

### अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जी धातु ती शुद्ध असेल तरच शरीर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त हातें ती दोषी असेल तर शरीरांत नान प्रकारचे रोगरुपी शत्रू उत्पन्न होऊन शारीरीक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ट होण्यास या गुटीका प्रत्येक वर्षीं पाहिजे या दिवसांत एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य इतर धातुपात उन्हाळे इंद्रियशिथिलता, कडकी. गर्मी वगैरें मुरलेले त्रिकोप मुत्रसंकोच, धातुचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, सठ पाय त्रमांग. व नेत्र यांचा दाह, क्षय, पंडूरोग मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी. वातरोग, निद्रानाश पित्तावर. बाळंतरोग, मधुमेह जूनाट परमा, मुष्टिमैथूननें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी मजबूत व सतेज बनतें. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त याची शुद्ध वृद्धी, वीर्यस्तंभ व भरपूर कामोद्दिपक होत व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न पचूं लागते त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळालीं आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यास पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम ४ रुपयांच्यावर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे ४ रुपयांचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनुपानखर्डें सोबत दिला व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील.

दर:—एकदम ३५ गो० १ रु०, ७५ गो० २ रु० ११५ गो० ३ रु० १२५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० ९ रु०

२ अपूर्व नेत्रांजन:—यानें वडस. साहर, फुल, सुपऱ्या. बिंदु, कांच इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस अंजन खरें रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु०

३ परम्यावर अपूर्व मिश्रण:—कोणताही नवा जुना परमा व अनुपम दहा तिडीक मुत्राची लाली, संकोच पुस्राव, रक्तस्राव, इत्यादि विकार पथ्य नसता सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठें दिमत नाहीं. बा० किं० १ १। भार बाटलीस रु० २

३ दंतबलवर्धक पूड:—दंत संबंधीं सर्व विकार उत्तम बरे होतात.

५ विंचूचें विष:—औषध लावतांच उतरतें मुळ्या ३ तो० ८ आणे

६ गजकर्ण:—खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात ड. ६ आणे

७ सर्व हिमज्वर:—औषध घेतांच कशाहि प्रकारचे ज्वर असले तरी ते औषध घेतांच जाऊन पुन: उलटत नहींत. १२ पुड्या १ रु०

८ प्लेगावर रामबाण औषध:—आजपर्यंत आमचे औषधांन हजारो लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं संग्रहीं तापावर गोळ्या, गाठीस मलम, वात चढू नये ह्मणून वातावर मात्रा ठेवून याच। एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं० २ आणे ख० शि०

९ सामानाचा मोठा क्याटलाग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपाय कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीचे असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगांवर अनेक औषध ग्रंथोक्त रसायनें, भस्म खाक, गुटीका, आसवे, तेलें, सुगंधी अत्तरें माफक दरानें मिळतात. अनुपान खर्डा सोबत टपाल खर्च वेगळा पडेल. रोगीनें किंवा व्ही. पी नें पाठवूं प्रकृतींचे मान कळविल्यास रोगाचो निदान चिकीत्सा कळवूं.

### अत्यंत अगत्याची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधांच्या अनेक जाहिराती सुरूं असुन प्रत्येक जाहिरात सुशोभित करून जो तो पुढें येऊं पाहात आहे.
आपला समाज निरुद्योगी आळशी बनल्यामुळें एकदा जो धंदा केला त्याचेंच अनुकरण हुबेहुब नक्कल करून वाटेल त्यानें करावा आमचे जाहितीस कोकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजिले वगैरे गावांतून तो पुर्णावस्थेत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा ते लोक याची आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्याचा तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस सुचविणें हव कीं ज्यांचा कारखाना आज सतत १५।२० वर्षें अव्याहत सुरूं असून ज्यांच्या औषधास झाले डाक्टरांनीं सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधीनें कंत्याक्धी ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचींच औषधीं नेहमीं उपयोगांत आणणें अत्यंत हितकारक आहे. यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करता अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजानक व कल्याणकरीत असले। व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेस आणण्याची खटपट करूं. आज पर्यंत आमचे खटाटीं यशहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्यबंधूंस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तींच सर्वांनीं वापरावीं, एकवार अनुभवानेंच खात्री होईल इतर जाहिरातीशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषधें मागणें ती खालील पत्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरीं गुणकारक औषधें मिळून हटकून व त्वरित आरोग्य येईल- नं. १

नो० नं. २४

**कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य**

**पत्ता:—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.**

---

### नोटीस

नोटीस बेशर्मी भागिर्थी जवजे परशराम जैनगंधी राहणार जामदर मजर ता० मंगरूळपीर जिल्हा आकोला ईस —

खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, मी तुला माझे घरीं नांदण्यास येण्याकरितां रजिष्टर नंबर १३ ची नोटीस केली होती परंतु त्या नोटिशीनें तूं न येतां मजवर नंबर ३९३ ची नोटिस दिलीस त्यांतील सर्व मजकूर खोटा आहे. त्या नोटिशींत तूं मला पुरुषत्व मुळींच नाहीं असें लिहीलेंस तरी आज दोनवर्षें पावेतों मजबरोबर संसार कसा केलास? तरी आतां तुला मजबरोबर नांदण्याचें नाहीं करितां हें मला पुरुषत्व नाहीं असें बद्दल खोटें कारण पुढें आणीत आहेस मला पुरुषत्व मुळपासून आहे करितां मला औषध वगैरे घेण्याचें कांहीं कारण नाहीं तूं माझी बेअदबी करण्याकरितांच वरील नोटीस दिली आहेस मी फारकत देण्यास कबूल नाहीं तरी ही नोटीस पावल्यापासून दागिन्यासुद्धां आठ दिवसाचे आंत माझे घरीं नांदण्यास यावे अगर आपणांस नेणें करिता मी यावें असें आपणांस वाटत असल्यास मला कळवावें ह्मणजे मी येऊन तुला घेउन जाईन जर ह्याप्रमाणें माझे घरीं न येशील व वाईट वर्तनानें वागलीस तर त्याबद्दल जबाबदार मी नाहीं ह्या नोटिशीचा खर्च तुझेवर पडेल ही नोटीस दिली सही ता० ७-१०-१९११.

सही

परशराम वा। सिवाजी जैनगंधी रा० धोत्र ता० मुर्तिजापूर जि० आकोला द० खु०

नो० नं० ४३९

### नोटीस

नोटीस बेशर्मी तुळसा बाई जवजें मोतीलाल मारवाडी रा० शेगांव ता० खामगांव यांस:-

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मौजे लव्हारे ता० बाळापूर येथील शेत स० नं० २५ ए० २३८३५ व स० नं० २०६ एकर १४८३१ आकार रुपये २४ ही दोन्ही शेतें तुमचे मालकीचे असलेले तुह्मी मला कींमत रुपये ११०० यास खरेदी दीलें सबब तुह्मास आगाउ रुपये १२५ आकार पैकीं देऊन ह्या बद्दल तिकीट लाऊन पावती दीली ती मजजवळ हजर आहे. बाकी ९७५ रुपये तूह्मास द्यावें आणि खरेदी करून घ्यावीं ह्याप्रमाणें तुह्मास रुपये ९७५ देण्याकरीतां तुमचे येथें घेउन आलों आस्ता रुपये घेत नाहीं व खरेदीखत करून देत नाहीं. असा जबाब दीव्हा यात तुमची लबाडी दीसून आली. ह्मणुण ही नोटीस दीली जातें कीं तुह्मास नोटीस पावल्या पासून १० दीवसाचें आंत आह्मास खरेदीखत करून नोंदुन द्यावें यात चागले आहे जर असें न केल्यास तुमचेवर योग्य कोर्टांत दावा करून खरेदीखत करून घेऊं व जे नुकसान होईल तें भरून घेऊं हे पक्के समजावें सदर्हु दोन्ही शेतें या पूर्वी तुह्मी आह्मास ५ पीके घेणेंकरीता परवानगी दीलेली आमचे ताब्यांत आहेत आता ह्या नोटीसीप्रमाणें वर्तन करावें आणि नोटीसीचा जबाब द्यावें कळावें ता० ६ १०-११

सही

सहीची निशाणी नामदेव सदाशिव पाटील राहणार मानेगांव ची असे.

नो० नं० ४४०

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Registered No N. 4

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४५ ] आकोला—सोमवार तारीख १६ माहे आक्टोबर सन १९११ ई० [ अंक ४०

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेवली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्य नोटीसा त्याच आठवड्यांत घेतऱ्यां जातील यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल

---

### जाहिरात

मुंबई व्यांकेची सेव्हिंग व्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई व्यांक } G. A. Phillips.
आकोला ९।९।०९ } एजंट
नं १

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती कारितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६$\frac{२}{३}$ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक } G. A. PHILLIPS.
आकोला २१-९-१० } एजंट.
नो० नं० २

### चांदीचीं भांडीं.

खरें सचोटीचें दुकान.

आमचे दुकानीं शुद्ध चिनई चांदीचीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं विक्रीस तयार असतात. माल काळजीपूर्वक

वकशीर व्ही. पी. नें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल जोखिमदार राहूं. एकवार अनुभव घ्यावा.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन.
३३१ आदितवारपेठ, नाशिक

### किर्लोस्कर बधूंनीं केलेलीं शेतकीचीं आउतं गरैवे.

१ कडबा कापण्याचें नंबर "ब" यंत्र—यानें कडबा कापून घातल्यास गुरांचे पोट भरून निमा कडबा वाचतो. किं० रु० १०-९-०

२ लोखंडी नांगर नं १२ हा नांगर दोन बैलांनीं चालतो. माळ जमीन, मळची जमीन, व भुईमुगाच्या शेंगा काढण्या कारितां याचा फारच उपयोग होतो किं. रु० १०-९-०

३ लोखंडी मोठें नांगर हे नांगर सहापासून आठ बैलानीं चालतात. विशेष करून काळ्या जमीनीकरतां याचा फार उपयोग होतो. किं० रु० ३८-०-०

४ आंबोळयाचे तवे नंबर "ब" हे तवे बिडाचे केलेले असून यावर एका बाजूस आंबोळया व दुसरे बाजूस पुरणाच्या पोळ्याकरितां येतात यांचा व्यास ११ इंच असून वजन अजमासे चार पक्के शेर आहे हा तवा बायकांना फारच आवडला आहे. किं० रु० १

किर्लोस्कर बंधु
पोष्ट किर्लोस्करवाडी
[ स. औंध, जिल्हा सातारा. ]
नो० नं० ३९६

### श्री राधावल्लभाजयाति
### वर्षफल।

हमारे पास सिर्फ १ पोस्टकार्ड पर किसी फल या फूल का नाम लिख भेजो हम आप के एक वर्ष का सुख, दुःख क्षोभ, हानि, जीवन, मरण, रोग, सन्तान तरक्की, मौकूफी, व्यापार में किस वस्तु स लाभ होगा दिसावरी काम में कैसा लाभ होगा और जो महीना हानिकारक उस का उपाय महीनेवार वर्षफल वी० पी० द्वारा ८। रुपये में भेज देंगे. हमारे हांप जन्म पत्रादि उत्तमोत्तम बनते हैं, अनेक प्रशंसा पत्र मौजूद हैं, विशेष परिचय के अर्थ ८॥ आना का टिकट भेज कर सूचीपत्र मंगो लीजीये.

मिलने का पत्ताः—
गोस्वामी राधामोहन शर्म्मा
चित्तीखाना आगरा.

### नोटीस

नोटीस वेशमी मोतीराम सिताराम देशमूख राहणार पातुर्डे बुजरुक ता० जळगांव यास—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझे व माझे बापाचे दोस्त व आमच्या दुकानचे जुने असामी असून मला काहीं काम पडल्यामुळें मी तुह्मास मित्ती अश्विन शुद्ध १ चे सुमारास रुपये १५०० ची प्रामेसरीनोट लिहून दिली त्यापैकीं फक्त १०० रुपयाची दोनच्यार वेळा मिळून मला भरती करून दिली. बाकीचे रुपये १४०० आज देतो उद्या देतो असें छकवित आज तारखेपावेतो मला रुपये दिले नाहींत. गेल्या सोमवारीं तुह्मास मी ह्मटलें कीं १४०० रुपये मला द्यावे अगर रुपये देत नसाल तर १०० रुपये माझेपासून घेऊन माझी नोट मला परत द्यावी. ह्यापैकीं तुह्मास कोणती ही गोष्ट पसंत पडली नाहीं त्यावरून तुमचे मनांत कपट आहे. व बाकीचे रुपये १४०० मला न देतां मजला बुडविण्याचा तुमचा विचार दिसतो. सबब आतां तुह्मास नोटिशीनें कळवितो कीं नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत माझी प्रामेसरी नोट मला परत द्यावी. रुपये १५०० न देतां नोट बळकाऊन बसण्यांत तुह्मास मुळींच फायदा होणार नाहीं तुमचा विचार मला बुडविण्याचा आहे असें मला स्पष्ट दिसत आहे. तरी सदहू प्रामेसरीनोट तुह्मी कोणास विकूं नये. व विकून आपला मतलब कराल तर तो सर्व व्यवहार रद्द असे. तुह्मी मला विश्वास देऊन फसविलें ह्याबद्दल फौजदारींत फिर्याद करीन कळावें तारीख १२।१०।११

सही
लक्ष्मीनारायण उत्तमचंद आगरवाले
रा० पातुर्डा द० खुद.
नो० नं० ४४१

### जाहिर नोटीस.

सर्वत्र शेट सावकार लोकांस खालीं सही करणार याजकडून जाहिर करण्यांत येतें कीं मोतीराम सीताराम देशमुख राहणार पातुर्डा यांनीं मला थाप देऊन रुपये १५०० ची प्रॉमेसरी नोट अजमासे आश्विन शुद्ध १ चे सुमारास लिहून घेतली. त्यापैकीं फक्त त्यांनीं रुपये १०० दिले बाकीचे रुपये चवदाशे दिले नाहींत व नोट ही परत देत नाहीं. व त्यांचा विचार मला बुडविण्याचा झालेला आहे. तरी सदहू प्रॉमेसरीनोट वरील इसमापासून कोणी खरेदी घेऊं नये कारण ती खोटी आहे. कळावे. ता० १२।१०।११

सही
लक्ष्मीनारायण उत्तमचंद आगरवाले
रा० पातुर्डा ता० जळगांव.
नो० नं० ४४२

### नोटीस

नोटीस वेशमी रामकृष्णासा वल्द भगवानसा जात सोनार राहणार आकोट तालुका मजकूर सोमवार वेस यांस

खालीं सही करणार याज कडून नोटीस देण्यात येते की माझी बहिण नामे भुली ही तुमची लग्नची बायको असून हीला तुह्मी दीड १॥ वर्षापासून तिचें आंगावरचे डागीनें काढून घेऊन मझ्या घरीं हाकून दिलीत. मी दोन चार वेळां चार संभावित गृहस्थांस घेऊन तिला वागविण्याविषयीं आपणांस विचारण्याकारितां आलों असतां आपण तिला वागविण्याचें साफ नाकारिलेत व तुह्मी दुसरी बायको करण्याचे विचारांत आहां तरी आज पावेतों मी माझे बाहिणीस वागविलें त्याचा खर्च रु० ९० ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत मला द्यावा व माझे बहिणीस घेऊन जावें ह्या प्रमाणें न केल्यास हीच नोटीस फारकत समजली जाईल व रु० ९० ह्या नोटीशीचे खर्चासुद्धां कोर्ट मार्फत तजवीज करून वसूल केले जातील. कळावें. ता० ९-१०-११ इ०

सही
लहानु हरीसा सोनार द० खु०
आकोट जिनगर ओळ
नो. नं. ४४३

### नोटीस

रा. रा. गोविंद कृष्ण देशपांडे मानेकर हल्लीं मुक्काम उमरावती पोलीस टाऊनचे मागें गोदाबाई देशमुखीण हिचे वाड्यांत यांस--

खालीं सही करणार गोपिकाबाई जवजे विठ्ठलपंत देशपांडे मानेकर हल्लीं मुक्काम दुर्गवाडा ता० मूर्तीजापूर जि० आकोला हिजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे हिस्याचा ऐवजमा सन १३२० फसली सालचा तुह्मी स्वतः मौजे दुर्गवाडा येथें येऊन घेऊन जाण्याचा होता परंतु तुह्मी आज तारखेपर्यंत लवाजमा घेऊन गेले नाहीं तरी आतां ही नोटीस पावल्यादिवसापासून ८ दिवसांचे आंत आमचे येथें येऊन लवाजमा घेऊन जावे व आह्मांस लेखी पावती द्यावी. वरील मुदतींत तुह्मी लवाजमा न नेल्यास पुढें कोणत्याही खर्चाबद्दल व व्याजाबद्दल व फिर्यादीबद्दल तक्रार ऐकिली जाणार नाहीं. कळावें. तारीख १३-१०-११ इ.

दस्तुर- रामचंद्र रमाकांत मलकापूरकर

सही
गोपिकाबाई जवजे विठ्ठलपंत देशपांडे
तर्फे मुखत्यार कृष्णराव
शिवराम द. खुद.
नो. न. ४४४

# वर्तमानसार.

## तुर्क व इटालियन यांचे युद्ध.

तुर्कस्थान व इटली याचेमधील युद्धास युद्धाचें स्वरूप येऊं लागल्याचें ताज्या तारांवरून दिसून येतें. मंगळवारीं पहाटेस १ वाजतां त्रिपोलींतील तुर्कांनीं इटालियनांच्या फाल्डि वर्क्सवर जोराचा हल्ला केला; परंतु लढाऊ जहाजांतील सर्व लाइटमुळें तुर्कांच्या हालचाली इटालियन लोकांस पुर्वीच लक्ष्यांत आल्या, तुर्कलोक मोठ्या त्वेषानें लढले; परंतु इटालियन लोकांनीं त्यांच्यावर तोफांचा हल्ला करून त्यांस पिटाळून लाविलें. इटालियन योद्धांस इटालियन लढाऊ जहाजांची मदत होत होती. ता० ५ आक्टोबर रोजीं रात्रीं, त्रिपोलिवर चाल करून जाणाऱ्या सैन्याचा पहिला भाग नेपल्सहून निघाला; मंगळवारीं हे सैन्य टोब्रुक येथें येऊन पोंचलें. बातमी बाहेर पडूं नयें यास्तव इटलीनें पक्का बंदोबस्त केला आहे, तरी अशी बातमी बाहेर आली आहे कीं, त्रिपोलीवर चाल करून जाणाऱ्या इटालियन सैन्याचा मुख्य भाग सोमवारीं रात्रीं निरनिराळ्या बंदरांतून जहाजांत बसून बाहेर पडला. शेवटची जहाजें दुसरे दिवशीं निघणार होतीं. हीं सर्व जहाजे माल्टाच्या पूर्वेस एक ठिकाणीं जमून चोवीस तासांत त्रिपोलीच्या बदरांत जाऊन पोंचतील. त्रिपोलिवर हें सैन्य पाठविण्याची व्यवस्था मोठ्या काळजीपूर्वक केली जात आहे. जहाजांचें मार्गक्रमण दिवें मालवून होत आहे; जणूं काय तुर्कांचें आरमार हल्ला करील अशी त्यास भीति वाटत आहे. अग्रभागीं लढाऊ जहाजें, क्रुसरें व डिस्ट्रायर्स यांचे सैन्य चालले आहे. अशा बंदेबस्तानें सामानसुमानाच्या व माणसांच्या साठ आगबोटी निघाल्या आहेत. जहाजांचा हा देखावा पांच मैल पसरलेला दिसत आहे. जपनी, चिनी वगैरे सर्व राष्ट्रांचे प्रतिनिधि जनरल स्टाफ बरोबर आहेत. त्रिपोलीतील रहिवाशी उपाशीं मरत असल्या मुळें धान्यानें भरलेलें एक जहाज इटालियन सरकार पाठवित आहे. तुर्कस्तानांतील इटालियन लोकांच्या औद्योगिक, सांपत्तीक व शिक्षण विषयक संस्था बंद करण्याचे व इटालियन आगबोटी धरण्याचें तुर्कस्ताननें ठरविलें आहे. सांप्रतच्या युद्धामुळें व्यापाराचीही मोठी हानी होत आहे. ५००००० टन माल टागनरॉग व आसपासच्या इतर बंदरांत कुजून पडत आहे. त्यापैकीं सात देशांत माल ह्मणजे इटलीकारितां पाठविण्यांत आलेला आहे.

"मेदिना" आगबोट बादशहाच्या प्रवासाकारितां मुक्रर करण्यांत आली आहे. ह्या आगबोटीचें धूरीणत्व रियर–आडमिरल सर कॉलिन केपेल हे स्विकारणार आहेत, बादशहा व महाराणी यांच्या स्वाऱ्या बाल्मोरहून लंडन येथें आल्या आहेत.

तिनेवेल्लीचे कलेक्टर मि० ॲश यांच्या खुनासंबंधानें व तिनेवेल्लीच्या कटाच्या खटल्यासंबंधानें स्पेशल ट्रिब्युनलपुढें चालूं असलेली चौकशी मंगळवारीं पुढें चालूं झाली. प्रथम पहिल्या आरोपीनें ज साक्षीदार बोलावले होते, त्यांस गुरुवारीं हजर राहण्याविषयीं नाम० जजांनीं फर्माविलें. व त्यांच्यापैकीं कलकत्याचे डेप्युटी कमिशनर यांस परत जाण्याची परवानगी देऊन त्यांस जेव्हां तार येईल तेव्हां त्यांनीं हजर व्हावें असें त्यांस सांगण्यांत आलें. डिफेन्सतर्फेच्या इतर साक्षीदारास येत्या सोमवारीं हजर राहण्याबद्दल फर्माविण्यात आलें. यानंतर इन्स्पेक्टर वीर राघव आय्यर यांची उलट तपासणी पुढें चालूं करण्यांत आली. मि० गोविंद राघव आय्यर यांच्या प्रश्नांस उत्तरें देतांना साक्षिदार ह्मणाला कीं, मी सर फेरोजशहा मेहता यांस पाहिले नाहीं. सन १९०८ सालीं मद्रास येथें कॉंग्रेस भरली. होती, त्या वेळीं मद्रासेस मी नव्हतों. ना० गोखले अगर मि० डी० ई० वाच्या हे मला माहीत नाहींत बिपिनचंद्र पाल यांस मी कधीं पाहिलें नाहीं. कै० मि० आनंदाचार्लू हे मला माहीत नाहींत पण मि० जी० सुब्रह्मण्य आय्यर यांस मी ओळखतो.

ईस्टर्न बंगाल स्टेट रेल्वेच्या दोमार व चिलहटी या दोन स्टेशनादरम्यान १६४ मैलाजनीक ता० ८ रोजीं दुपारीं १२–५४ वाजतां एका माल गाडीचें इंजिन व १८ डबे रुळावरून घसरून उलथे झाले. त्यामुळें इंजिनवरील लोकांस इजा झाली. या अपघातामुळें अप मेल व अप व डाऊन पॅसेंजर गाड्यांस बरेंच वेळ थांबून ठेवावें लागलें. व रस्ता नादुरुस्त झाल्यामुळें त्यांतील उतारूस गाडींतून उतरून दुसऱ्या गाडींत बसवून नेण्यांत आलें.

गोरखपूर जिल्ह्यांतील बसडिला गांवचा जमिनदार महंत बिशन भगत याचा खून केल्याबद्दल गोरखपूरचे सेशन्सजज्ज मि. रोज यांचे पुढें खटला चालून आरोपी गोकुळ आहिर व त्याचे ९–१० साथीदार यांना जन्मठेपीची शिक्षा सांगण्यांत आल्या. सदरहू खून होण्याचें कारण मोठे चमत्कारिक असल्याचें समजलें महंत हा आपल्या कुळांना फार छळी व आपल्या बाईटांवर असणारांचीं घरेंदारें तो जाळीत असे हा जुलूम असह्य होऊन त्याच्या कुळांनीं एक विचारानें १२०० रुपये पर्यंत वर्गणी जमा करून त्याचा खून करण्याचा निश्चय केला या जमलेल्या रकमेपैकीं, ७०० रुपये त्यांनीं आरोपीस दऊं करून त्याचा खून करण्याच्या कामीं योजना केली व बाकीचे पैसे हें प्रकरण कोर्टांत गेल्यास आरोपीना सोडविण्याच्या कामी त्याचा उपयोग व्हावा. ह्मणून ठेवून देण्यांत आले. गोकूळनें ऑगस्टच्या तिसऱ्या तारखेस महंताचा निजल्या जागीं खून केला. सदरहू खटल्यांत आरोपी निर्दोषी आहेत असा असेसरांचा अभिप्राय पडला, परंतु जज्जसाहेबांनीं त्यांना इंडियन पिनल कोडच्या ३०२ व १०९ या कलमान्वयें वर सांगितलेल्या शिक्षा सांगितल्या.

---

## स्कूल कमिटीनें काय करावें

१ शाळाखात्यानें स्कूल म्यानुअल आहे, त्यांत स्कूल कमेटीनें काय काय करावें हें आहे आहे. तीं कलमें स्कूल कमिटीच्या समयात्मक त्यांत उतरलेलीं असतात, तेव्हां तीं सर्व देण्याचें काम नाहीं. या लेखांत त्या कामांशिवाय कोणतीं कामें स्कूल कमेटीला करितां येण्याजोगीं आहेत, व करणें इष्ट आहे, येवढें सांगण्याचा उद्देश आहे.

२ मुलें शाळेंत येतात तीं स्वच्छ असतात कीं नाहींत, व त्यांचें कपडे स्वच्छ असतात कीं नाहींत, हें पाहावें. मुलें किती हजर, कितीस्वच्छ, व कितीकांचे कपडे स्वच्छ, याबद्दल शेरा लिहावा. हा शेरा लिहावयाचा इतक्याच करितां कीं स्वच्छतेमध्यें हळूहळू सुधारणा होत आहे कीं नाहीं हें पाहातां यावें. या संबंधानें मुलांच्या आईबापांस बोध करितां येईल व त्या पासून फायदा होईल. मुलांचे कपडे स्वच्छ आहेत कीं नाहींत, हें पाहिल्यावर त्यांचीं पुस्तकें, त्यांच्या पाटाचा, त्यांचीं दप्तरें स्वच्छ आहेत कीं नाहींत हें पाहावें. घामानें खराब झालेलीं पुस्तकें व तुळतुळीत दिसणाऱ्या पाटचा ठवूं देऊं नयेत. पुस्तकांना वेष्टणें ( कव्हर ) घातलीं ह्मणजे तीं खराब होत नाहींत. पाट्या कोळशानें घासाव्या लागतात. हें पाहणें खरोखर मास्तरचें आहे, पण त्याबद्दल कूरकर होते. ह्मणून स्कूल कमेटीनें हें पाहावें, ह्मणजे त्याला मदत दिल्यासारखी होईल

३ कपडे नुस्ते स्वच्छ आहेत, एवढें पाहून पुरें नाहीं ते बरोबर घातले आहेत कीं नाहींत हें पाहावें. अंगरख्याचें, बंड्याचे बंद तुटलेले, गुड्या नाहींशा झालेल्या असे प्रकार पुष्कळदा दिसून येतात; त्यांमुळें मुलांचें अंग उघडें पडतें. यानें केवळ शिस्तच बिघडते असें नाहीं; तर मुलांची प्रकृतिही बिघडण्याचा संभव असतो. त्या त्या ऋतूच्या मानानें मुलाला कपडे पुरतसे आहेत कीं नाहीं हें पाहावें. थंडींत ऊबदार कपडे पाहिजेत; उन्हाळ्यांत हलके व पांढरे कपडे असावें. पावसाळ्यांत कपडे भिजूं नयेत अशी व्यवस्था आहे कीं नाहीं हें पहावें.

४ मुलांचीं प्रकृति पाहावी. जीं फार अशक्त मुलें असतील. त्यांना अभ्यास करवणार नाहीं, ह्मणून बापांकडून तीं घरीं किंवा शेतांत उघड्या हवेंत तें काम करण्यास जास्त लायक ह्मणून घरींच ठेववावी.

ज्या मुलांचे डोळे आले असतील, किंवा ज्यांना डांग्या खोकला लागला असेल, त्या मुलांना तीं बरीं होत तोंपर्यंत शाळेंत येऊं देऊं नये. कारण त्यांच्या सहवासानें इतर मुलांस ते रोग होतात.

देवी न काढलेल्या किंवा देवी न आलेल्या मुलांस शाळेंत देवीची सांथ आली असतां येऊं देऊं नये.

जीं मुलें एकसारखीं खोकत असतात. त्यांची परीक्षा डाक्टराकडून घेण्यास बापास सांगावें. कारण जर त्यांस क्षयाची भावना असेल तर तो रोग इतरांस जडण्याचा संभव आहे.

कांहीं मुलांची दृष्टि लहानपणापासून अधू असते. कितीएकांना फळयावरचें लिहिलेलें दिसत नाहीं. कितीकांची दृष्टि कमी उजेडांत बसून वाचण्यानें किंवा लिहिण्यानें बिघडते. तेव्हां शाळेंत पाहिजे तितका उजेड आहे कीं नाहीं, हें पाहावें. हें काम मास्तराचें व इन्स्पेक्टराचें आहे. पण याकडे दुर्लक्ष होतें. सारांश मुलें सशक्त, निरोगी, आनंदी व उत्साहयुक्त राहतील, अशी व्यवस्था राहणें इष्ट आहे.

५ शाळागृह स्वच्छ, जमीन पावसाळ्यांतही कोरडी, हवा खेळती राहीच. अशा प्रकारचें आहे कीं नाहीं हें पाहावें. थंडीमध्यें खिडक्या लावून बसल्यानें हवा कोंदट होते, खिडक्या उघडाव्या तर सोसाट्याचा गार वारा मुलांच्या अंगावर बसतो, अशी जेथें अडचण असेल, तेथें ती डेप्युटी इन्स्पेक्टराच्या कानावर घालावी ह्मणजे बोर्डांतून व्यवस्था होण्याजोगी असल्यास होईल. तोंपर्यंत मुलें बाहेर उघड्या हवेंत कसरत करित आहेत तों सर्व खिडक्या उघड्या टाकून शाळेंतील हवा स्वच्छ होईल अशी व्यवस्था ठेवावी. हें काम मास्तराचें आहे, पण तें तो करितो आहे हें स्कूल कमेटीनें पाहावें.

६ मुलें वक्तशीर व नेमानें शाळेंत हजर राहतील. अशाबद्दल आईबापांस बोध करावा ही बाब शिस्तीची तशीच अभ्यासाची आहे.

७ स्कूल कमेटींतल्या मेंबरांस मुलांची परीक्षा घेतां येईल तर घ्यावी. विशेषतः त्यांनीं हें पाहावें कीं अभ्यास व्यवस्थेनें व सारखे चालले आहेत कीं नाहीं. ही व्यवस्था राहण्याला नियमित हजरी ( कलम ६ ) अवश्य आहे. बऱ्याच शाळांतून कांहीं दिवस खेळणी, व परीक्षेच्या आधीं कांहीं महिने अभ्यासावर झोड, असा प्रकार आढळतो. तो बरा नाहीं अशा घाईनें कोंबलेलें ज्ञान जिरत नाहीं. या करितां लग्नें, यात्रा. इत्यादि कारणांनीं हजिरी कमी राहते, ती न राहूं देण्याविषयीं तजवीज ठेवावी. ज्या खेड्यांत शेतीचें काम मुलांच्या सहाय्यावांचून पार पडत नाहीं उदाहरणार्थ कापूस वेचण्याच्या हंगामांत- त्या खेड्यांत कांहीं दिवस शाळा बंद केलेली पुरेल. याबाबतींत वरिष्ठांस सूचना करावी.

८ स्कूल कमेटीनें गांवच्या तंट्यांत स्वतः पडूं नये व मास्तरास पडूं देऊं नये. कारण त्यामुळें शाळेचा बिघाड होण्याचा संभव आहे.

९ मुलाच्या पालकांचे व मास्तराचे संबंध सलोख्याचे व मित्रत्वाचे राहतील अशी व्यवस्था ठेवावी. मास्तरास योग्य मदत द्यावी तो मुलांच्या दुर्वर्तनाबद्दल तक्रार करील ती बापांनीं मनावर घेतली पाहिजे. उलटपक्षीं मास्तर मुलांशीं प्रेमानें वागतो व त्यांना कह्यांत ही ठेवितो कीं नाहीं, हें पाहावें. मास्तरानें एखाद्या मुलास कांहीं अपराधाबद्दल रीतसर शिक्षा केली, तर तीबद्दल बापानें भलतीच तक्रार केली, तर स्कूल कमेटीनें त्याची समजूत घालावी; मास्तरानें फाजील शिक्षा केली तर त्याला ही समजुतीच्या गोष्टी सांगाव्या.

---

वऱ्हाडसमाचार

आश्विन वद्य ९ शके १८३३ दुंदुभिनाम संवत्सरे

## हिंदुकॉन्फरन्सच्या अध्यक्षांचें भाषण.

पंजाबांत अमृतसर येथें नुकतीच हिंदु कान्फरन्सची बैठक झाली त्यावेळीं अध्यक्ष मि० लालचंद यांनीं केलेलें भाषण अनेक प्रकारें [illegible]नीं विचार करण्यासारखें झालें यांत शंका नाहीं. हिंदुंत धर्मसंबंधीं अनेक बाबतींत जातीजातींतच काय, पण व्यक्ती व्यक्तींत जबरदस्त मतभेद आहेत. पण ते मतभेद बाजूला ठेवून हिंदुसमाजाची सुधारणा कशी करतां येईल हा महत्त्वाचा प्रश्न आहे आणि त्या समाजाच्या पुढाऱ्यांनीं तो प्रश्न हातीं घेऊन आपलें सगळें बुद्धिबळ त्याच्या निर्णयाकडे लावणें अत्यंत जरूरीचें आहे. अमृतसर येथें भरलेल्या हिंदुकॉन्फरन्समध्यें हिंदु व आर्यसमाजिष्ट अशा दोन्ही पक्षांचे अध्वर्यु हजर होते, आणि अध्यक्ष रायबहादर लालचंद शेटनीं केलेलें भाषण दोन्ही पक्षांचे अध्वर्यु कित्येक दिवसपर्यंत तरी खास विसरणार नाहींत, इतक्या कळकळीनें तें केलेलें होतें. अध्यक्षांनीं मुख्य चार गोष्टींचें विवेचन केलें. पहिली राजकीय स्थिति, दुसरी-उद्योगधंदे, तिसरी-शिक्षण, आणि चवथी-समाज सुधारणा. या चारी दिशांनीं हिंदुसमाजाची स्थिति कोणत्या प्रकारची झाली आहे याचें उत्कृष्ट व निःपक्षपात दृष्टीनें विवेचन करून कान्फरन्सनें आतां पुढें काय करावयास पाहिजे तेंही त्यांनीं दाखविलें. राजकीय स्थितिविषयीं बोलतांना त्यांनीं मोर्लेसाहेबाच्या सुधारणा निष्फळ झाल्याबद्दल सांगितलें. या बाबतींत अध्यक्षांचा व आमचा तीव्र मतभेद आहे. पण या योजनेची एक बाजु मुसलमानांना मिळालेले फाजील हक्क- ही खरोखर अन्यायमुलक आणि दोषयुक्त आहे असें ह्मणण्यास आह्मांस कांहीं हरकत दिसत नाहीं. त्याचप्रमाणें पंजाबांत कांहीं जातीच्या लोकांना जमीन विकत न देण्याचे संबंधांत जो एक कायदा तयार होत आहे अशी बातमी आहे तो कायदाही आक्षेप घेण्याजोगा आहे. शिक्षणाचा प्रश्न तर फारच मोठा आहे आणि त्याचें अगत्य वर्णावें तेवढें थोडेंच आहे. संतोषाची गोष्ट ही आहे कीं प्रत्येक जात या बाबतींत जागृत झाली आहे व आपणाकडून शिक्षणप्रसारार्थ यथाशक्ति प्रयत्न करीत आहे. हे प्रयत्न तर चालू राहिलेच पाहिजेत. पण त्याबरोबर आरोग्याविषयींच्या ज्ञानाचा प्रसार मागसलेल्या लोकांत जितका लवकर होईल तितका इष्ट आहे. आरोग्यविषयक अज्ञानाचे पायीं दरसाल किती प्राणांची हानि होत आहे याचा आंकडा सरकारच्या आरोग्यखात्याच्या रिपोर्टांत पाहिला तर मन भीतीनें त्रस्त होतें. हिंदुसमाजांतल्या खालच्या जातींत विशेषतः या बाबीसंबंधानें जागृति व्हावयाला पाहिजे आहे. ही जागृति सुशिक्षितांनीं त्या लोकांत मिळून मिसळून, त्यांना त्यांच्या भाषेंत समजतील अशा चार गोष्टी सांगून युक्तियुक्तीनें करावयास पाहिजे आहे. या दिशेनें अद्याप कांहीं प्रयत्न झालेला नाहीं. आह्मी मुलांना शिक्षण देतों तें निवळ वाङ्मयात्मक असतें. त्याच्यायोगानें त्यांचीं मनें सुसंस्कृत होत असतील. पण मनाबरोबर शरीराचीही जी वाढ व्हावयाची ती त्यानें होत नाहीं. हिंदुसमाज शरीरसंवर्धनाच्या दृष्टीनें दिवसें दिवस मागें पडत चालला आहे ही गोष्ट गेल्यामहिन्यांत मुंबईस युरोपियन, पारशी व हिंदु यांचे क्रिकेटचे जे सामाने झाले त्यांवरून पूर्णपणें व्यक्त झाली आहे. पारशांनीं युरोपियनांना चांगला मार दिला, पण हिंदुंना लगभरही युरोपियनांबरोबर टिकाव धरतां आला नाहीं. शिक्षणाबरोबर शरीरसंवर्धन ही अवश्य झालें पाहिजे. औद्योगिक स्थितीसंबंधानें बोलतांना अध्यक्षांनीं साहजिकच परदेशगमनाच्या प्रश्नाचा उल्लेख केला आणि तो अगदीं योग्य होता. आह्मी हिंदु लोक प्राचीन काळीं जवा, अमेरिका रोम, वगैरे परदेशाला जलपर्यटन करीत असूं त्यावेळीं आमचा धर्म आड येत नसे. आतांच तो आड कां यावा? आमच्या मनाबरोबर आमच्या धर्मशास्त्रांना ही इतकी दुर्बलता आली आहे असें ह्मणणें हा निःसंशय अन्याय आहे. ही दुर्बळता आमच्या धर्मशास्त्राची खास नाहीं. ही केवळ आमच्या मनाची आहे. समाजसुधरणेच्या अनेक बाबीपैकीं अध्यक्ष यांनीं एक बाब मुख्यतः जोरानें आपल्या भाषणांत पुढें मांडिली. ती विधवांना पुनर्विवाहाची मोकळीक देण्याबद्दलची होय. या प्रश्नाला पंजाबांत बऱ्याच जणांकडून तिव्र विरोध आहे हें जाणूनच कीं काय अध्यक्षांनीं आपल्या भाषणाचा बराच भाग मुद्दम या विषयाच्या विवेचनाला खर्च केला. विधवाविवाहाला वयाची मर्यादा न घालतां सरसकट सगळ्या विधवांना मोकळीक द्यावी असें त्यांनीं सांगितलें. जुन्या विचाराच्या हिंदुंना अध्यक्षांचे हे विचार मान्य होणार नाहींत हें उघड आहे. पण त्यांतलें मुख्य तत्त्व ह्मणजे विधवांच्या संबंधांत समाजाकडून घडणारा अन्याय दुर व्हावयाला पाहिजे हें आहे आणि हें मात्र सर्वांना मान्य झालेंच पाहिजे. त्याचप्रमाणें ठिकठिकाणीं जातीजातींचे अनाथबालाश्रम आहेत त्या सर्वांचें एकीकरण करून एका मध्यवर्ती संस्थेच्या हातीं त्यांची व्यवस्था ठेवल्यापासून फार फायदा होईल. हेंही अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत उत्तम प्रकारें दाखविलें आहे. अनाथ बालाश्रमासंबंधाची ही नवी विचाराची दिशा हिंदु पुढाऱ्यांनीं लक्षांत घेण्यासारखी आहे. सारांश, रा० ब० लालचंद यांचें भाषण उत्कृष्ट झालें, आणि अशाच विचाराचे अध्यक्ष हिंदुकान्फरन्सला सालोसाल लाभत जातील तर हिंदुसमाजाची प्रवृत्ति सर्व बाबतींत पुढें पाऊल टाकण्याकडे थोड्या फार अंशानें झाल्याशिवाय राहणार नाहीं.

## खर्चांत काटकसर.

हिंदुस्थान सरकारच्या वाढत्या खर्चाला कांहीं तरी आळा घालावयास पाहिजे आहे अशी तक्रार राष्ट्रीय सभेच्या द्वारें आज कित्येक वर्षें करण्यांत आली आहे पण गतवर्षी ना० मि० गोखले यांनीं वरिष्ठ कायदे कौन्सिलांत या संबंधाचा ठराव आणण्याची आपली इच्छा दर्शविली तेंव्हां सरकारी कामदारांना आपल्या खर्चांत कमी करण्याची अवश्यकता दिसली नाहीं. या, व कौन्सिलांत हिंदुस्थान सरकारचे फडर्गास व दुसऱ्या कित्येक त्यावेळे अधिकारी यांनीं काटकसर करण्याचें आश्वासन दिल्यापासून या विषयाचा गंभीरपणें विचार चालू आहे. इतकेंच नाहीं तर आर्काटों लाजी खात्याचे मुख्य अधिकारी यांची जागा कमी करण्याचा विचार प्रसिद्ध होऊन त्या विरुद्ध विलायतेंतून लॉर्ड कर्झन व लॉर्ड मिंटो यांचेकडून उलट तक्रारीही होऊं लागल्या आहेत. लष्करी खर्चांत काटकसर करण्यासाठीं कांहीं खातीं अजीबात कमी करण्याचा विचार चालू आहे असें कळतें. आतां भीती अशी आहे कीं ज्या खात्यांत गरीब बिचारे देशी लोक पोटें भरीत आहेत त्यांच्यावरच काटकसरीची धाड येऊन पडते कीं काय? दहावीस रुपये पगाराच्या कारकुनाच्या किंवा शिपायांच्या शेंदोनशें जागा कमी करून चाकरांच्या लोकांवरचा कामाचा बोजा वाढविण्यापेक्षा लठ्ठ पगाराची एखादी आफिसरची जागा कमी करणें हें अधिक श्रेयस्कर आहे. कारण जितक्या जागा कमी होतील तितका असंतोष वाढेल. यासाठीं हें असंतोषाचें वर्तुळ कमी करण्याचा उत्तम उपाय ह्मटल्या ह्मणजे आफिसरांच्या जागा कमी करणें हा होय.

## वातावरण निवळलें.

संमतिबिलाच्या वेळच्या चळवळींत कित्येक जहाल पुढाऱ्यांना जी प्रसिद्धी मिळाली व सवंग लोकमान्यता संपादन करण्याची चटक लागली तिची वाढ होत होत अखेर तिचा कळस दोन वर्षांपूर्वी झालेल्या राजद्रोहाच्या खटल्यात होऊन कांहीं थोड्याशा अदूरदृष्टी लोकांच्या अविचाराचें फळ साऱ्या हिंदुस्थानाला भोगावें लागलें. या जहालांचे पुढारी ह्मणजे अरविंद बाबू, बिपिन बाबू व रा० टिळक हे होत. या तिघांनीं व त्यांच्या अल्पवय अविचारी तरुण अनुयायांनीं हिंदुस्थानांतलें वातावरण इतकें दुषित करून ठेविलें होतें कीं यांतून आमच्या देशाची कशी सुटका होईल अशी काळजी विचारी लोकांना वाटूं लागली होती. पण सुदैवानें याच वेळीं लॉर्ड मोर्ले व लॉर्ड मिंटो यांच्यासारखे मुत्सद्दी हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें चालविणारे असल्यामुळें एखाद्या हुशार शस्त्रवैद्याप्रमाणें त्यांनीं हिंदी राष्ट्राचा नासका कुजका भाग वेळींच कापून काढून बाकीच्या राष्ट्रदेहाचें वेळींच संरक्षण केलें. या कृत्याबद्दल हिंदुस्थान देश सदर मुत्सद्यांचा सदैव आभारी राहील. आतां अरविंदबाबू पांदेचरी येथें योगसाधनांत निमग्न झाले आहेत; रा० टिळक हे गीतेच्या अध्ययनांत गुंतले आहेत. आणि बिपिनबाबूही इंग्लंडच्या सफरीनंतर जागृत होऊन पूर्वीच्या विकृत दृष्टीनें नव्हे तर विचाराच्या दृष्टीनें हिंदुस्थानच्या राजकीय स्थितीचें पर्यालोचन करण्यास शिकले आहेत असें गेल्या आठवड्यांत मुंबई येथें प्रेसिडेन्सि म्याजिस्ट्रेट पुढें त्यांनीं दिलेल्या कबूली जबाबावरून स्पष्ट झालें आहे त्याअर्थी हिंदुस्थानचें वातावरण आतां निवळलें असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं. बिपिनबाबूस नुकतीच एक महिन्याची साधी कैद झाली आहे अशा स्थितींत त्यांच्या हातून मागें घडलेल्या चुकीबद्दल वाक्प्रहार करणें आम्हास प्रशस्त दिसत नाहीं. उलट बाबतींत उपरत्या मुलाच्या गोष्टींत सांगितल्याप्रमाणें मार्ग चुकून भलतीकडे वहात गेलेले आमच्यांतले एक विद्वान गृहस्थ परत येऊन आमच्यांत मिळाल्याबद्दल प्रत्येक विचारी हिंदी गृहस्थास समाधानच वाटेल. बिपिनबाबूंना कडक शिक्षा व्हावी अशी सरकारचीही इच्छा नाहीं असें अॅडव्होकेट जनरल यांनीं कोर्टांत सांगितलें. यावरून सेक्रेटरीप्रमाणें जहाल पुढाऱ्यासंबंधाचें वातावरणही निवळलें आहे असें दिसतें अशा रीतीनें अत्यंत समाधानकारक वातावरणाची झालेली स्थिति आमच्या प्रमाणेंच आमच्या इतर व्यवसायबंधूंना व खुद्द जहाल पुढाऱ्यांनाही संतोषदायकच वाटेल अशी आमची खात्री आहे.

## इटली व तुर्कस्थान

इटली व तुर्कस्थान यांच्यांत सध्यां युद्ध सुरू आहे. खरें पाहिलें तर युद्ध करण्याची तुर्कस्थानची इच्छा नाहीं व ऐपतही नाहीं. तुर्कस्थानचें नांव आणि बडेजाव कितीही मोठा असला तरी आंतून घुशींनीं पोखरलेल्या जुन्या वाड्याप्रमाणें त्या राष्ट्राची स्थिति झालेली आहे. तुर्कस्थानच्या पक्षाला न्याय आहे ही गोष्ट प्रस्तुतच्या युद्धाच्या पूर्वकालीन स्थितीची ज्याला माहिती आहे त्याला सांगण्याचें कारण नाहीं. पण सध्यां ज्यांच्या अंगांत बळ त्याचा न्याय असा प्रकार असल्यामुळें आणि तुर्कस्थानला आपला कमकुवतपणा माहित असल्यामुळें युरोपियन राष्ट्रांनीं मध्यें पडून तंटा मिटवावा असा धावा तुर्कस्थानचे सुलतान वारंवार करीत आहेत. पण युरोपियन राष्ट्रें इटलीचे जातभाई पडले. ते नक्राश्रु गाळण्यापलीकडे तुर्कस्थानचा कैवार घेऊन इटलीशीं युद्ध करण्यास व न्यायाच्या बाजूला आपलें शारीरिक पाठबळ देण्यास तयार नाहींत. इतकेंच नाहींतर नैतिक पाठबळ तुर्कस्थानला देऊन इटलीला तह करण्यास लावण्यालाही तयार होत नाहींत हें आश्चर्य आहे. आमची तुह्मांला पूर्ण सहानुभूति आहे असें ह्मणणाऱ्या युरोपियन राष्ट्रांच्या या शुष्क सहानुभूतीची वास्तविक किंमत किती आहे हें ठरविणें युरोपियन राष्ट्रांच्या सध्याच्या वर्तनावरून फार कठीण झालें आहे. तुर्कस्थानांत असलेल्या इटलियन लोकांना तुर्कस्थाननें अद्याप कोणत्याही तऱ्हेनें छळलें नाहीं, किंवा हद्दपार केलें नाहीं. पण या उदार वर्तनाबद्दल तुर्कस्थानाला तितकाच उदारपणाचा मोबदला इटलीकडून मिळेल असा संभव दिसत नाहीं.

## म्हैसुर संस्थान

गेल्या दसऱ्याचे दिवशीं म्हैसुरचे दिवाणसाहेबांनीं लोक प्रतिनिधींच्या सभेपुढें गेल्या सालचा राज्य कारभाराचा रिपोर्ट वाचला, व नव्या सालचें बजेट मांडलें. गेल्या सालीं संस्थानचें उत्पन्न दोनकोटी

शेचाळीस लक्ष सव्वीस हजार रुपये होते. पैकीं २ कोटि ३० लक्ष खर्चण्या राखून १६ लक्ष रुपये कावेरीच्या धबधब्यावरील विजेच्या कारखान्याखातीं निराळे ठेवण्यांत आले. यंदाच्या बजेटांत ३। लक्ष रुपयांची तुट येईल असा अंदाज आहे. पण संतोषाची गोष्ट ही आहे कीं त्या संस्थानांत यंदा दुष्काळ पडण्याची भीती नाहीं. सोन्याच्या खाणींचें उत्पन्न वाढतें आहे, पण याबद्दलच्या संतोषांत मिठाचा खडा टाकण्यासारखी एक गोष्ट ही आहे कीं या खाणीचा मक्ता विदेशी कंपनीला दिला आहे. मध्यप्रांतांत लोखंडाच्या खाणीचा शोध लावून लोखंडाचा प्रचंड कारखाना चालविण्यास जर टाटासारखी देशी कंपनी मिळाली तर ह्मैसुरांतल्या सारख्या सोन्याच्या खाणी चालविण्यास देशी कंपनी कां मिळूं नये तें कळत नाहीं. यांत ह्मैसुर संस्थानची कसूर आहे असें आह्मी ह्मणत नाहीं. आमचे लोकांत व्यापारी व औद्योगिक धाडस कमी आहे हें आह्मी जाणून आहो. पण तें उत्पन्न होण्यासाठीं देशी संस्थानिकांनीं स्वदेशीयांनां इतरांपेक्षां अधिक सवलती दिल्याअसतां देशी उद्योगधंद्यांना उत्तेजन मिळून असें धाडस उत्पन्न होण्याचा संभव आहे. या राज्यांतील शाळांतून धर्मविषयक व नैतिक शिक्षणहीं देण्याचा उपक्रम अधिकाऱ्यांनीं केला आहे तो फार स्तुत्य आहे. या संस्थानानें दुसरी एक अत्यंत इष्ट अशी सुधारणा घडवून आणिली आहे. आरोपी स्त्रीला पुरुष पोलिसांच्या चौकींत ठेवणें हें कोणत्याही प्रकारें इष्ट नाहीं. कारण हलक्या दर्जाच्या शिपायाच्या हातून एखादे वेळीं अशा स्त्रियांवर जुलूम होण्याचा संभव असतो. अशा स्त्रीकैद्यांना स्त्रियांच्याच नजरेखालीं ठेवण्याची जी व्यवस्था ह्मैसुर दरबारानें केली आहे ती फार उत्तम असून तिचें अनुकरण इतर संस्थानिकांनीं व ब्रिटिश सरकारानें करणें अवश्य आहे.

## दिवाळी आणि दारू

धुळ्याच्या प्राणीरक्षक संस्थेनें मद्यपानाचें व्यसन कमी करण्यासाठीं जे स्तुत्य प्रयत्न चालविले आहेत त्याबद्दल त्या संस्थेस धन्यवाद देणें योग्य आहे. या संस्थेकडून नुकतेंच एक हस्तपत्रक प्रसिद्ध करण्यांत आलें आहे तें गांवांतल्या एकाद्या प्रतिष्ठित गृहस्थानें गांवकऱ्यांस एकत्र जमवून वाचून दाखविलें असतां फार फायदा होईल. दिवाळी जवळ आली आहे. या सणांत खाणें पिणें, चैन करणें व वृत्ति आनंदित ठेवणें या गोष्टींकडे प्रत्येक हिंदूची स्वाभाविकच प्रवृत्ति असते. पण यंदाचा भयंकर दुष्काळ व गुरांना चारा व पाणी मिळण्याची अडचण वगैरे गोष्टी मनांत आल्या ह्मणजे कोणाही सहृदय माणसाचा आनंद मावळून जाईल अशा स्थितींत दिवाळी सारख्या सणांत दारू पिण्यांत किंवा आतषबाजीचीं कामें उडविण्यांत लोकांनीं हजारों रुपये खर्च करणें हा केवळ वेडेपणा होईल. अशा रीतीनें पशाचा दुरुपयोग करण्यापेक्षां माणसांचे व गुरांचे प्राण वाचविण्याचे कामीं तो पैसा लाविला असतां पुण्य लागेल. ही गोष्ट लोकांच्या मनांत जितकी ज्यास्त बिंबवितां येईल तितकें इष्ट आहे. प्रत्येक संस्थेनें अशीं हस्तपत्रकें काढून वाटावीं, आणि देशी पत्रकर्त्यांनीं ही या संबंधानें लेख लिहून लो[illegible] कर्तव्याची जागृति उत्पन्न [illegible] हें योग्य आहे.

## श्रीधर स्वामी

विविधज्ञानविस्तार मासिक पुस्तकाच्या सप्टेंबरच्या अंकांत पांडवप्रताप, रामविजय, हरिविजय इ० प्राकृत ओवीबद्ध ग्रंथांचा-कर्ता श्रीधर स्वामी यांचेबद्दल गैरसमज दूर करणारा एक लहानसाच पण शोधपूर्वक लिहिलेला लेख प्रसिद्ध झाला आहे. श्रीधरस्वामीचे ग्रंथ आजपर्यंत लक्षावधि लोक भक्तिभावानें वाचीत आले आहेत. पण ते कोण होते, कोठें राहात होते किंवा कोठें निवर्तले इ० त्यांच्या चरित्रांतल्या ठळक गोष्टीसंबंधानें सुद्धां मोठमोठ्या विद्वानांच्या लेखांत—सरकारानें मोठमोठ्या विद्वानांकडून लिहवून प्रकाशित केलेल्या पुस्तकांतून कशा घोडचुका आजपर्यंत झाल्या आहेत ते या लेखाच्याद्वारे रा० सा० काशिनाथ नारायण साने यांनीं उत्तम प्रकारें दाखविलें आहे. श्रीधर स्वामींनीं तारुण्यदशा प्राप्त होण्याच्या पुर्वींच ( वयाच्या १४ व्या वर्षी ) चतुर्थाश्रम स्विकारला, व त्यांचा अंतकाळ शके १६९० मध्यें पैठण मुक्कामीं झाला अशी आजपर्यंतची समजूत होती. रा० सा० साने यांनीं श्रीधरस्वामींच्या वंशजांकडून वंशावळ मिळवून प्रसिद्ध केली आहे. तिजवरून हें स्पष्ट होतें कीं स्वामींना दत्तोबा, मनोहर व रंगनाथ असे तीन पुत्र होते. पैकीं पहिल्या दोघांना श्रीमंत शाहू छत्रपति यांनीं मौजे तडवळें परगणें ख्टाव हा गांव इनाम दिला होता या इनामाबद्दलची अस्सल सनदही उपलब्ध आहे. यावरून श्रीधर स्वामींनीं तारुण्यदशा लागण्यापूर्वी संन्यास घेतला ही गोष्ट निखालस खोटी ठरते. त्यांच्या समाधीबद्दलही असाच लोकांचा गैरसमज आहे आणि तो दूर करण्याचें श्रेय रा० सा० साने यांनीं घेतलें आहे. स्वामीची समाधी पैठण येथें नसून पंढरपुरास चंद्रभागेच्या कांठीं कुंभार घाटावर आहे. अर्थात स्वामींचें पैठण येथें समाधिस्त होणें संभवनीय व शक्य नाहीं. आपल्या जुन्या कवींच्या ग्रंथांचा कालक्रम लावण्याचा प्रयत्न अद्याप पर्यंत फारच थोड्यांनीं केला आहे. श्रीधरासंबंधानें तरी निदान तसा प्रयत्न पूर्वी झालेला नसल्यानें रा० सा० साने यांनीं ठरविलेला त्यांच्या ग्रंथांचा कालक्रम जिज्ञासु मराठी वाचकांना फार उपयुक्त व महत्त्वाचा वाटेल ह्मणून तो येथें देतो. हरिविजय शके १६२४ मु० पंढरपूर येथें लिहिला. रामविजय १६२५ तेथेंच; वेदांतसूर्य १६२९ सिद्धाश्रम येथें; पांडवप्रताप १६३४ पंढरपूर येथें; जैमिनी अश्वमेध १६३७ पाथरी येथें शिवलीलामृत १६४० मध्यें बारामती येथें; या वरून श्रीधर स्वामींच्या ग्रंथरचनेचें शीघ्रत्वही आश्चर्य करण्यासारखे होतें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. श्रीधर स्वामींचा काळ अत्यंत गडबडीचा असताही त्यांच्या हातून एकामागून एक प्रतिभापूर्ण काव्य ग्रंथ निघाले ही गोष्ट आजकालच्या शांततेच्या काळांत अस्वस्थल ग्रंथरचना करण्यानें तट्ट फुगून जाणाऱ्या क्षुद्र लेखकांनीं विचार करण्या सारखी आहे.

## इनकम् ट्यॅक्स

वरील कराचा त्रैवार्षिक ह्मणजे १९०८ ते १९११ मार्च अखेरीच्या रिपोर्टावर नामदार चीफ कमिशनर साहेब यांचा अभिप्राय वाचण्यांत आला. त्यांतील पहिला मुद्दा असा कीं या कराचा बोजा सरकारी अधिकाऱ्यांवर काटेकोल रीतीनें बसतो तसा बिन— सरकारी लोकांवर बसत नाहीं. इतर सुखवस्तु लोकांस हा कर कमी देण्याच्या घरसोडी व पळवाटा पुष्कळ असतात. या बाबतींत पुष्कळांचे उत्पन्नांचे आंकडे बरोबर कळत नाहींत आणि खरे आंकडें लपवून ठेवण्याच्या युक्त्या लोकांपाशीं बहुत उपलब्ध असतात. सरकारी खजिना ह्मणजे आपणा सर्वांचा खजिना आहे असें तादात्म्य लोकांच्या मनांत होण्याइतकें लोकमत संस्कृत व उन्नत नाहीं. ही विवेकबुद्धि जागृत होईपर्यंत आणि सरकार ह्मणजे आपणा सर्वजणांचा एकीभूत मूर्त आत्मा आहे असा सद्भाव लोकांच्या मनांत निपजेपर्यंत सरकारी इनकम् ट्यॅक्स खात्याकडे अत्यंत चौकसपणाचें काम आहे आणि त्या खात्याकडून तें कसें बिनचोख वठवावें या संबंधानें स्थानिक सरकार योग्य विवेचनेंत आहे.

लोकांची सांपत्तिक भरभराट सरकारी डोळ्या पुढें जशी उभारलेली दिसते तसे इनकम, ट्याक्सचे आंकडे वाढत्या प्रमाणावर दिसून पडत नाहीं ह्मणून वरील प्रकारचा अभिप्राय नमूद करण्यांत आला आहे. एकंदर उत्पन्न ६ लक्ष ७ हजार रुपये आहे त्या पैकीं एक पंचमांश हिस्सा सरकारी नोकराकडून वसूल होतो. आणि बाकीचा आंकडा ह्मणजे व्यापाराची अभिवृद्धि, औद्योगिक संपन्नता व आधिभौतिक समृद्धि यांच्या एक–दशांशाचीही खरी कल्पना देत नाहीं असें सरकारी ह्मणणें आहे हा अभिप्राय वस्तुस्थितीला धरून नाहीं असें आह्मी विनयपूर्वक आग्रहानें कळवूं इच्छितो.

## मंगल श्री.

ईश्वरी लीला किती तरी आल्हादकारक! आतां आमचे श्रीमान् जार्ज हे इंडियाचे पहिले अभिषिक्त सार्वभौम बादशहा आणि त्यांचा तो राज्याभिषेक दिसेंबरच्या १२ वे तारखेला हास्तिनापूरच्या पुण्यक्षेत्रीं होणार आहे. हा समारंभ अपूर्व होय. इग्लंडचा राजा इंडियावर राज्य करितो असें या पुढें नाहीं तर इंडियाचा चक्रवर्ती असा हा पहिला बादशहा हिंदु, मुसलमान पार्शी, ख्रिस्ति इत्यादी भिन्न धर्मीय प्रजासमूह आपल्या साम्राज्याच्या सिंहासनावर आपल्या बादशहास मंगल समारंभानें बसवील तो सोन्याचा दिवस आमच्या इतिहासांतील निराळयाच सर्गाला प्रारंभ करील.

या अदृष्टपूर्व समारंभाचा मंगलदिन आकोल्यास कसा महोत्सवांनीं आनंदपूर्ण करावयाचा याचा विचार करण्यासाठीं काल रोजीं ११ वाजतां टौन हालांत जाहिरसभा मेजर फ्रेडन साहेब डिपुटी कामिशनर यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. सर्वानुमतें एक श्रेष्ठ श्रेष्ठ बहुविध धंद्यांच्या ३६ गृहस्थांची कमिटी नेमण्यांत आली आणि ता० ७ दिसेंबर पासून ता० १२ दिसेंबर पर्यंत पुष्कळसा कार्यक्रम रचण्यांत येणार आहे. कांहीं कैद्यांची मुक्तता, देवे[illegible]ळयांतून राज्यानिषेकाचें वाचन, दरबार, [illegible] धर्मांचे खेळ, आतषबाजी, दीपोत्सव, अन्नसंतर्पण इत्यादि मंगलकारक गोष्टींची योजना होणार आहे. भावी आनंदाच्या गोष्टी फारच मनोरम वाटतात.

## नवी दिशा

### ( सरकीची पेंड व तेल )

येथील 'वऱ्हाड आईल वर्कस्' ह्या कारखान्यांतून सरकीचें तेल व सरकीची पेंड हीं उत्तम प्रकारचीं निघूं लागलीं आहेत. पुण्याच्या शेती खात्याच्या मुख्य रसायनशास्त्रज्ञाकडे हे पदार्थ पाठविण्यांत आले होते. त्यांस ते पदार्थ फार पसंत पडले. सरकीची पेंड जनावरांस पुष्टीकारक असून त्यांत धाग्याचा अंश बिलकूल नहीं. आणि तेल खाण्याला रुचिकर व गोड असून त्यांत आसिडाचा भाग नसून इंग्लिश व अमेरिकन पदार्थांपेक्षा यांची प्रत उच्च आहे. आह्मी या कारखान्याच्या डायरेक्टरांचें या नव्या प्रयोगाबद्दल अभिनंदन करितों.

**सुट्टी**— या सप्तकांत **दिवाळीचा** वार्षिक महोत्सव असल्यामुळें आमचा कारखाना मामुलाप्रमाणें **बंद** राहील आणि त्यामुळें आमचा येत्या २३ आक्टोबरचा **'वऱ्हाडसमाचार' अंक प्रसिद्ध होणार नाहीं.**

## वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**-- खरीपाचीं पीकें चातका प्रमाणें मेघवृष्टीची अपेक्षा करीत तटस्थ व स्तब्ध आहेत. 'काय न करी विधि[illegible]' असा जप चालूं आहे ऋतुमध्यें पालट होत असतांना होणारे ताप व आजार बळावले आहेत.

रा. रा. सी. ब्रौन आय सी. एस. आसि. कमिशनर यांस उमरावती येथें नेमिलें.

रा. रा. आर. हामिल्टन आय. सी. एस. आसि. कामिशनर यांस या जिल्ह्यांत पुनः नेमण्यांत आलें.

**प्रशंसा**— श्रीमती गंगाबाई व राधाबाई भ्रतार दत्ताजी, करजगांव ता. इलिचपूर यांनीं तेथील शालागृहासाठीं १ हजार रुपये वर्गणी दिल्याबद्दल नामदार चीफ कमिशनर यांनीं विशेष प्रशंसा केली आहे.

सुधासिंधु

सुख संचारक कंपनी मथुरा यांची तयार केलेलीं व सरकारांतून रजिस्टर झालेलीं औषधें, जीं वीस वर्षांपासून लोकांत अनुभविलीं आहेत.

## सुधासिंधु

हें कफ, खोकला, दमा, थंडीचा ताप, पटकी, शूळ, संग्रहणी, अतिसार, पोटांत दुखणें, वांत्या, मळमळणें, हात पाय व कंबर दुखणें, मुलांचे हिरवे पिवळे जुलाब, डांग्या खोकला, दूध ओकून टाकणें इत्यादीवर स्वादिष्ट व सुवासिक औषध आहे. किंमत प्रत्येक बाटलीस ०८ आणे.

## दद्रुगजकेसरी

गजकरणास समूळ नाहींसें करणारें हेंच फक्त एक पवित्र औषध आहे. कांहीं सुद्धां जळण अथवा आग होत नाहीं. यासच जर दारू अथवा लिंबाचे अर्कांत मिळविलें तर २ बाटल्या अर्क तयार होतो. किंमत प्रत्येक बाटलीस ०४ आणे १२ बाटल्या एकदम मागविल्यानें त्यांस एजंट समजून नोटिशी, हँडबिलें वगैरे फुकट पाठविलीं जातात, व कमिशनही दिलें जातें. चालू सालचें पंचांगही फुकट मिळतें.

मागविण्याचा पत्ताः—
पंडित क्षेत्रपाल शर्मामालक,
१९९ सुख संचारक कंपनी, मथुरा.

सुधासिंधु सुधासिंधु

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधालय--मुर्डी.

अती उंचि सर्वोत्कृष्ट

# सुगंधी अत्तरांच्या पट्या.

आमचा सुगंधी अत्तराचा कारखाना सुरू होऊन आज बहुत वर्षे झालीं आहेत. आमचे कारखान्यांत तयार झालेला माल किती उत्तम, खात्रीचा व टिकाऊ असतो, याचा अनुभव लक्षावधि ग्राहकांला आलेला आहे. ह्मणून आमचे मालाची थोरवी विशेष वर्णनानें खुलवून सांगितली पाहिजे असें नाहीं. प्रथम अत्तरांचे पट्यांची सर्वांस उपयुक्त अशी रचना करून पेट्या उत्तम सागाचे लांकडाच्या मजबूत बनवून वर उत्तम पालीशही केलेलें आहे. यामुळें पेटी फारच मनोहर बनली आहे. अशा पेटींत निरानिराळे जातींच्या उत्तम अत्तरांनीं भरलेल्या कुप्या (बाटल्या) ३, उंची बेलियाची बाटली एक, आणि सुगंधी उटणें, लालभडक गंधाचे रवे, व स्त्रिया करितां लालभडक सुगंधी कुंकू डबी एक, असे सुगंधी दहा पदार्थ ठेविले आहेत. यंदाचे पेट्यांत अशी जरी विशेष सुधारणा केली आहे तथापि पेटीची किंमत न वाढवितां ती फारच अल्प पोष्ट खर्चासह दोन रुपये आठ आणेच ठेविली आहे. या पेट्या एकदम ६ घेणारांस एक पेटी व एकदम १० पेट्या घेणारांस दोन पेट्या बक्षिसादाखल फुकट देऊं. करितां अशा या उपयुक्त वस्तुंचा अवश्य संग्रह करावा अशी विनंती आहे. रोखीनें किंवा व्हि. पी. नें पाठवूं खालील पत्त्यावर बिनचूक पत्र पाठवावें. अशा अल्पमोल पेटीचा लाभ आमचे सर्व ग्राहक मनःपूर्वक घेतील व आपल्या इष्टमित्रा कडून घेववून आमच्या स्वदेशी धंद्यास हस्ते परहस्ते मदत करतील अशी पूर्ण उमेद आहे.

### तारुण्यविलासिनी बादशाही अत्तरें.

सुरंगी नं० १ ची उत्तम. .... तोळ्यास ४ रु.
मालती .... .... .... .... .... .... .... .... .... ३ रु.
पुष्पराज .... .... .... .... .... .... .... .... .... ३ रु.

हीं अत्तरें किती उत्तम असतात याचा सर्वांस अनुभव आहेच. हीं अत्तरें आह्मी मुद्दाम उत्तम तयार करून शक्य तितकी कमी किंमत ठेविली आहे.

### उत्तम सुगंधी अत्तरें वगैरे.

गुलाब, हिना, केवडा, अंबर, मोतिया, वगैरे अत्तरें १॥ रु. तोळा देऊं.

### जीवनपुरी तैलें.

बेलिया, चमेली, हिना, मसाला, वगैरे तैलें. दर ८ तोळ्यांस १ रु

### विशेष सूचना.

दिपवाळी नजीक आल्यामुळें आपल्यास लागणारा सुगंधी माल अगाऊ मागणें चांगलें. करितां जरूर पत्र पाठवावें. सर्व माल व्ही. पी. नें पाठवूं. ग्राहकांनीं लागेल तो माल मागवावा उत्तम पाठवूं. तेल व अर्क यांचा शेर ८० रुपये भर आहे. घाऊक माल घेणारांस भरपूर कमिशन देऊं. व्ही. पी. नें पाठवूं.

पत्ताः---मु. मुर्डी पो. हर्णै. जि. रत्नागिरी. — कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
नो नं१२

---

## Orienta Govrnment security
## LIFE ASSURANCE COMPANY
## Limited

ESTABLISHED IN 1874.
R. Paterson, Brown, Manager,
HEAD OFFICE—BOMBAY

**FUNDS Excede $3\frac{3}{4}$ crores**

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES
IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connect with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under th policy be paid to the Claimants at the earliest possible date. This t— Directors of the 'Oriental' keep well before them and act to treating the clients with the utmost liberality.

UNQUESTIONBALE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a give sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securitie and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms o the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through deceas of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, at one create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may ave money yet, if he dies early before he had time to save much, his im and family may be in distress. Life Assurance is a means by which his danger is got over. Life being so uncertain, the sooner a man make up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety o the step, do not delay. There are numerous instances in the records of th Oriental' where the delay of a month or less, has left the family withou athe intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For term please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on peationpli to—

M. DESOUZA.
CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

---

## विलक्षण नयन रुक्कुठार.

**विलक्षण नयन रुक्कुठार** - ह्या अप्रातिम औषधापासून डोळ्याचे साधारण विकार— **खुपऱ्या,** लाली, **ठणका, पाणी गळणें, कंडू, भूरी, फुल** इ० जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जाग्रणानें, उन्हांत फिरल्यानें अग्नितापानें, उपदंशविकारानें, अतिवाचनानें, कडकीनें इ. अनेक कारणांनीं डोळे बिघडतात ह्यावरही हें अप्रातिम गुणकारी असून लहान मुलांसही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदर औषधाचे सकाळीं पांच व संध्याकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल. बरेच दिवसांचा विकार असल्यास तीन कुप्या लागतील; सोबत औषध घालणे करितां कांचेची नळी फुकट मिळेल, एक कुपीची किं. १ एक रुपया. तीन कुप्या एकदम घणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ. एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न पडतां दहा रुपयांत मिळतील.

व्ही. पी. कंपनीचा उत्तम निळिकाळी शाई ०६ आण्याची घेणारास पुढील सालची डायरी बक्षीस मिळेल. आमचेकडे शालोपयोगी मराठी व इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारचा स्टेशनरी माल फारच माफक दरानें मिळेल. विशेष माहिती खालील पत्त्यावर,

वी. एन. घारपुरे पाट- अकोला

# दिवाळी आणि दारू!

## अहिंसापरमोधर्मः

दिवाळीचा सण अगदीं जवळ येत चालला आहे. तेव्हां प्रत्येक मनुष्य आपापलेपरी आनंद करण्यास उत्सुक होणें साहाजिक आहे; परंतु दैवी संकेत कांहीं निराळा दिसतो. पाऊस नाहीं, त्यामुळें आपले ह्या जिल्ह्यांत व इतरत्र धान्याची महर्गता होऊन गुरांनः चारा नाहींस झाला आहे. हजारो गुरें देशोधडी जाऊन कालांतरानें मृत्युपंथास लागण्याचा संभव आहे. अशा वेळीं स्वतःची चैन बाजूस ठेऊन प्रत्येकानें ह्या मुक्या जनावरांचा प्राण वांचविण्याची यथाशक्ति खटपट केली पाहिजे. तेव्हां प्रत्येकास अशी विनंती आहे कीं दारू उडविण्यांत अगर पिण्यांत पैसा खर्च करून शरीराची व वित्ताची हानी करून घेऊं नका. तोच पैसा मुक्या जनावरांचे क्लेश व प्राण वाचविण्यांत खर्च करून पुण्य पदरीं घ्या.

**प्राणिरक्षक संस्था धुळें.**

## जाहिर नोटीस

**पांडुरंग सीताराम** पाटील रा० पीलकोडी व इतर लोक यांना कळावण्यांत येतें कीं मी पांडुरंग सीताराम पाटील यांचें मालकीचें घर **नंबर** १८६ यांत सन १९०९ माहे जून **महिन्यांत** राहण्यास आलो. त्यावेळेस आपल्या करारा प्रमाणें १ महिन्याचे भाडें अगाऊ दिलें व पुढें आपल्या ह्मणण्यावरून इतर भाडेकराजवळून भाडें वसूल करून देत गेलो. परंत भाडे पावल्याबद्दल आपण मला एकदासुद्धां पावती दिली नाहीं. पुढें कांहीं कारणावरून तुमचा आमचा बेबनाव झाला व आपण माझ्यावर भाडे वसूल करून खाल्लयांचा आरोप आणून मला घरांतून काढुन देण्याचा प्रयत्न करतां मी घर खालीं करून देण्यास तयार आहे परंतु आपण ह्मणतां कीं तूं भाडे वसूल करून खाल्लेस व स्वतःचेही भाडे देत नाहीं. याबद्दल तुझेवर फिर्याद करून भाडे वसूल करीन व माझी भाडे पावल्याबद्दलची पावती घेतल्याशिवाय जाऊं नये असें ह्मणतां. तर या नोटीशीनें आपणास असें कळवितो कीं आपण मला ८ दिवसांचें अत भाडे पावल्याबद्दल पावती द्यावी कारण आपणास हल्लीं चालुं असलेल्या महिन्यासह भाडे पावलें आहे. याबद्दल माझा पुरावा आहे. तर आपण ही नोटीस पावतांच भाडे पावल्याची पावती द्यावी न दिल्यास हीच पावती समजून मी दुसरें घरांत राहण्यास जाईन. या नोटीशीचा खर्च तुह्मांस भरावा लागेल कळावें. ता० ११।१०।१९११ इसवी.

सही

माहादु लक्ष्मण नायकवाडी राहणार आकोला डापकीरोड दस्तुर खुःद.

नो. नं. ४४५

## नोटीस

रा० रा० गोविंद रामचंद्र घोंडसे पेन शनर पोलिस इन्स्पेक्टर मुक्काम मजलापूर ता० आकोला यांसः—

मी खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं माझा बाप दिवाकर गोपाळ भट घोंगे व बापुभट विन गोपाळभट घोंगे हे साक्षांत बंधु होते. माझा बाप वडील व बापूभट धाकटे होते. माझा बाप सरकारी मास्तर असल्या मुळें त्यास आकोल्यास राहतां आलें नाहीं व बापूभट हा एकटाच आमचे घरांत राहीला. दोघा भावामध्यें मरेपर्यंत वाटणी मुळींच झाली नाहीं व ते दोघे एकत्र असतानांच मरण पावले. माझा बाप मरण्यास सरासरी ८।१० वर्षें झालीं व बापूभटास मरण्यास सरासरी ५।६ वर्षें झालीं. व त्या नंतर लागलींच आई वारली. मी व माझा धाकटा भाऊ शंकर अज्ञान स्थितींत असतां आमची चुलती हीनें आमचे संगोपन न केल्यामुळें विद्याभ्यासाकरितां आह्मी दोघें बंधू लोकाचे घरोघर लागून आपला काळ कंठीत आहोत. अशा स्थितींत तुह्मी आह्मास पाहून आमची चुलती यमुनाबाई जवजे बापूभट घोंगें हिजकडून तिच्याशीं संगममत करून व आह्मी गरीब लकरें आहोत असें समजून तुह्मी आह्मास बुडविण्याचें हेतुनें व आमचे घर आह्मास न मिळावें व त्याचा अभिलाष करावा अशा उद्देशानें त्या घरांवर बिगरहक्कानें ताबा करून व प्रत्यक्ष मालकी ह्मणून त्या घरास इच्छेस वाटेल तसें पैसे खर्च करून राहिलें आहात. आह्मी गरीब माणसे आहोत ही गोष्ट खरी परंतु तुमचे सारख्यानें असें करणें इष्ट नाहीं. या करितां तुह्मांस या नोटिशीनें कळवितो कीं ही नोटीस पावल्यापासून एक महिन्याचे आंत आमचें घर खालीं करून द्यावें व आजवर दरमहा रुपये १५ प्रमाणें भाडे देऊन आमची पावती घ्यावी. व तुह्मांस वरील दराप्रमाणें भाड्यानें राहणें असेल तर आमचे नांवाची भाडेचिठ्ठी करून देऊन बेफिकिर घरांत राहावें आमचेकडून हरकत नाहीं. याप्रमाणें तुमचेकडून वर्तन न झाल्यास रीतीप्रमाणें दावा करून कोर्ट खर्चांचे व वरील दराप्रमाणें भाड्याचे पैसे वसूल करून घराचा ताबा तुमचे कडून घेतला जाईल व आजवर तुह्मी घरास खर्च केलेल्या व पुढें कराल त्या पैशाबद्दल आह्मी जबाबदार नाहीं कळावें ता० १०।१०।११

सही

त्र्यंबक दिवाकर घोंगे रा० मेहेकर.

नो० नं० ४४६

## नोटीस

नोटीस बेशमी— शंकरलाल मुलतानचंद मारवाडी राहणार काळ्याचे पिंपळगांव यांसः—

मी खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं त्रिंबक नारायण ब्राह्मण राहणार काळ्याचें पिंपळगांव हल्लीं राहणार काजळगांव ता० जळगांव यांचे [illegible] सर्वे नंबर ४० एकर २२८२ गुंठे [illegible] रुपये ३८ चें खातें सीताराम रूपचंद यांचे नांवें असून ते गहाण [illegible] ९०० रुपयावर आहे व्याज २ रु० प्रमाणें ठरलें असून ते रु० [illegible] आपलेकडेस २-३ वेळां घेऊन आलो असतां घेत नाहीं. करिता तुह्मांस कळविण्यांत येतें कीं आपणास नोटीस मिळाल्यादिवसापासून ८ दिवसांचे आंत रुपये प्रेमसुकदास राठी राहणार खामगांव हल्लीं पिंपळगांवकाळे याचे दुकानीं धरवर ठेविली आहे. ते घेऊन जाऊन पावती द्यावी तसें न केल्यास व्याज व कोर्टांत फिर्याद केल्यास कोर्ट खर्च मुळींच मिळणार नाहीं. कळावें. ता० ९ १०-११ इ०

सही

एकोबा वल्लद धनसींग पाटील राहणार पिंपळगांव काळे दस्तुर खुद.

नो० नं० ४४७

## नोटीस

नोटीस बेशमी— रामा वल्लद मारोती गुरव राहणार शाहापूर ता० खामगांव यांसः—

खालीं सही याजकडून उत्तर— तुमची नोटीस नोंद नंबर ४३२ वऱ्हाडसमाचार आकोला ता० २७९-११ ची पावली. तुमचा चुलता परशराम वल्लद नागो गुरव यानें **मजकडून रुपये ९० कर्ज घेऊन** त्याबद्दल आकोट **येथील** सर्वे नंबर ३९३ त रण गहाण लिहून दिला आहे. व सदर्हू दस्ताऐवज आकोट **येथील** संब रजिस्टर कचेरींत अ० नं० १२३१ सन १९०४ यांत नोंदला आहे. वरील सर्वे नंबर दस्ताऐवज नोंदल्या पासून आजवर माझे ताब्यांत नाहीं. आणि मी त्याची वाही पेरही केली नाहीं. दस्ताऐवजाप्रमाणें तुमच्या चुलत्याकडून व्याजासह रुपये घेणें आहेत. असें असून तुह्मी लबाडीनें आणि फसविण्याचे इराद्यानें नोटिशींत लिहितां कीं शत तुमच्या ताब्यांत असून एक वर्षापूर्वींच दस्ताऐवजाचे रुपयांची फेड झाली आहे. दस्ताऐवज आणि पावती मागण्यास आलो असतां दिली नाहीं. हें लिहिणें लबाडीचे आहे. करितां तुह्मांस या नोटिशीनें कळवितों कीं तुमचा मयत चुलता यानें लिहून दिलेलें गहाणाबद्दल मुद्दल रु० आणि व्याज याची १५ दिवसांचे आंत फेड करून त्याचे नांवें असलेलें गहाणखत आणि रु० पावल्याची पावती मजकडून घ्यावी व निकाल करावा असें न केल्यास तुमचेवर रितीप्रमाणें योग्य कोर्टांत दावा करून नोटीस व कोर्ट खर्चासह रक्कम वसूल करण्यांत येईल. कळावें. ता० ७-१०-११ इ०

सही

सिताराम नारायण आमनाथे गुरव राहणार आकोट द० खु०

नो० नं० ४४८

## नोटीस.

नोटीस बेशमी गोटाजी वल्लद दावलजी घोवी राहणार बहादरपूर प्रगणें कुरणखेड तालुके व जिल्हे आकोले यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मौजे कोलखेड जाहागिर येथील शेत सर्वे नंबर ४५ एकर ११ गुंठे २७ २७ आकार पट्ट्यासुद्धां रुपये २८८॥ सदर्हू शेताबद्दल दर निकरीस रुपये ३०० प्रमाणें रुपये ८७६८= म खरेदी घेण्याचा सौदा तारीख ६।९।११ रोजीं ठरला व त्यानंतर १५ दिवसांनीं खरेदीखत करून देण्याचें ठरलें त्यापैकीं तुह्मांस रुपये ६०० अगाऊ दिले [illegible]त व त्याबद्दल तुह्मी पावतीही दिली आहे. कीं रुपये २७६८३ खरेदीचे वेळीं नोंदणारे अंमलदारासमक्ष देण्याचें ठरलें आहे अझूनपर्यंत तुह्मी खरेदीखत करून दिलें नाहींत. तरी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत खरेदीखत करून नोंदून द्यावें. या प्रमाणें न दिल्यास कोर्टमार्फत दावा करून कायदेशीर तजविज केली जाईल. प ह्या नोटीशीचा खर्च तुह्मांस द्यावा लागेल कळावें ही नोटीस दिली तारीख ११।१०।११ इसवी.

सही

जैकृष्ण गंगाराम कुळकर्णी राहणार पळसोखुर्द पोष्ट बोरगांवमंजू दस्तुर खुद.

नो० नं० ४४९

## नोटीस.

नोटीस शेखकवडू वल्लद गुलमहमद राहणार आकोट यासः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी दुल्लनबी व करीमबी मर्द चांदखा रा० आकोट यांजपासून कजेब आकोट येथील शेत सर्वे नंबर ३४ पैकीं १३८३१ गुंठे आकार रुपये २७॥ चें शेत सालीम तुह्मी तारीख ३।८।११ रोजीं ताबेगहाण रुपये २०० यांस लिहून घेतलें आहे. सदर्हू शेतावर वरील इसमाचा तबा नसून ताबा आमचा आहे करितां तुह्मी शेतांत येऊं नये आल्यास आह्मी फौजदारी करूं तुमचा हक्क असल्यास तुह्मी दिवाणी मार्फत शाबीत करून घ्यावा. तसेंच सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, सदर्हू शेत व घर कोणी गहाण खरेदी घेऊं नये घतल्यास तें रद्द असें कारण शेताची व घराची मालकीण मी आहे. तारीख १२।१०।११

सही (उर्दूत.)

वजीरबी जवजे महमद युसुफ मु० राहणार आडगांव तर्फे मुखत्यार महमद खलीलुल्ला वल्लद महमद युसूफ दस्तुर खुःद

नो० नं० ४५०

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Registered No N. 4

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४५ ] आकोला—सोमवार तारीख ३० माहे आक्टोबर सन १९११ ई० [ अंक ४१

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........२ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
किंमच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
**सुचनाः–** गुरुवारच्या आंत येणाऱ्य नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल

---

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुप याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } G. A. Phillips.
आकोला ९।९।०९ } एजंट
नं १

---

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या **आकोले** व **उमरावती** येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती कारितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६⅔ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक } G. A. PHILLIPS.
आकोला २१-९-१० } एजंट.
नो० नं० २

---

## चांदीचीं भांडीं.

### खरें सचोटीचें दुकान.

आमचे दुकानीं शुद्ध चिनई चांदीचीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं विक्रीस तयार असतात. माल काळजीपूर्वक फशीर व्ही. पी. नें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल जोखिमदार राहूं. एकवार अनुभव घ्यावा.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन.
३३१ आदितवारपेठ, नासिक

---

## किर्लोस्कर बधूंना केलेलीं शेतकीचीं आउतं वगैरे.

१ कडवा कापण्याचें यंत्र नंबर "व" यानें कडवा कापून घातल्यास गुरांचे पोट भरून निमा कडवा वाचतो. किं० रु० १०-९-०

२ **लोखंडी नांगर नं १२** हा नांगर दोन बैलांनीं चालतो. माळ जमीन, मळीची जमीन, व भुईमुगाच्या शेंगा काढण्या कारितां याचा फारच उपयोग होतो किं. रु० १०-९-०

३ **लाखंडी मोठें नांगर** हे नांगर सह पासून आठ बैलानीं चालतात. विशेषे करून काळ्या जमीनीकरतां याचा फार उपयोग होतो. किं० रु० ३८-०-०

४ **आंबोळयाचें तवे नंबर "व"** हे तवे बिडाचे केलेले असून यावर एका बाजूस आंबोळया व दुसरे बाजूस पुरणाच्या पोळ्या करितां येतांत यांचा व्यास ११ इंच असून वजन अ[illegible] चार पक्के शेर आहे हा तवा बायकांना फारच आवडला आहे. किं० रु० १

**किर्लोस्कर बंधु**
**पोष्ट किर्लोस्करवाडी**
**[ स. औंध, जिल्हा सातारा. ]**
नो० नं० ३९६

---

### श्री राधावल्लभाजयाति

## वर्षफल।

हमारे पास सिर्फ १ पोस्टकार्ड पर किसी फल या फूल का नाम लिख भेजो हम आप के एक वर्ष का सुख, दुःख क्षोभ, हानि, जीवन, मरण, रोग, सन्तान तरेक्की, मौकूफी, व्यापार में किस वस्तु स लाभ होगा दिसावरी काम में कैसा लाभ होगा और जो महीना हानिकारक उस का उपाय महीनेवार वर्षफल वी० पी० द्वारा २। रुपये में भेज देंगे. हमारे हांय जन्म पत्रादि उत्तमोत्तम बनते हैं, अनेक प्रशंसा पत्र मौजूद हैं, विशेष परिचय के अर्थ ८॥ आना का टिकट भेज कर सूचीपत्र मंगो लीजीये.

मिलने का पत्ताः—
**गोस्वामी राधामोहन शर्म्मा**
**चित्तीखाना आगरा.**

---

### नोटीस.

नोटीस देणगी – लहानु हरीसा सोनार राहणार आकोट जिनगर ओळ ता० मजकुर जि० आकोला

यांसः–

खालीं सही करणार याजकडून उत्तर तुमची नोटीस नोंद० नं० ४४३ ता० ९-१०-१९११ ची पावली व मागेंही ता० १९-८-१० ई० चें नोटिशीतही काहींतरी खोटे लिहुन फारकत मागितली होती ह्या ता० १९-८-१० चें नोटिशीने मी तुमचे बहिणीस आणून घालावें ह्मणून उतर हीं ता० २२-८-१० रोजीं दिले होते. पण आपण तें नाकारिलें आणि नोटिशींचे पूर्वीं १०-१२ दिवसांनीं तुमचे आईनें मला जानगा अनासने यांचें घरीं बोलावून तुमचे बहिणीस माझे पासून गर्भ असल्याचें कळविलें व तुह्मीं स्वतःही ही गोष्ट पंचाना कळविली व त्याप्रमानें रा० रा० भवानसा गुहे यांनींही मला पंच मार्फत सुचना केली. ह्या गोष्टीस सरासरी १ वर्ष झालें तरी माझी स्त्री (मुली) ही अजून प्रसुत झाल्याचें कळत नाहीं, पण उलट असें ऐकण्यांत येतें कीं गर्भ वगैरे कांहीं नाहीं. आणि तुह्मी मला सरासरी २ महिन्याचें पूर्वीं तुमचे बहिणीस वागाविण्याविषयीं विचारिलें असतां तिला पंच मार्फत आणून घालावें ह्मणजे मी आनंदानें वागाविण्यास तयार आहे. पंचा शिवाय मी तिला वागविल्यास पंच मला बहिष्कार घालतील व पुढें आमचे संततीं सही तें नेइल आणि आह्मास उभयतांचा आजन्म नुकसान होईल अशा तऱ्हेनें मला दोषमुक्त करुन तुमचें बहिणीस आणून घालावें वगैरे पुष्कळ चांगल्या तऱ्हेनें तुह्मास समजावून सांगितलें असूनही तुह्मी मायेलकांनी माझें गर्भाचें वाटोळें करून आणि भलतेच कुच्छित विचार मनांत आणून माझी बायको मुली इजला मजकडे न पाठवितां खावटी खर्च व फार्कत घेऊं इच्छित आहांत तरी ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसांचें आंत लग्नाचा खर्च रु० ५०० पांचशे देऊन फार्कत घ्यावी. वरप्रमाणें आपले कडून तजविज न झाल्यास योग्य रीतीनें कोर्टात दावा करून मुली इजला ताब्यांत घेतलें जाईल. कळावें ता० २६-१०-१९११ इसवी

सही

रामकृष्णा वल्द भगवानसा सोनार
राहनार आकोट सोमवारवेस
दस्तुर यादोसा वा॥ विश्रामसा
सोनार राहणार आकोट

नो० नं० ४९१

---

### नोटीस

रा० रा० माधव राजाराम उ
सोनार राह० दहीहांडा ता०
य

खालीं सही करणाराकडून
देण्यांत येते कीं, आपली बायको
स्वभावानें असल्यामुळें तिच्याशीं
कोणत्याही मनुष्याचें समत नसल्यानें
दिवसामागें स्वयंपाक वेगवेगळे
विभक्तपणा अद्यापि मुळींच झाला
इस्टेटीचा हिस्सा माझा नवरा आ
यास न मिळावा ह्मणून माझे न
आजारी असतांना प्राणहारक औषध
ठार मारिले त्याचप्रमाणें माझ्या
लहान मुलाची पूर्वीं अशी स्थिती
व माझे दिराशीं विनाकारण तंटा
करून त्यास गांव सोडावयास
नंतर आपण मजवर वाइट नजर
ती मजला न रुचल्यानें का
मजला फार त्रास देऊन मोल
लावीले मधून मधून मी माझे
जाते वेळेस माझे आंगावरील
विश्वासानें आपणाजवळ ठेऊन जा
व परत येइ तेव्हां आपण ते
परत देत असत. तसेंच यांही
तुह्मां जवळ माझे ३००-४०० शे
किंमतीचे डागीनें तुह्मां जवळ ठेऊन
मुलाचें शिक्षण व्हावें ह्मणून माझे
जवळ बालाजीचे देऊळगांवीं
१९१० ई० सालच्या शेताच्या
बद्दल आपण मजला देत असलेल्य
रुपयापैकीं २० रुपये घेणें राहि
पाठवावे ह्मणून दोन पत्रें व रजीष्ट
पाठविलें. आपल्या मनांत बेईमानी
त्यानें पत्राचें उत्तर नाहीं रुपये न
रजिष्टर पत्रही घेतलें नाहीं ह्मणून
नोटीस देणें भाग पडलें. तरी
तारखे पासून आठ दिवसांत माझे
व मागील साळचे राहिलेले रुपये
नोटीच्या खर्चासह पाठवून देऊन
माझा व माझ्या दिराचा असे दोन्ही
माझा मुलगा नामदेव यादवसा
यांचे नावे करून द्यावा. मुदतींत मी
लिहिलेली सर्व व्यवस्था तुह्मांकडू
झाल्यास सरकारांत योग्य तजवीज
पुढें होणाऱ्या परिणामाबद्दल मीं
दार नाहीं.

सही

सई भवजे यादव सोनार
राहणार देऊळगांव
निशाणी हातची

नो० नं० ४९१

## नोटीस

नोटीस बेशमी पामार्ग व कुद् रामजी डेके राहणार बाभूळगांव जहागीर तलुके आकोले

यांस:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मी तुमचे बरोबर पाट लाविला. पाट लावण्याच्या अगोदरची माझी वडिल बहीण ही तुमची लग्नाची बायको आहे. माझा पाट लावण्याचेपूर्वीं तुह्मी उभयतां नवराबायको येऊन माझे बापास सांगितलें कीं, आह्मांस एक मुलगी आहे. वंश चालविण्यास मुलगा नाहीं व मजला होण्याची आशा नाहीं वगैरे बोलून पाट लावण्याबद्दल माझ्या बापाचें मन वळविलें. त्यावेळीं तुह्मां उभयतांशीं असें बोलले कीं माझ्या बापाचा वृद्धापकाळ झाला आहे. व त्याला भाकर घालण्यास कोणी नाहीं. सबब मी पाट लावूं इच्छित नाहीं. जर तुह्मी उभयतां असा करार कराल कीं, तुमचे उमगी येथील शेत माझे नांवें लावून द्यावे व तें दुसऱ्यास नफ्यानें लावून काढून मी आपले बापाचे घरीं नेहमीं शेतीचें काम करून राहावें व बाप मेल्यावर शेती आपली उभयतांची होईल. बापास बसले जागीं भाकर घालावी या प्रमाणें करारनामा लिहून द्याल तर मी पाट लाविते. नाहीं तर लावित नाहीं असें मी सांगितलें त्या वेळीं तुह्मी ह्या सर्व अटी कबूल केल्या व करारनामा लिहिण्या करितां कागद आणिला व पाट लाविल्यार कागद लिहून देऊं असें उभयतांनीं कबूल केलें. तुमची वडिल बायको ही माझी सख्खी बहीण असल्यावरून मजला तुमचा व तिचा विश्वास वाटला व त्या विश्वासानें मी पाट लावून घेतला; व सुमारें वर्षभर माझे बापाचें घरीं राहिलें व हल्लीं सुमारें चार पांच महिन्यापासून माझ्याशीं व माझ्या बापाशीं तंटा व मारहाण करितां त्यामुळें आमचे उभयताचें जिवास धोका आहे. माझ्या बापाचा वृद्धापकाळ झाला असून त्यास पोसण्यास काळजीचे दुसरे कोणी नाहीं तुह्मी करार केल्याप्रमाणें आपलें वर्तन न ठेविल्यास ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांत तुह्मी मजला फारकती द्यावी न दिल्यास हीच फारकती समजून तुमचा माझा नवराबायकोचा संबंध नाहीं असें समजलें जाईल. माझे बापाचे जिन्नगीवर मी तुमच्याशीं मोहतीर लाविले आहे. माझे दुसरें कांहीं गैरवर्तन दिसल्यास मी पंचाचो व सरकारची गुन्हेगार होईन तुह्मी ही नोटीस पावल्यावर आपलें वर्तन सुधारावे व कराराप्रमाणें न वागाल तर तुह्मी सरकारचे व पंचाचे गुन्हेगार रहाल व रीतीप्रमाणें तजविज केली जाईल कळावें. ही नोटीस दिली तारीख १२।१०।१९११

सही

बकी मर्द पामाजी माळी डोके हल्लीं वस्ती बाभूळगांव नि० खुद. निशाणीचा दस्तुर बापुजी संभाजी पाटील दस्तुर खुद.

नो० नं० ४९३

## नोटीस.

नोटीस देणार तुकाराम वा॥ सोनाजी अ० पा० मातुश्री सजनबाई मर्द सोनाजी इजकडून गणपत वा॥ सोनाजी पाटील राहणार आकोली ता० अकोट जि० आकोला यांस नोटीस देण्यांत येते ती येणें प्रमाणें:—

अज्ञान तुकाराम आणि तुह्मी असे सावत्र बंधु असून तुमचा बाप मरण्यास आज सुमारें तीन वर्षें झालीं मयत सोनाजी यानें मरण्यापुर्वी तेल्हारे येथील सराफ्यांत असलेली आपली रकम अजमास ७०००० ची काढून आणून त्यापैकीं रु. ३५००० अकोली व अजमास ३५००० पळसोड दुकानांत ठेविली होती पुढें थोडक्याच दिवसांनी तो मरण पावल्यावर पळसोड्याची रक्कम लोकांना देण्याकरितां ह्मणून तुह्मी व कीसन असे दोघे संगनमत करून घेऊन गेला. ह्याप्रमाणें सर्व रक्कम तुह्मीच दाबून टाकीली असून त्याचा हिशेब आजपर्यंत दाखवित नाहीं शिवाय बाप मेल्यानंतर बापाच्या वेळच्या असाम्याकडून अगर तो मेल्यावर तुह्मी केलेल्या असाम्याकडून काय वसुल केला त्याचाहि हिशेब दाखविला नाहीं. बापाच्या मागें त्या स्थावर जंगम इस्टेटीची व नगदी शीलकेची व सोनें चांदीची तुह्मी किसन वा॥ सुकदेव याच्या संगनमतानें अफरातफर करणें लाविली आहे. कीसनच्या मदतीनें तुह्मी असाम्याची तडजोड आपलें नुकसान करून करित आहां व तुह्मास तो भलतीच सल्ला देऊन तुमचें नुकसान करून स्वतःचा फायदा करित आहे. ह्या तुमच्या कृत्यानें अज्ञानाचें विनाकारण नुकसान होत आहे. सबब याबद्दल तुह्मी स्वतः जबाबदार आहां कीसन यानें तुमच्या मदतीनें मयताच्या असाम्या वसूल करून पैशाची अफरातफर केल्याचेंहि कळतें; त्याबद्दल त्याचेवर रितीप्रमाणें अलाहिदा दिवाणींत आणि फौजदारींत काम चालविण्याचा विचार आहे तथापि तुह्मांस ह्या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं:—

१ वडीलाच्या वेळच्या अगर तुमच्या हातानें केलेल्या कोणत्याहि असामीचें कर्ज तुह्मी एकट्यानें वसूल करूं नये व त्याबद्दल एकट्यानें पावती देऊं नये.

२ जुन्या अगर नव्या कोणत्याहि असामीची तडजोड तुह्मी एकट्यानें करूं नये व त्यास एकट्यानें पावती देऊं नये.

३ जी रक्कम तेल्हाऱ्याहून नेली आहे त्यापैकीं निमे रक्कम अज्ञानाची अज्ञानास द्यावी व त्याबद्दल माझी पावती घ्यावी.

४ ह्यापुढें कोणताही दस्तऐवज करणें झाल्यास तो उभयतां भावाच्या नांवाचा केला जावा व अज्ञानातर्फे पालन करणाराच्या जागीं माझे ( सजनचे ) नांव घालून सर्व प्रकारचे दस्तऐवज व पावत्या वगैरे होत जाव्या.

५ एकंदर तुमच्या ताब्यांत असलेल्या अकोली आणि मालठाणा येथील देवघेवीचा आणि शेतीचा बरोबर हिशेब ठेविला जावा.

६ आपल्या दुकानच्या घेण्यासंबंधानें सर्व प्रकारची फिर्यादी फाट्याची दिवाणी वा॥ फौजदारी कामें हीं सर्व आपल्या उभयतांचे नांवानीं व्हावीत व शेताचा माल व व्याजाचें उत्पन्न दाखल वाटलें जातें; व पळसोडें येथील शेतीची गेल्या दोन सालची कपाशीं तुह्मी नेली त्याचीहि रक्कम तुह्मी परत केली नाहीं ती करावी.

७ शिवाय ज्या ज्या व्यवहारांत अज्ञानाचे नफानुकसानीचा संबंध आहे असें देवघेवीचे सर्व व्यवहार एकट्यानें न करितां आपल्या उभयतांच्या सल्लेनें व नावानें केले जावे. तुह्मां एकट्यास अज्ञानातर्फे सर्व कारभार करण्याचा अधिकार नाहीं. ह्याप्रमाणें न केल्यास तुह्मी अज्ञानास जबाबदार रहाल व अज्ञानाचे व कायद्याने गुन्हेगार व्हाल:- —

८ तुमचा बाप मेल्यानंतर कवठळ आणि रायखेडें येथील कांहीं जमीन बापाच्या वेळच्या देण्यांत आली होती ती तुह्मी कांहीएक कारण नसता आह्मास न विचारतां अगदीं माती मोल किमतीस विकून टाकीली आहे असें कळतें असें करण्यास तुह्मा एकट्यास अधिकार नव्हतां व ह्यापुढें तुह्मी एकट्यानें आपल्या नांवाचा कोणताहि दस्तऐवज करून घेऊं नये अगर एकट्यानें कोणास कोणताहि दस्तऐवज करून देऊं नये अगर पावती वगैरे देऊं नये.

९ दुसरें तुह्मी दुसऱ्याच्या सल्लेनें वागून विनाकारण जिनगीचे नुकसान करित आहां व त्यामुळें विनाकारण अज्ञानाचें नुकसान होत आहे. करितां ह्यापुढें एकत्रपणांत राहण्यांत माझें मनांत नाहीं; करितां नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचें आंत उभयतांमध्यें सर्व स्थावर जंगम जीनगीची वाटणी करून टाकावी; तसें करण्यांस तुह्मीं राजी नसल्यास मजला हिस्सा मिळण्याकरितां फिर्याद दाखल करावी लागेल तसें झाल्यास त्याबद्दलचा खर्च तुह्मा एकट्यासच भरून द्यावा लागेल.

१० तुह्मी दुसऱ्याच्या नादीं लागल्यामुळें विनाकारण इस्टेटीचें नुकसान होत आहे, व दुसरे आपला फायदा करून घेत आहे सबब लवकर हिशेवाटे करून द्यावें ह्मणून ही नोटीस देत आहे.

द० वासुदेव बाळाजी पिंपळीकर वकील खामगांव ता० २८।९।११ इ.

सही

सजनाबाई मर्द सोनाजो निशाणी खुद बांगडी असे

नो. नं ४९४

## जाहिर नोटीस.

खालीं सही करणार तुकाराम वा॥ सोनाजी अ० पा० मा० सजनबाई मर्द सोनाजी तर्फे वकील वासुदेव बाळाजी पिंपळीकर याजकडून सर्वत्रास जाहिर नोटीस देण्यांत येते ती येणें प्रमाणें:—

आमचा पक्षकार अज्ञान तुकाराम वा॥ सोनाजी रा० पळसोड ता० जळगांव जि० बुलढाणा यास गणपत वा॥ सोनाजी या नांवाचा सावत्र वडिल भाऊ आहे. व ता आकोली ता० आकोट जि० आकोला येथें रहातो हे दोघे बंधू अविभक्त आहेत उभयतांचा बाप मरण्यास आज सुमारें तीन वर्षे झालीं असून बाप मेल्यापासून आजपर्यंत गणपती यानें बापाच्या वेळच्या स्थावर जंगम जिनगीची अफरातफर करण्यास आरंभ केला आहे. या सर्व कामांत पुर्वीचा गुमास्ता किसन वा॥ सुकदेव याची त्यास मदत आहे. व हे उभयतां अज्ञानाचें नुकसान व्हावें या हेतूने वर लिहील्याप्रमाणें मयत सोनाजीच्या स्थावर जंगम जिनगीची लबाडीनें अफरातफर करित आहेत. त्या मुळें अज्ञानाचें नुकसान होत आहे व पुढेंही होईल— करितां मयत सोनाजी याच्या सर्व असाम्यास व शेताच्या खेड लोकांस व सावकारांस व इतर ज्या लोकांस गणपतीशीं देवघेव करण्याचा प्रसंग पडेल त्या सर्व लोकांस कळावें कीं एकट्या गणपतीशीं केलल्या देवघेवीची तडजोड करण्यासंबंधानें, अगर वसूल देऊन पावती घेण्यासंबंधानें, अगर मयत सोनाजीच्या एस्टीटेशीं करावयाच्या कोणत्याही व्यवहारसंबंधानें, अज्ञान तुकाराम याचा भाऊ गणपत यासी व्यवहार करण्याचा प्रसंग आल्यास त्यांनीं त्या एकट्याशीं कोणत्याही प्रकारचा व्यवहार करूं नये अज्ञानातर्फे वरील प्रकारचा कोणताही व्यवहार करण्यास त्यास अधिकार नाहीं. एकट्या गणपती बरोबर केलेल्या व्यवहारामुळें अज्ञान हा बांधला जाणार नाहीं अज्ञानतर्फे सर्व व्यवहार करण्याचा अधिकार अज्ञानाची मातुश्री सजनबाई इजकडेस आहे. कळावें ही जाहिर नोटीस असे. ता० १३ माहे आगक्टोबर सन १९११ इ०

सही

वासुदेव बाळाजी पिंपळीकर वकील

विषेश सुचना.

१ मारुती वा॥ मोंढाजी पाटील रा० मालठाणें ता० आकोट

१ सोनाजी वा॥ उदेभान पाटील रा० मालठाणें ( सदहू )

१ पुंडू पाटील मालठाणें.

१ लालसिंग रजपूत मालठाणें.

१ नारायण आत्माराम दानापूर ता० आकोट.

ह्यावरील असाम्यांनीं ह्या नोटीसीची नोंद विशेष करून घ्यावी.

खामगांव ता० १३।१०।११ } वा० बा० पिंपळीकर. वकील

नो० नं० ४९५

## जाहिरात

वर्षफल—प्रत्येक महिन्याचे फलासह लाभालाभ सुखदुःख कळवूं. फी. ३ रुपये वर्ग २ चे २ रुपये. खर्च ८= जन्म काल, जन्म अथवा चालू नांव कळवावें.

पत्ता— भा० गो० पंडित, रा० व पो० लोणखेड जि०प. खानदेश

## नोटीस

नोटीस वेशमी-- संपत वल्द मुकुंद महार राहणार अंदूरा ता० बाळापूर यांस.

खालीं सही करणार हिजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको आहे. लग्न झाल्यास १२ वर्षे झालीं मी शहाणी झाल्यावर १ वर्ष तुमचे घरीं होते. हल्लीं दोन वर्षांपासून तुह्मी मला मारझोड करिता व वागवीत नाहीं सबब मी आपले आई बापाचे घरीं वेगळी राहते तुह्मी मला न वागविल्यामुळें मी सावकाराचें कर्ज काढून उदरनिर्वाह करीत आहे आतां तुमचे मनांत वागविणें असल्यास ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत मला झालेलें कर्ज रु० १०० देऊन मला आपले घरीं घेऊन जवें. तसें न केल्यास हीच नोटीस फारकत समजून मी दुसरा घरठाव करीन. मग तुमचा नवरेपणाचा हक्क चालणार नाहीं. कळावें. तारीख २४।१०।११ इ०

सही

अनी मर्द संपत निशाणी

हातची बांगडी.

निशाणीचा दस्तुर संपत व० गणु

राहणात निमकर्दा.

नो० नं० ४५६

## नोटीस

पांडूजी वाघोजी जात तेली अडनांव वाळके रा० मौजे यवती तालूके व पोष्ट वाशीम यांस. —

खालीं सही करणार इजकडून अती नम्रपणानें या नोटिशीचे द्वरे आपले चरणापाशीं प्रार्थना करिते कीं मीं तुमची लग्नाची बायको आहे मी वयात आल्यास ५।६ वर्षें झालीं. माझा कोणतेही प्रकारचा अपराध नसतांही आपण मजला नांदवीत नाहीं. मी नांदत असतांही आपण निरपराध मजला मारठोक करून घराबाहेर काढून देता इतकेंच नाहीं तर माझें घरीं तूं पुन्हा आल्यास तुजला जिवें मारीन असें ह्मणता त्यामुळें मी निरुपाय होऊन तेव्हांपासून मी रिसोडास राहात आहे व तेव्हां पासूनच लोकांचें कर्ज काढून खात आहे आत तर मजला कोणी कर्जही देत नाहीं त्यामुळें खाण्यापिण्याची व वस्त्राची मजला भ्रांति पडत आहे करितां विनयपूर्वक मी आपणास कळविते कीं ही नोटीस आपणास पावल्यापासून आठ दिवसांचें आंत आपण रिसोडास येऊन मजला लोकांचें झालेलें कर्ज रुपये ३०० तीनशे तुह्मी देऊन टाकावें आणि माझे जिवित्वाचे संरक्षणार्थ व योग्यप्रकार नांदणुकीचा असें योग्य लेखी जामीन देऊन मजला घेऊन जावे मी नांदण्यास कबूल आहे याप्रमाणें आपणाकडून मुदतींत वर्तन घडून न आल्यास निरुपाय समजून माझे निर्वाह करितां दुसरा विचार करणें मजला भाग पडेल. हीच तुमची फारकती आहे असें मी समजुन दुसरा नवरा करीन मग तुमचा नवरेपणाचा कोणतेही प्रकारें हक्क मजवर चालणार नाहीं मजला दुसरा नवरा करण्याची तुमची संमती आहे असेंच समजले जाईल ता० १७।१०।११ इ.

सही

शेवंती जवजे पांडुजी वाळके यवतीकर मु० रिसोड नि॥

नो. नं. ४५७ खुद्द हातची बांगडी

## नोटीशीचें उत्तर

श्रीमंत मा. रा. रा. शेट रघुनाथदास रामप्रताप मा. लक्ष्मीनारायण रामप्रताप साहू दुकान आकोला

खाली सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं तुह्मी वऱ्हाडसमाचारमधून दिलेली नोटीस तारीख ३०-९-११ रोजीं पावली. तीचे उत्तर देतो ते-- मुकत्यारपत्र रद्द केल्याची नोटीस तारीख ३०-९-११ रोजीं मिळाली ता. १।।८।११ रोजीं रद्द केल्याबद्दल सांगितले नाहीं. रिणको गोविंद गोपाळ व गणेश मुनशी याचा ६०० रुपयाचा गहाणाचा दस्तांऐवज सापडत नाहीं तो वकीलाकडेस नेण्याकरितां घेतला होता ह्मणून लिहितां तर मी दस्ताऐवज घेतला नाहीं व माझेजवळ दस्ताऐवज नाहीं. एक जुनाट व रद्दी पडलेली सायकल तुह्मी मला इनाम ह्मणून दिली तेव्हांपासून माझेजवळ असून तिला माझे पैशानें दुरुस्त करून वापरीत आहे व वारंवार लागेल तो खर्च माझे पैशानें करीत आलो आहे या शिवाय दुसरी सायकल मजजवळ मुळींच नाहीं. नोटिशीचें उत्तर तुह्मास देऊन मोठ्या विनंतीनें कळवितो कीं मी माझा हिशोब अनेकवेळ तुह्मास मागितला परंतु दिला नाहीं. तरी ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत माझा हिशेब नोटिशीपर्यंतचा व सायकल इनाम तुह्मी मजला दिलेली वापस घेऊं इच्छीत असल्यास आजपावेतो माझा झालेला खर्च माझा मजला द्यावा मी मोठ्या आनंदानें तुह्मी मला इनाम दिलेली सायकल परत देण्यास तयार आहे. तुह्मी नोटीस दिली त्यांत माझे हिशोबासंबंधानें कांहींच उल्लेख केला नाहीं. जर वरीलप्रमाणें माझे मागणें कबूल असेल तर मला देऊन पावती घ्यावी कबूल नसल्यास तुह्मी प्रतिज्ञेपुर्वक चवघासमक्ष देणें कबूल नाहीं असे ह्मटल्यास तुमचे प्रतिज्ञेवर माझे सर्व पैसे मी सोडण्यास तयार आहे. व तुह्मी इनाम देलेली सायकल मोठ्या आनंदानें वापस देण्यास तयार आहे. तुमच्या सारख्या श्रीमंताची कोणत्याही प्रकारची बरोबरी करण्याची इच्छा नाहीं. कळावें. तारीख ११।१०।१९११ इ० सही

यशवंत माधव पसारकर

नो. नं. ४५८ आकोला द० खु०

## जाहिर नोटीस

नं०

सर्वत्र लोकांस या जाहिर नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं माझा सावत्र मुलगा गोविंदा हा व मी माझे मालका समक्ष एकत्र राहत असून गोविंदा हा दोन वर्षें झाले मयत झाला. नंतर मयताची बायको सोनी हिचे व माझे न बनल्यामुळें ती वेगळी राहिली. वेगळी राहिले दिवसापासून मी तिला आतांपर्यंत खाण्यापिण्यास देत होते व आतांही देण्यास तयार आहे. परंतु अलिकडे लोकांनीं तिला फितुर दिल्यामुळें माझे अज्ञान मुलाचे जिनगीवर कर्ज काढण्याच्या व शेती कमी किंमतीनें लोकांस लावण्याच्या तर्जविजित आहे असे मला कळले. माझा मुलगा अज्ञान असल्यामुळें अज्ञानाचे जिनगींत कोणी ढवळाढवळ करूं नये. खरेदी, फरोक्त अथवा कोणतेच तऱ्हेची देवघेव करूं नये जो कोणी अशी ढवळाढवळ करतील. देतील, घेतील ते कायदा प्रमाणें फौजदारी व दिवाणी कोर्टाचे शिक्षेस पात्र होतील ही जाहिर नोटीस दिली ता० १४।१०।११

सही

मोतीराम वा॥ गणपत अज्ञान पालन करणार आई गिरजाई मर्द गणपत राहणार काळवाडी ता० आकोट निशाणी खुद्द.

नो० नं० ४५९

## नोटीस

गोपाळ सोनाजी कुळकर्णी राहणार आडोळ खुर्द तालूके जळगांव यांसः—

मी खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी व माझा नवरा बाळाजी असे अवघे बंधु असून वडिलोपार्जित इस्टेट असून एकेच ठिकाणीं राहत होतो. व माझे नवऱ्यास मरण्यास अजमासे पांचसहा वर्षें होत आलीं असून तेव्हां पासून मी आपले आईबापाचे घरीं आतांपावेतो असून एक दोन वेळां अन्नवस्त्रा संबंधानें बंदोबस्त करावा किंवा मला वागवावें. त्यापैकीं कोणतीच गोष्ट कबूल करीत नाहीं व तुह्मास कायद्यानें माझा अन्नवस्त्राचा हक्क असून ते तह्मी देत नाहीं हें बरोबर नाहीं. माझे आईबाप घरचे फार गरीब असून त्याच्यानें माझा अन्नवस्त्राचा बंदोबस्त होत नसून माझे अन्नवस्त्राच्या प्रित्यर्थ सावकाराचें कर्ज दोनशें अठ्याशी रुपये आज पावेतों काढून खाल्ले. व बापानें माझे नवऱ्यास जिवंत असते समई करणवाडी येथील शेत सर्वे नंबर १२ एकर २० गुंठे ३७ आकार रुपये १०॥।॥ असे शेत सन १२०२ सालांत हरासात ५५ रुपयास माझे नवऱ्याचे नांवानीं घेतले त्या शेतावर कोणाचा हक्क नसून माझा एकटीचाच हक्क आहे ते शेत तुह्मी स्वतः वाहून व भाडेपट्यानें देऊन त्याचें उत्पन्न मजला न देतां तुह्मी खातां त्या शेतावर माझा हक्क असून तुह्मांस मागितले असतां देत नाहीं हें बरोबर नाहीं. तुह्मांस या नोटीसीनें कळविण्यांत येतें कीं तह्मी सावकाराचें कर्ज अदा करून व वरील शेताचें उत्पन्न आजमासें एकंदर ६०० रुपये सहाशे सदरवर्षांचे रुपये देऊन शिवाय शेत माझे ताब्यांत द्यावे. व अन्नवस्त्रा संबंधानें माझा बंदोबस्त करावा व नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत नोटीशी प्रमाणें न केल्यास योग्य रीतीनें कोर्टांत दावा करून कोर्ट खर्च व नोटिशीचा खर्च तुह्मापासून घेतला जाईल करितां नोटिशीनें कळविलें आहे. कळावें

ता. २०।११।१९११ इ.

मुक्काम खामगांव सही

सहीची निशाणी चंद्रभागा जव[...]

बाळाजी कुळकर्णी राहणा[...]

हल्लीं पिंपळगांव काळे हिच[...]

हातची निशाणी

दस्तूर गोपाळ एकोबा.

नो नं. ४६०

## नोटीस

नोटीस वेशमी गोविंदा वा॥ जानज[...] मुनार रा० काजळेश्वर ता॥ आकोल[...] यांस–

खालीं सही करणार याजकडू[न] नोटीस देण्यांत येते कीं आंदाज [...] महिनें झाले असतील तुह्मी मजजवळ[...] जिनसा गहाण ठेऊन रोख रुपये २[...] व्याजानी घेऊन गेले व व्याजासुद्धां रु[...] ४ चार महिन्यांनी देऊं असा कर[ार] केला. त्याप्रमाणें दिले नाहींत. गहा[ण] मालाचा तपशील.

भांडे पितळी

१ पानदान. १ पळी. १ ग्लास १ बहुगु[...] १ वाटी १ गडवा १ परात.

किरकोळ.

१ चिमणी लोखंडी १ बाटली कांचे[ची] १ वाटी लांकडाची १ करंडा लांक[डाचा] १ वह्या कागदाच्या ७ सात १ पुस्तक का[गदाचे] १ ताडपत्राचे वंशावळीचे पुस्तक १ याप्रमाणे माल तुह्मी आमचे येथें ठेऊ[न] रुपये नेले. कराराप्रमाणें रुपये दिले नाही[त] ही तुमची लबाडी दिसून आली. करि[तां] नोटीस पावल्यापासून १० दिवसाचे आं[त] व्याजासुद्धां आपले रुपये देऊन गहाणमा[ल] घेऊन जावे यांत चांगले आहे. जर अ[से] न केल्यास आह्मी तुमचेवर कोर्टांत फिर्या[द] करून कोर्ट खर्चासुद्धां रुपये भरून घे[ऊं] व याबद्दल सरकार आह्मास इन्साफ देई[ल] नोटिसीचा जबाब द्यावा. कळावें तारी[ख] २५।१०।११ इ० दस्तुर रामराव आप्पा[...]

सही

गोविंदा वल्लद रामजी ह्माळी या[...] हातची निशाणी असे

रा० काजळेश्वर

नो० नं० ४६१ पो० बार्शीटाकळी


## विहार आनन्दका सागर रंगीन तसवी[र] सहित चारों भाग तथा पांचों अंग [...] सचित्र कोख शास्त्र.

असली हमसे मगावो धोकेसे बचो [...] पुरुषोंके जात, भेद, लक्षण अनेक देश[...] स्त्रीनायका, कुमारी प्रकृती, सत्व दु[...] कुलटा, पतिव्रता, व्यभिचारणी आदि[...] 'पहचान, रजोधर्म लक्षण, ऋतुविहार [...] सहवास स्थान क्रया, शैय्यातिथ, कामस्थ[...] साळासगीर, बतीसोआभूशण, बस्त्रआदिवमध[...] पुत्रस्टीकर्म, नपुंसकविद्या, उपदंश प्रमेह अ[...] अनेक रोगोंकी चिकित्सा औषधि, प[...] भाषा जाननेकी रीति, मंत्रतंत्र, यंत्र, व[...] करण मुद्रा विद्या आदि अमुल्य विषय[...] भेंट र किंमत रु०

पं० गंगाप्रसाद इंजीनियर शहाप[...]

नो० नं० ७७ अलीगडसी[टी]

## नोटीस

रा. रा. गोपाळ बाळकृष्ण शिंगणापुरे साहू दुकान कुरणखेड

यांस–

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं आह्मी तुह्मास १४-१०-११ रोजीं पैलपाडा येथील स. नं. ७६ मधील पश्चिमेकडील बाजूचा पांचषष्ठांश हिस्सा १२५० रुपयांस विकत दिला. पण तुह्मी १९-२-१९०७ च्या गहाणाचा हिशोब अद्याप केला नाहीं, व बाकीची रक्कम अजून मला चुकती दिली नाहीं. फक्त ७ कुडव गहूं तुमचे माझ्याकडे आहेत. त्याची किंमत रुपये १-८ आणे वजा करून माझी बाकीची रक्कम चुकती करून द्यावी. ही नोटीस पोचल्या तारखेपासून आठ दिवसांच्या आत वरप्रमाणें वर्तन न केल्यास माझ्या राहिलेल्या रकमेला व्याज दुहोत्राप्रमाणें चालूं राहील. तुमच्या भलाईकीच्या भरवशावर मी खरेदी नोंदून देतेवेळीं भरणा कबूल केला आणि तुह्मी गहाणखतही रद्द करून परत दिलें; आणि बाकीची रक्कम दिली नाहीं. ह्मणून ही नोटीस देणें भाग पडलें आहे. तुमच्याकडून सर्व रक्कम चुकती मिळेपर्यंत तुमच्या ताब्यांत मी शेत देणार नाहीं; आणि माझी रक्कम परत येईपर्यंत माझ्या रकमेच्या व्याजाऐवजी मी पीक घेत जाईन. कळावें. या नोटिशीचा खर्च तुह्मावर पडेल. तारीख २३-१०-११ इ.

सही

साहेबराव सुरेभानजी राहणार पैलपाड ता० आकोला द० खु०

नो० नं० ४६२

## नोटीस

रा० रा० "हरदेव जिवनराम" मालक जिवनराम हरदेव साहू दुकान आगर

यांस–

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी ९-१०-११ रोजीं माझेकडून आगर येथील सर्व्हे नंबर ९१ यांतील एकद्वितीआंश हिस्स्याचें खरेदीखत करून घेतलें पण खरेदीचे किंमतीपैकीं ७७५ रुपये तुह्मी माझे पदरांत टाकले नाहींत आणि परभारेंच परशराम बाळाजी याचे पदरांत टाकले. ही रक्कम तुह्मी माझे इच्छेविरुद्ध त्याला दिली सबब ही नोटीस पोचल्यापासून ८ दिवसाचे आंत सव्याज रक्कम माझे घरीं आणून पोचती करावी व पावती घ्यावी. तसें न केल्यास रितिप्रमाणें कोर्टांत दावा केला जाईल. तुह्मी शेतांतील उभें पीक मागूं लागला ह्मणून कांहीं गडबडीचा संशय आल्यावरून मी कालरोजीं खरेदीखताची नक्कल घेतली. तेव्हां असें दिसलें कीं तुह्मी लबाडीनें खरेदीखतांत यंदाचें उभें पीक लिहून घेतलें आहे. हें उभें पीक घेण्याचा तुमचा अधिकार नाहीं व तें पीक तुह्मास नेऊं देणार नाहीं. या जाहिर लेखानें शेतांत येण्याची व पिकास हात लावण्याची तुह्माला मनाई आहे. जर तुह्मास हक्क वाटत असल्यास तुह्मी दिवाणीचा रस्ता धरावा. आणि वरील रुपये ७७५ सव्याज येईपर्यंत पुढील सालींही तुह्मास शेताचा ताबा देणार नाहीं कळावें. ता० २८-१०-११ इ०

सही

सखाराम पुर्णाजी कोळी राहणार चहोट ता० अकोट निशाणी खुद्द

नो० नं० ४६९

---

## मुसलमान आणि बहिष्कार.

बंगाल्यांत व इतर प्रांतांतून जेव्हां बहिष्काराची चळवळ जारीनें सुरू होती, तेव्हां मुसलमानबंधु सरकारची प्रीति संपादण्यासाठीं ह्मणा अथवा स्वबुद्धीनें स्वयंप्रेरित होऊन ह्मणा पण बहिष्काराचे विरुद्ध आपलें मत मोठ्यानें ओरडून सांगत होते, आणि आतां तुर्कस्थान व इटालीयाचें युद्ध सुरूं होतांच तेच लोक शक्याशक्यतेचा विचार न करितां इटालियन मालावर बहिष्कार घालण्यास उद्युक्त झाले आहेत ! पण यांच्या बहिष्कारापासून इटलीचे कितीसें नुकसान होणार आहे ? इटलीहून येणारा माल ह्मणजे कपडा, पोंवळीं, रंग, रेशीम वगैरे होय. या सगळ्या मालाची किंमत एकंदर आठ लक्ष पौंडसुद्धां होत नाहीं. आतां यांच्या उलट हिंदुस्थानांतून तेहतीस लक्ष पौंड किंमतीचा माल इटलीला जातो. आणि गंमत ही आहे कीं हा सगळा व्यापार आमच्या मुसलमानबंधुंच्याच हातीं आहे ! तेव्हां इटलीच्या मालावर बहिष्कार घालण्याचा मद्रासच्या मुसलमानांचा यत्न 'कीलोत्पाटीव' वानराप्रमाणें आत्मघाताचा आहे हें उघड होतें. हिंदुस्थानचे मुसलमान आपल्या तुर्कस्थानांतल्या जातभाईसाठीं येवढें व्यापाराचें नुकसान सोसण्यास तयार आहेत काय ?

---

## साहित्य समागम

### लॉर्ड कर्झन साहेबांची कारकीर्द

थोड्या दिवसांपूर्वी टाइम्स ऑफ इंडिया पत्राचे माजी संपादक मि० फ्रेजर यांनीं लिहिलेल्या कर्झन साहेबांच्या कारकीर्दीच्या इतिहासाची जाहिरात रूटरनें इकडे तारेनें पाठविली होती व त्या पुस्तकाला लॉर्ड मिल्नर यांनीं प्रस्तावना लिहून जोडली आहे असें मुद्दाम कळविलें होतें. रूटरनें तारेनें जाहिरात देण्याइतकें महत्त्वाचें या ग्रंथांत काय आहे हें पाहण्यासाठीं हिंदुस्थानचे लोक मोठेसे उत्सुक आहेत असें नाहीं. कारण, कर्झन साहेबांचा अरेरावीपणा, हिंदुस्थानच्या राज्यकारभाराच्या धोरणांत त्यांनीं केलेली उलथापालथ, देशी लोकांना दडपून टाकण्याचें त्यांचें धोरण, त्यांचे उद्दामपणाचे उद्गार, वगैरे गोष्टी हिंदुस्थानचे लोक इतके लवकर विसरतील हें शक्य नाहीं. कर्झन साहेबांनीं जातांना मुंबइच्या टाइम्सची केलेली प्रशंसा ज्यांच्या ध्यानांत आहे त्यांना मि० फ्रेजर यांचा इतिहास ह्मणजे कर्झन साहेबांच्या पोवाड्याचें पुस्तक आहे हें सदर पुस्तक न वाचतांना कळण्यासारखें आहे. सदर पुस्तकाला प्रस्तावना जोडण्याचें कामही लॉर्ड कर्झनची दुसरी प्रतिमाच अशा दक्षिण आफ्रिकेंतल्या हिंदी रहिवाशांची विटंबना करणाऱ्या लॉर्ड मिल्नर साहेबांनीं लिहिली आहे हेंही योग्यच आहे. लॉर्ड मिल्नर यांचे हिंदुस्थानाविषयींचें अगाध अज्ञान प्रस्तावना लिहिण्याचें काम पतकरण्याचे आड बिलकूल आलें नाहीं हें त्यांच्या अंगच्या धृष्टतेचें प्रत्यक्ष प्रमाण आहे. बंगालची फाळणी, लष्करीखात्याची नवी व्यवस्था वगैरे कर्झन साहेबांच्या कारकीर्दींतल्या ठळक गोष्टींचा नुसता उल्लेख मुद्धां प्रस्तावनेत केलेला नाहीं यावरून त्या प्रस्तावनेची किंमत कोणालाही सहज करतां येणार आहे. कर्झन साहेबांच्या कारकीर्दीचें नव्हे तर खुद्द कर्झन साहेबांचें स्तुतिस्तोत्र गाणें हाच उद्देश मिल्नर साहेबांनीं डोळ्यापुढें ठेवलेला दिसतो. त्यांना कर्झन साहेबांच्या अंगीं पहिला मोठा गुण उद्योगतत्परता हा दिसला. कर्झन साहेब मोठे उद्योगी होते याविषयीं मुळींच मतभेद नाहीं. पण त्या उद्योगाचा कल ज्या लोकांचा पगार ते खात होते त्यांच्या महत्त्वाकांक्षा, व उमेदी दडपून टाकून त्यांना कायमच्या अधोगतीला नेण्याकडे होता ही गोष्ट सत्यप्रिय इतिहासकाराला कबूल करावी लागेल. कर्झन साहेबांच्या अंगचा दुसरा गुण ह्मणजे कामची त्वरा. या त्वरेनें त्यांच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांना सळोका पळो असे करून सोडले होते. आजपर्यंत कोणत्याही गव्हर्नरजनरलांनें केलीं नाहींत इतकीं कामें आपण केलीं अशी फुशारकी मारण्याकरितां कीं काय कोणजाणें, राज्यकारभारांतलीं अत्यंत महत्त्वाचीं कामें कर्झन साहेबांनीं लोकमताची पर्वा न करतां व परिणाम काय होईल याचा विचार न करतां त्वरेनें करून टाकलीं खऱ्या मुत्सद्याचें हेंच लक्षण काय ? ज्या लोकांवर राज्य करावयाचें त्यांच्या विषयीं सहानुभूति मनांत वागविण्या इतकी मनाची उदारताही लार्ड कर्झन साहेबांच्या ठायीं नव्हती. इतकेंच नाहीं तर दुसऱ्यानें दाखविलेली सहानुभूतिही त्यांना खपत नसे. परमपूज्य व्हिक्टोरिया राणी साहेबांच्या १८५८ सालच्या जाहिरनाम्यास त्यांनीं 'अशक्य सनद' असें विशेषण लावून हरताळ फासण्याचा यत्न केला होता. हिंदुस्थानच्या शेतकरी व मजूर लोकांविषयीं त्यांना सहानभूति वाटत असे असें सांगण्यांत येत असतें. पण या लोकांच्या तरी कल्याणाच्या अशा कोणत्या गोष्टी त्यांनीं केल्या आहेत ? 'तुमचे काबाडकष्ट आह्मांस पाहिजेत, पण तुह्मी वर मान करून अपले न्यायाचे हक्काच्या गोष्टी सांगाल तर मात्र तुमचे विषयींची आमची सहानुभूति नष्ट होईल' हाच त्यांच्या सहानभूतीचा खरा अर्थ. अशा माणसाची खरी जागा ह्मणजे एखाद्या कडक शिस्तीच्या अंमलदाराचे हाताखालीं कारकुनानें काम करण्याची होय. अशा माणसाचे हातांत दुसऱ्याचें कल्याण अकल्याण करण्याचें जबाबदारीचें काम मुळींच असतां उपयोगाचें नाहीं. पण हिंदुस्थानच्या दुर्दैवानें तीस कोटि लोकांवर अंमल करण्यास प्रधानमंडळानें त्यांना इकडे पाठविलें. प्रधानमंडळाच्या हातून येवढी घोड्यायेवढी चूक दुसरी क्वचितच झाली असेल. त्या चुकीचा परिणाम गेल्या पांच वर्षांत हिंदुस्थान भोगीत आलेच आहे, आणि विलायतेंतही कर्झन साहेबांच्या नालायखीचें प्रत्यंतर अनेक वेळां येऊन चुकलें आहे. कर्झन साहेबांच्या कारकिर्दिच्या इतिहासाला जर नैतिक महत्त्व कांहीं असेल तर भावी अधिकाऱ्यांना इषारत देण्यास या सारखें उत्तम पुस्तक नाहीं या दृष्टीनेंच आहे अफाट दर्यामध्यें भयंकर व मोठाले खडकाचें स्थळ निर्दिष्ट करण्याचे कामीं दीपस्तंभ जसा उपयोगी पडतो, त्याच प्रमाणें कर्झन साहबांची विशाल व धामधुमिची कारकीर्द हिंदुस्थानच्या राज्यकारभारांतले भयंकर खडक अडचणीच्या जागा मुत्सद्दी लोकांस दाखवून त्यांना सावध करण्यास उपयोगी पडल इतकीच या ग्रंथाची योग्यता आहे.

### आंग्लोइंडियन ग्रंथकार.

अलीकडे हव्यात्या आंग्लो–इंडियनानें उठावें आणि हिंदुस्थानाविषयीं हवें तें लिहून पुस्तक काढावें असा प्रघात पडला आहे. हे लोक चांगल्या अधिकाराचे जागीं असतात, किंवा स्वतंत्र धंद्यांत असले तर श्रीमंत लोकांशीं त्यांचा चांगला परिचय असतो, यामुळें अशांचीं पुस्तकें खपण्यास मुळींच पंचाइत पडत नाहीं. अशा ग्रंथकर्त्याविषयीं प्रसिद्ध मुत्सद्दी राजा सर टी माधवराव काय ह्मणतात पहा. ते ह्मणतात—'या लेखकांचीं मतें व विचार फार जपूनच स्वीकारले पाहिजेत. यांना कांहीं माहिती नसते, कामाचा अनुभव नसतो, किंवा जबाबदारीची जाणीव नसते. कित्येक लेखक हव्या त्या गोष्टीपासून सरसकट अनुमानें काढतात. कित्येक नुसते तर्कटी असतात. त्यांना व्यवहारांतली शक्याशक्यता कळत नाहीं. कित्येक देशी संस्थानिकांना किंवा पोलिटिकल खात्याला खुष करण्यासाठीं कांहीं तरी लिहितात. कित्येकांचा हेतु [illegible]यक असतो. कित्येक स्वार्थसाधु असतात. कित्येक स्वतःचें लेखन कौशल्य, हुशारी, व औदार्य दाखविण्याकरितां लिहितात. कित्येकांचा हेतु ब्रिटिश अंमलाची थोरवी गाणें येवढाच असतो. अशा लेखकांनीं लिहिलेलें सगळें डोळे झांकून स्वीकारतां कामा नये. सगळेंच टाकूनही उपयोगी नाहीं. सारासारविचार ठेवून असे ग्रंथ वाचावे; आंग्लोइंडियन अधिकारी व बिनसरकारी लोकांत नेहमीं वागणाऱ्या धूर्त व विचक्षण अशा हिंदी मुत्सद्याचे हे विचार तीस वर्षांपूर्वीचे आहेत. तरी ते जणूं काय सद्यःस्थितीला उद्देशूनच काढले आहेत कीं काय असें वाटतें.

---

वऱ्हाडसमाचार

कार्तिक शुद्ध ८ शके १८३२ दुंदुभिनाम संवत्सरे

## सध्याच्या महर्घतेची मीमांसा

गेल्या तीनचार वर्षांत महर्गतेनें जें तीव्र स्वरूप धारण केलें आहे त्यामुळें लोकांचें व सरकारचें लक्ष साहाजिकच तिकडे वेधलें गेलें आहे आणि या प्रश्नाच्या मुळाशीं जाण्याचा प्रयत्न सरकारी अधिकारी व लोकनायक आपापल्यापरीनें करीत आहेत ह्या प्रश्नाचा संबध व गुंतागुंत अर्थशास्त्र राजनीति, समाजस्थिति इ० अनेक गोष्टींशीं असल्यामुळें सामान्य वाचकांना प्रश्नाच विचार करतांना मोठा घोटाळा उडतो. या साठीं या प्रश्नाशीं संबद्ध असलेल्या गोष्टींचा सरळ भाषेंत सुलभ व सर्वांस सुगम अशा रितीनें उलगडा करण्या साठीं सध्याच्या महर्घतेची मीमांसा हा विषय आज आह्मी हातीं घेत आहों. सध्यां सरकारनें या प्रश्नाविषयींची माहिती गोळा करण्याकरितां नेमलेली कमिटी प्रांतो प्रांतीं हिंडत आहे. अशा वेळीं कमिटीच्या प्रश्नांचीं उत्तरें देण्यास आमचे हे लेख थोड्याफार अंशांनीं तरी साह्यभूत होतील अशी आह्मांस उमेद आहे.

सध्याच्या महर्घतेचीं मुख्य कारणें कोणतीं हें कोणास विचारलें असतां सामान्यतः जीं कारणें सांगण्यात येतात तीं हीं —

१ परदेशाला येथून धान्याचा निकास फार होतो यामुळें येथील लोकांना तूट येऊन त्यामुळें धान्य महाग होतें. धान्य महाग झालें ह्मणजे त्याच्या पोटीं इतर जिनसांचीही महागाई आपोआप होते. कारण धान्य ही सर्वांना रोज अवश्य लागणारी वस्तू आहे. धान्याच्या महागाई. मुळें नुसत्या जिनसाच महाग होत नाहींत तर मजूरीचे दरही वाढतात वगैरे.

२ हिंदुस्थानची लोकसंख्या १८९६ सालपर्यंत सारखी वाढत होती. पण १८९६ सालीं प्लेग व दुष्काळ यांच्या जोडगोळीचा मारा सुरूं झाल्यापासून गेल्या दहाबारा वर्षांत लोकसंख्येची वाढ तितक्या जोरानें झाली नाहीं. अलीकडे कांहीं वर्षें पावसाच्या दृष्टीनें बरीं गेलीं व धान्य-समृद्धीही झाली. त्या बरोबर लोकसंख्या दुप्पट जोरानें वाढत जाऊन मध्यंतरीं दहा बारा वर्षांत पडलेली तूट तीनचार वर्षांत भरून निघाली. ही लोक संख्येंतली अकल्पित रीतीनें झालेली वाढ ज्या मानानें झाली, त्या मानानें जमिनीची लागवड व धान्याची पैदास वाढली नाहीं. उलट धान्याशिवाय इतर जिनसा ह्मणजे कापूस, नीळ, चहा, काफी, सिंकोना रबर, इ० पदार्थ उत्पन्न करण्याकडे लोकांचें लक्ष अधिक लागून नफ्याच्या आशेनें लोकांनीं आपल्या जमिनी या पदार्थांच्या पैदाशीकडे लाविल्या. यामुळें धान्याच्या पैदाशींत भर पडावयाची ती न पडतां उलट तूट आली. धान्याचा निकास थांबला नाहीं तोही वाढतच गेला. यामुळें अर्थातच धान्य व त्याच्यामुळें इतर जिनसा महाग झाल्या.

३ वर सांगितलेल्या कारणाच्या पोटींच हें तिसरें कारण घालतां येईल. पण त्याला विशेष महत्त्व असल्यामुळें हें निराळें सदर देण्यात येत आहे. हें कारण ह्मणजे धान्याशिवाय इतर पदार्थांची विशेषतः गळीत द्रव्यांची पैदास होय धान्याच्या पैदासीपेक्षां ही पैदास शेतकऱ्यांना अधिक फायद्याची असते ह्मणून ते धान्याची पेरणी कमी करून तीळ, जवस, भुईमूग, इत्यादि गळीत द्रव्याची पैदास ज्यास्त करूं लागले आहेत.

४ वारंवार पडणाऱ्या दुष्काळांमुळें गुराढोरांची संख्या फारच कमी झाली आहे. त्यामुळें शेतकामाला पाहिजे तितकें त्यांचें साह्य मिळत नाहीं.

५ इतर देशांतून व्यापार, उद्योग, कलाकौशल्य इत्यादि बाबतींत जी चळवळ चालते तिचा परिणाम हिंदुस्थानातल्या शेतीसारख्या धंद्यावर घडल्यावांचून राहणें अशक्य होतें. आमच्या देशांत निघणाऱ्या कापसांच्या गिरण्यांना होणारा मजुरांचा पुरवठा व शेतकामाकडे जाणाऱ्या काम कऱ्यांची अल्प संख्या यांच्यामध्यें प्रत्यक्ष संबंध पुष्कळ आहे. हें बरवर पाहणाराला सुद्धां सहज दिसणार आहे.

६ लोकांच्या राहणीचा देशस्थितीशीं फार निकट संबंध असतो. सध्याची आमची राहणी किती खर्चाची झाली आहे व तिच्यामुळें आमच्या लोकांच्या पोटाला जो चिमटा बसूं लागला आहे तिचाही सध्याच्या महागाईशीं जवळचा संबंध आहे.

७ सरकारचे नाण्यासंबधाचें धोरणही पुष्कळ अंशानें सध्याच्या महागाईबद्दल जबाबदार आहे.

सामान्यतः या प्रश्नाचा ज्यांनीं शास्त्रीयरीतीनें व व्यवहारिक दृष्टीनें विचार केला आहे अशांच्या मतें सध्याच्या महर्घतेच्या मुळाशीं हीं सात कारणें आहेत. कमीजास्त मानानें हीं सगळीं खरीं आहेत यांत शंका नाहीं. आतां येवढेंच पहावयाचें आहे कीं यांतलीं परिहार्य कोणतीं व अपरिहार्य कोणतें, आणि त्याचप्रमाणें निकटवर्ती कोणतीं व दूरवर्ती कोणतीं? महर्घतेसारख्या बिकट, अनेक विषयांशीं संबद्ध आणि प्रत्यक्ष व अनुमान या दोन्हींच्या साह्यानें ज्या प्रश्नाविषयींचे सिद्धांत काटले पाहिजेत, अशा विषयाचा विचार शास्त्रीय रीतीनेंच व्हावयास पाहिजे. हा विचार सरकारी रिपोर्टांतले आंकडे व सर्व विचारी माणसांस संमत होण्यासारखी अनुमानपद्धति यांच्या साह्यानें पुढील कांहीं लेखांत करण्याचें आह्मी योजिलें आहे. येवढेंच सांगून आज आह्मी वाचकांचा निरोप घेतों.

## नवे निजामसाहेब आणि व्हाईसराय.

निजाम साहेबासारख्या अगदीं तरुण संस्थानिकांचें राज्यारोहण आणि व्हाइसराय साहेबांचें हैद्राबादेस आगमन या दोन गोष्टी त्या संस्थानच्या प्रजेच्या मनांत अनेक राजकारणविषयक संबंध जुळवून आणण्यास कारण होणें स्वाभाविक आहेत. या भेटीच्या प्रसंगीं व्हाइसराय साहेबांनीं निजाम साहेबांना जो हितोपदेश केला त्याचा सदर संस्थानिकाच्या मनावर चांगला परिणाम झाल्यावांचून राहणार नाहीं. राजे लोकांनीं चैन, ऐषआराम, राजवाड्यांतलीं—जनानखान्यातलीं—कारस्थानें, राजविलासांचा उपभोग, कबूतरें उडविण्या सारखे खेळ वगैरे गोष्टींत आयुष्य व रयतेचा पैसा घालविण्याचे दिवस गेले. दिवसेंदिवस संस्थानिकांची परिस्थिति बदलत चालली आहे व नव्या जबाबदाऱ्या अंगावर येऊन पडत आहेत. अशावेळीं त्यांनीं आळस टाकला पाहिजे; व्यसनांचा संपर्क लागूं देतां नये भोंवतालीं बडोद्यासारख्या संस्थानांत, ब्रिटिश-राज्यांत, फार काय पण त्याच्याही पलीकडे विलायतेंत, जर्मनींत, अमेरिकेंत व चीन जपानांत काय चाललें आहे तें बारकाईनें पाहून फार सावधगिरीनें आणि हुशारीनें, ब्रिटिश राज्याविषयींची राजनिष्ठा अढळ ठेवून व प्रजेच्या हितावरची नजर कधीं रेसमात्र न चकूं देतां वागलें पाहिजे हें त्यांचें पाहिलें कर्तव्य आहे. यासाठीं अनुभवी मंत्री जवळ केले पाहिजेत. पूर्वजांच्या लौकिकाविषयींचा अभिमान पाहिजेच, पण बदललेल्या परिस्थितींत पूर्वजांचा कित्ता आंधळेपणानें गिरवूं पहाणें हितकारक नाहीं हेंही त्याबरोबर लक्षांत ठेविलें पाहिजे. जुनें तेवढें संभाळून राहूं, पुढें पाऊल टाकणार नाहीं, असें ह्मणणें ह्मणजे साचलेल्या पाण्याच्या डबक्यानेंच समाधान मानून राहूं, स्वच्छ वाहत्या पाण्याचा निर्मळ झरा आह्मास नको असें ह्मणण्यासारखेंच हास्यास्पद आहे. सुधारणेच्या मार्गांत हैद्राबाद संस्थानचा राजरथ कधीं त्वरेनें गेलेला ठाऊक नाहीं हें जाणूनच त्या रथाच्या चक्रांना योग्य मार्गानें गति देण्यासाठीं लॉर्ड हार्डिंज साहेबांनीं वरील उपदेश तरुण निजाम साहेबांना केला असावा असें दिसतें. अशा उपदेशांची निजामच्या राज्ययंत्राला फार अवश्यकता होती, आणि तो नव्या संस्थानिकाच्या कारकीर्दीच्या अगदीं प्रारंभीं फार चातुर्यानें आणि खुबीनें देण्यांत व्हाइसरायसाहेबांनीं आपली मुत्सद्दीगिरीची करामतही चांगली दाखविली आहे.

## इटलीच्या तक्रारी.

सध्यां इटली व तुर्कस्थान यांच्या मधली लढाई हा विलायतेंतल्या वर्तमानपत्रांना चर्चेचा एक मोठा विषय मिळाला आहे, आणि इटलीचे हितचिंतक मित्र या वर्तमानपत्रांच्या संपादकांची सहानुभूति हरप्रयत्नानें मिळवीत आहेत. लंडन टाईम्स पत्रांत या युद्धाला कारण झालेल्या इटलीच्या तक्रारींची एक लांबलचक यादी प्रसिद्ध झाली आहे ती सदर युद्धाचें नैतिक व न्यायाचें स्वरुप ओळखण्यास पुष्कळ मदत करील इटलीच्या मुख्य तक्रारी या आहेत—' इटलीच्या वकीलांचा तुर्कस्थाननें अनेक प्रसंगीं अपमान केला २ एक इटालियन मुलगी ( १६ वर्षांची ) मुसलमानांनीं धरून नेली व तिला जुलमानें बाटवून तिच्या आईबापांच्या इच्छेविरुद्ध आणि इटलीच्या वकिलांच्या शब्दाला न जुमानतां तिचें लग्न एका मुसलमानाशीं लाविलें. ३ इटलीच्या निशाणाचा मानभंग केला. ४ इटलीच्या व्यापारानें नुकसान केलें. ५ त्रिपोलीमध्यें इटलीचा व्यापार वाढण्याच्या मार्गांत विघ्नें केलीं. ६ इटलीच्या प्रजेला कोणी जमिनी विकत देऊं लागला तर त्याला तुर्कस्थाननें मनाई केली. ७ जुन्या वस्तूंच्या व खाणींच्या शोधार्थ पाठविलेल्या इटलीच्या मिशनला अडथळा केला. ८ इटलीचे लोकांचे खून पडले. इटालियन सरकारनें आजपर्यंत विलक्षण साहिष्णुता दाखविली, पण त्याच्यायोगानें तुर्कस्थाननें न उमजतां त्याची मगरूरी वाढतच गेली इ० इ० तुर्कस्थाननें हे सर्व आरोप साफ नाकारले आहेत. वरील तक्रारींची यादी वाचली ह्मणजे कोणाही युरोपियनाची इटलीविषयीं सहानुभूति प्रादुर्भूत होणें स्वाभाविक आहे. तरी पण तातडीनें युद्धास सिद्ध होण्याइतकी चीड येण्यासारखें या तक्रारींत कांहीं नाहीं असें युरोपियन पत्रें देखील ह्मणत आहेत.

---

## चीनांतलें प्रचंड बंड.

चीन देशांत अशांततेचा वणवा पेटलेला आहे, आणि तो लवकरच तेथील राजसत्तेचा ग्रास करील कीं काय अशी भीती उत्पन्न करणारीं अशुभ चिन्हेंही दिसूं लागलीं आहेत. सध्याच्या दुष्काळाचे दिवसांत बुभुक्षित लोकांनीं हें वावटळ उडविलें आहे अशी प्रथम लोकांची समजूत झाली होती आणि चिनी सरकार अद्यापही या बंडाला आपण विशेष गणीत नाहीं. सरकारी फौजेचा एकदां विजय झाल्याबरोबर बंडाचें वावटळ एकदम शांत होईल असें सांगून आपण निर्धास्त आहों असें बाह्यतः दाखवीत आहे. पण ज्यांना सद्यःकालचीं चिन्हें पूर्णपणें समजत आहेत ते या अशांततेला निराळेंच नांव देत आहेत. ज्या प्रजाजनांच्या इच्छेनें जपानांतली राजसत्ता नियंत्रित होऊन प्रजासत्ता वाढली ज्या प्रजाजनांच्या इच्छेनें पर्शियांत उलथापालथ झाली, व ज्या लोकस्वातंत्र्यानें तुर्कदेशाला घोर निद्रेंतून खडबडून उठण्यास लाविलें, ती प्रजासत्तेची चळवळ या बंडाच्या मुळाशीं आहे असें आतां पुष्कळ विचारी माणसांस दिसूं लागलें आहे व तशा प्रकारचे उद्गार उघडपणें प्रकटही होऊं लागले आहेत. चीनचा राजवंश मांचु जातीचा आहे. या वंशाविषयीं कित्येक अस्सल चिनी सरदार घराणी व लोक यांचे ठायीं पूर्ण विरक्तता आहे. शिवाय त्याची अशी समजूत झालेली आहे हा वंश सिंहासनारूढ आहे तोंपर्यंत चीनचा उत्कर्ष व्हावयाचा नाहीं. ह्मणून या समजुतीच्या लोकांनीं या राजवंशाचा उच्छेद करण्याचे प्रयत्न पूर्वीं अनेक वार केले होते. प्रस्तुतचा प्रयत्न तसाच पण पुष्कळ मोठ्या प्रमाणावर आहे इतकेंच. आतां पर्यंत बंडाच्या पुढाऱ्यांनीं आपलें काम बरेंच व्यवस्थेशीर रीतीनें रेटीत आणलें आहे व चीनांत राहणाऱ्या परदेशीयांवर बिलकुल हात टाकावयाचा नाहीं असें आपल्या अनुयायांस बजाविलें आहे. ही दक्षता जोपर्यंत

ठेवण्यांत येईल तोंपर्यंत परदेशी सरकारांना चीनच्या कारभारांत ढवळाढवळ करण्याचें कारण पडणार नाहीं; व त्याच्या महान् भूतीस क्रांतिकारक मंडळी मुकणार नाहीं. तेथील सरकार नुकतें कोठें जागें झालें आहे आणि बंडवाल्यांच्या बंदोबस्ताच्या तजविजी योजूं लागलें आहे. या विराट पुरुषाच्या जागृतीचा परिणाम सध्याच्या अशांतीवर कसा काय होतो हें आतां लोक मोठ्या आतुरतेनें पाहूं लागले आहेत. क्रांतिकारक पक्षाचा जय होवो किंवा अपजय होवो, त्यांच्या या जंगी प्रयत्नामुळें चीनच्या राज्यपद्धतींत अपूर्व असा फेरबदल होणें आतां अपरिहार्य आहे. जपान, पर्शिया व तुर्कस्थान यांच्या पंक्तीला चीनदेश लवकरच येऊन बसेल असें पोलिटिकल ज्योतिषी भविष्य वर्तवूं लागले आहेत.

## सिस्टर निवेदिता.

रामकृष्ण मिशनांत स्वेच्छेनें प्रविष्ट झालेल्या व सिस्टर निवेदिता हें नामाभिधान धारण करणाऱ्या अमेरिकन बाई मिस नोबल यांना गेल्याच्या मागील आठवड्यांत देवाज्ञा झाली. स्वामी विवेकानंदाच्या वक्तृत्वामुळें त्यांचें लक्ष हिंदुधर्म व उच्चप्रतीचें हिंदुतत्वज्ञान यांच्याकडे लागलें अशा अमेरिकन स्त्रीपुरुषांत या बाई प्रमुख होत्या. हिंदुधर्माचे ठिकाणीं त्यांची श्रद्धा जी एकदां जडली ती अखेरपर्यंत अढळ राहिली. या बाईची हिंदुधर्मावर जशी श्रद्धा होती तशी हिंदूंची सद्धां नसेल असें म्हटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं. यांच्याच खटपटीमुळें स्वामी विवेकानंदाच्या बेलूर मठाची स्थापना झाली. कुमारी निवेदिता यांचा हिंदुधर्म ग्रंथावर सतत व्यासंग चालूं असे. हिंदुचालीरीती व पुराणांतल्या गोष्टी यांच्याविषयीं आणि विशेषः हिंदुकलाकौशल्याच्या संबंधानें त्यांनीं अनेक सुविचारपरिप्लुत लेख लिहून पाश्चात्यांत या गोष्टींविषयीं आदर उत्पन्न करून ठेवण्याचें श्रेय संपादलें होतें. या बाईचें अंतःकरण कोमल असून त्यांचें मन निष्कपट व आचरण प्राचीन काळच्या साध्वीप्रमाणें प्रमाणें पवित्र असे. या बाईच्या मृत्यूनें हिंदुस्थानच्या प्रेमळ मैत्रिणींपैकीं एक नाहींशी झाली आहे.

## पुनर्घटना.

वऱ्हाडप्रांताच्या दिवाणी कचेऱ्या १९०३ च्या सप्टेंबरमध्यें प्रथम मध्यप्रांताच्या हाय कोर्टाच्या सत्तेखालीं गेल्या आणि प्रारंभींच मध्यप्रांतांतील व्यवस्थेप्रमाणें कचेऱ्या स्थापण्यांत आल्या. दिवाणी न्यायखातें अगदीं स्वतंत्र करण्यांत येऊन त्याचा मुलकी व फौजदारी खात्यांशीं असलेला संबंध पूर्णपणें तोडण्यात आला. या नवीन योजनेनें दिवाणी न्यायाचीं कामें विशेष त्वरेनें होऊं लागलीं आणि न्याय जसजसा लवकर मिळूं लागतो तशी लोकांची प्रवृत्ति कचेरीची पायरी चढण्याकडे विशेष धावूं लागते असा अनुभव आहे. हल्लीं मुनसफांच्या कोर्टाला आणि सब जज्जांच्या कोर्टाला अनुक्रमें अधिकार पांचशें रुपये व पांचहजार किंमतीपर्यंतचे दावे चालविण्याचा आहे. हे अधिकार वाढविण्याविषयीं स्थानिक सरकारचा विचार चालू आहे आणि त्याला प्रारंभ म्हणून पूर्ववऱ्हाड व पश्चिम वऱ्हाड या दोन भागांतील कांहीं सबजज्जांस दहा हजार रुपये किंमतीपर्यंतचे दावे चालविण्याचे अधिकार देण्यांत आले आहेत. यारितीनें आडिशनल डिस्ट्रिक्ट जज्जांच्या कोर्टांतील पांच हजारा वरील व दहा हजारापर्यंतचे दावे सबजज्जांकडे गेल्यामुळें अपिलांचीं कामें लवकर होऊं लागतील आणि दहा हजारावरील दावे लांबणीवर हल्लींप्रमाणें पडणार नाहींत.

आमच्या स्थानिक सरकारचा पहिला विचार असा आहे कीं प्रत्येक तहशिलीला एकएक मुनसफ कोर्ट असावें. हा व्यवस्था मध्यप्रांतांत पूर्णपणें अमलांत आलेली आहे तीच पद्धती या प्रांतांतही अवश्य सुखकारक होईल. लहान प्रतीचे दावे व स्मालकाजाच्या स्वरूपाचे दावे प्रत्येक तहशिलीच्या गांवीं चालूं लागले म्हणजे लोकांस स्वल्प खर्चांत न्याय मिळूं लागतो. वरील धोरणाची अंमलबजावणी होईपर्यंत सध्या १९१२ च्या एप्रिल पासून पश्चिम वऱ्हाडांतील कोर्टाच्या घटनेंत कांही विशिष्ट फेरफार होणार आहेत. न्यायमूर्ती राजश्री ड्रेकब्राकमन जुडिशिअल कमिशनर यांचा सध्याचा हुकूम अगदीं नियमित व मर्यादित आहे.

आकोटास एक मुनसफ कोर्ट पुढील एप्रिल पासून स्थापित होईल. सध्या त्या कोर्टाचा अधिकार संकुचित केलेला आहे. दिवाणीकडील दावे व स्मालकाजचे दावे १०० रुपये किंमतीपर्यंत चालतील. लोकांची इच्छा फार फार अशी होती कीं आकोटाला सबजज्जाची कचेरी स्थापण्यांत यावी पण तूर्त सरकारचा विचार तितका ठाम होऊं शकत नाहीं. आकोटाला कचेऱ्यांच्या इमारतीची सोय पक्की होईपर्यंत मोठ्या अधिकाराचें कोर्ट मिळणार नाही असा रंग दिसतो. राजश्री स्लाय साहेब कमिशनर यांनीं दोन वर्षांपूर्वी दिवाणी कचेरी आकोटाला देण्याविषयीं अभिवचन दिलें होतें आणि ती गोष्ट अंशतः लाभत आहे हें पाहून त्या तालुक्यांतील लोकांस विशेष आनंद वाटेल.

खामगांवच्या स्मालकाज कोर्टाला रजा देण्यांत येणार आहे. हें कोर्ट बंद होईल तेव्हां लोकांची गैरसोय होऊं नये म्हणून मलकापूरास एक सबजज्जाचें कोर्ट स्थापण्यांत येईल. आणि खामगांव व मलकापूर येथील सबजज्जांस पांचशे रुपयापर्यंतचे स्मालकाजचे दावे चालविण्याचे विशिष्ट अधिकार देण्यांत येतील ही घटना १९१२ च्या एप्रीलपासून अमलांत येणार आहे. तथापि लोकांची मोठी गरज अजून शिल्लकच राहील आणि तालुक्यानिहाय मुनसफ कोर्ट स्थापल्याशिवाय ती दूर होणार नाहीं. सध्यांची सुरुवात मा. सुधारणेच्या दिशेनें होत आहे आणि म्हणूनच लोकांस मोठा भरंवसा वाटतो कीं त्यांची इष्ट गोष्ट त्यांस योग्य कालानें मिळेल.

## ध्वनि

ध्वनि हें जसें काव्याचे उत्तमांग तसा भविष्याचा ध्वनि हा वर्तमान गोष्टींचा रमणीय भाग होय. सध्यांचें राजकीय वातावरण अगदीं निवळलें असून राज्याभिषेकाचा समारंभ हस्तिनापुरीं मोठ्या आनंदोत्सवांत लवकरच व्हावयाचा आहे आणि त्या आनंदोत्सवाला व्यंग नसावें आणि सर्व बाजूंनीं राजभक्तीची पूर्णावस्था दृश्य व्हावी या हेतूनें राजद्रोहात्मक लेखाबद्दल शिक्षा पावलेल्या लोकांची बंधमुक्तता खास निश्चयानें या सुसमयाला होईल. अशा पुष्कळश मुत्सद्दी व दूरदर्शी लोकांनीं पक्का तर्क बांधलेला आहे. या भविष्याच्या दृष्टीनें बाबू बिपिनचंद्रपाल यांस झालेल्या अल्प शिक्षेला विशेष समर्पकता येते. लोकमान्य राजश्री बाळ गंगाधर टिळक यांची या राज्याभिषेकाच्या सुमुहूर्तावर सुटका होईल असा विचार स्वाभाविकपणेंच मनास पटतो. शिक्षा झाली तेव्हां राजश्री टिळक म्हणाले होते का कदाचित् ईश्वरी योगच असा असला पाहिजे कीं मी संकटाखालीं चिरडून जावें आणि त्यांतच माझ्या देशाचें कल्याण असावें. वरील गोष्ट कितीही खरी असली तरी जेव्हां सर्व राष्ट्र त्या १२ डिसेंबरच्या पुण्य दिनीं श्रीमंत पंचम जार्ज यांस सिंहासनावर विराजमान पाहील तेव्हां त्यांचें अभिष्ट चिंतण्याला राजश्री टिळकांसारखे राष्ट्रभक्तही तुरुंगाबाहेर टाळी वाजवावयास अवश्य पाहिजेत. ईश्वर करो आणि हा सुयोग लवकर येवो!

## वऱ्हाडवृत्त.

**हवामान** – अभ्रें येतात, ऊन कडक तापतें व हवेंत आर्द्रता नाहीं यामुळें पिकें सुकली आहेत हिंवाळा जोमदार होईल तरी देखील पीकें सुधरतील व रोगराईला आश्रय मिळणार नाहीं. रब्बीचे पेरे संपत आले पण जमिनीचा ओलावा आधिक पाहिजे आहे.

अलिशान नामदार राजश्री क्राडॉक साहेब हे गेल्या मंगळवारीं चिखलदऱ्यास गेले असून उद्यापर्यंत तेथें मुक्काम आहेत. चिखलदरा पचमढीहून अधिक रमणीय व आरोग्यकारक असल्यामुळें कदाचित् हेंच स्थल स्थानिक सरकारचें मुख्य ठाणें होण्याचा संभव आहे.

आकोल्याच्या बेंच-माजिस्ट्रेटांकडे मुनसिपल गुन्हे व पोलीस आक्टाचे ३४ वे कलमाचे गुन्हे चालविण्याचे समरी अधिकार देण्यांत आले.

रा० रा० सी० एच० प्राइस आडि० डिस्ट्रिक्ट जज्ज उमरावती हे हल्लींच्या ३ महिन्याच्या रजेवर गेल्यामुळें त्यांच्याजागीं तेथील स[illegible] रा० रा० रामचंद्र वासुदेव परांजपे यांस नेमण्यांत आले. आणि रा० रा० भुपेंद्रनाथ घोष एम० ए० यांस नागपुराहून उमरावतीस आक्टिं० सबजज्ज नेमिलें.

रा० रा० रामकृष्ण विठ्ठल आत्रे, सबजज्ज, आकोला यास नागपुरास सबजज्जाचे जागीं बदलण्यांत आलें. आणि [illegible] रा० रा० जानकीप्रसाद हडे हे येथील स्मालकाज कोर्टाकडून सबजज्जाचे कोर्टावर परत येतील आणि रा० रा० बी० बी० मेहता हे पुन्हा वऱ्हाडांत स्मालकाज कोर्टाचे न्यायाधीश होतील.

रा. रा. नानाराव बाजीराव देशमुख, शिराळें यांस वर्ग ३ चे माजिस्ट्रेट करून त्यांस इलिचपूरच्या बेंचमाजिस्ट्रेटांपैकीं रा. रा. विठ्ठल नारायण पांगारकर यांच्या जागीं नेमिलें आहे.

जुगारा संबंधीचा कायदा मुनसिपल शहरास व चांदूर, मोर्शी, दर्यापूर, बाळापूर, मूर्तिजापूर, मंगरूळपीर, चिखली, मेहकर, जळगांव, दारव्हा, पुसद, केळापूर व [illegible] या गांवांस लागू करण्यांत आला.

नागपुरास आजपासून डिपार्टमेंटल परिक्षा सुरू होऊन शुक्रवारीं संपतील.

विद्यापरिषद – आजपासून उमरावतीस या परिषदला प्रारंभ होणार असून गुरुवारीं समाप्ति होईल आणि शुक्रवारीं व शनिवारीं विद्यार्थ्यांच्या शर्यतीचे खेळ होतील.

“एक खरपूस समाचार घेणारा”– आपला पत्रव्यवहार छापण्या इतकी आमच्या मनाची समता नाहीं. व आपल्यापल्याच उद्देशाप्रमाणें कोळसा उगाळून राजश्री टिळकां सारख्या श्रेष्ठ व्यक्तीच्या अवगुणाकडे दृष्टी देण्याची इच्छा नाहीं. उपनिषद्कारांप्रमाणें गुणग्रहणाचाच अधिकार सर्वांस आहे.

**शेतकी प्रदर्शन** -- येत्या ९ व १० नोवेंबर रोजीं येथें गुदस्ता प्रमाणें प्रदर्शन भरणार असून कृषिकर्मांतील प्राविण्या बद्दल सनदा वाटण्यांत ये[illegible] आहेत.

## आकोला बाजारभाव.

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शन | | ९९।।।-।। |
| मुंबई ब्यांकेची सोन्याची चीप दर तोळ्यास | | २४।।।। |
| चांदीचा | | ७३ |
| जवारी नवी | ६० | ६९ |
| गहूं | | १०० |
| गहूं बनशी | ११० | ११९ |
| चणे | | ४।। |
| तेल | | ९ |
| तुप | | १३ |
| सरकी | | १२ |
| कापूस | | ६८ |
| जवस | | २०० |
| तीळ | | १७० |

## Notice.

Is hereby given that the following show and sports will be held at Mangrulpir District Akola, during the Coronation festivities on the dates specified against each.

PRIZES WILL BE AWARDED AS FALLOWS:—

### From Berar only.

| | | 1st prize | 2nd prize |
|---|---|---|---|
| 8-12-1911 From 3 P. M. to 4 P. M | Best Horse show Berar breed | Gold medal worth Rs. 25 | Gold medal worth Rs. 15 |
| 8-12-1911 From 4 P. M. to 5 P. M. | Horse race one mile | —Do— | —Do |
| 8-12-1911 From 5 P. M. to 6 P. M. | Bicycle slow race half a mile. | —Do— | —Do— |

1 The prizes for above will be distributed on 9th December 1911 at 6 P. M.

2 Persons desiring to attend are requested to inform the undersigned not later than 30 November 1911 so that the arrangements may be made for their lodging and boarding which will be free of charge.

3 Arrangements will be made for supply of grass, gram etc. for the horses etc. on payment of charges.

4 A programme of festivities, sports etc. has been drawn up and there will be amusements from 7th to 12th December 1911 in shape of sports, [illegible] Drama, fireworks, illuminations, pro[illegible]

5 Mangrulpir is free from all [illegible]

Dated Mangrulpir
1st November 1911

... आंत येणाऱ्या ... घेतल्या जातील ... टेसाम स्पेशल चार्ज ... देल

१ कडबा काप[illegible] यानें कडबा कापून घातल्यास गुरांचे पोट भरुन निगा कडबा वाचतो. कि० रु० १०-१-०

२ लोखंडी नांगर ने १२ हा नांगर ... बैलांनीं चालतो. माळ जमीन, मळीची ...

## जाहिरात

वऱ्हाडसमाचार
Registered No. [illegible]
Berar Samachar.
आकोला—सोमवार तारीख ३ माहे ऑक्टोबर सन १९११ इ०
वर्ष ४९ ] [ अंक ३९

... गांव तालुके मुर्तिजापूर येथील शेतें तीन व घर कवेलुचें

घोटा तालुके मंगरूळ येथील शेतें. दोन आंब्याचीं झाडें ४ विहिरी त्यासुद्धां व घर टीनाचें तत्त्यासूद्धां.

ह्या प्रमाणें स्थावर जंगम इस्टेट माझा व तुझा नवरा हंमराजी यांनीं मिळवलेली असून वरील सर्व जिनगी माझे ताब्यात आहे. व खालीं लिहिलेली मयत हंमराजीचीं जंगम जिनगी दागदागीनें व नगदी रुपये तूं घेऊन बसली आहेस तिचा तपशील येणें प्रमाणें

करदोडे २ चांदीचें वजन अजमासे तोळे. १००

मुदी वजन तोळे २॥

...र्ची मेत्यासुद्धां वजन तोळा १

गरसोळ्या २ पांचपदरी ...पा वजन अ० तोळे १०

गरसोळ्या २ सोन्या[illegible] वजन तोळे [illegible]

उपर तूं कोणास गहाण खरेदी करुन देशील तर तो सर्व व्यवहार रद्द असून त्याबद्दल कायदेशीर तजवीज केली जाईल वरील स्थावर जंगम इस्टेटींत तुझा निमे हिस्सा व माझा निमे हिस्सा कायदेशीर आहे पण तुझी इच्छा दुसरा घरटाव करण्याची दिसते. तरी तूं दुसरा नवरा करुन जाऊं नये व मीही जात नाहीं दोहे पैकीं जी दुसरा नवरा करील तिचा वरील स्थावर जंगम जिनगीवर हक्क राहणार नाहीं. तसेंच या नोटिशीनें सर्वत्र लोकास कळविते कीं वरील स्थावर जंगम जिनगी माझी घ[illegible] रावत राधी मर्द हंमराजी इजपासुन [illegible] गहाण व खरेदी वगैरे करुन घे[illegible] घेतल्यास ते [illegible] र रद्द असून [illegible] सवरलेल योग्यती[illegible] तीज केली जाई[illegible] तारी[illegible] इसवी [illegible] मर्द हंमराजी [illegible] राहणार नापगांव [illegible] आज [illegible]

दिला तेव्हां मा[illegible] २ व राहत होतो. आतां वेगळे राहत आहों तरी सदहूं गहाणापैकीं चौथ्या हिश्याचे रुपये ३०० शिवाय व्याज मिठुलाल यास न देतां मजला द्यावें. याउपर तुह्मी ... मिठालाल यास दिली असतां खर्चामूद्धां कोर्ट मार्फत दावा ... वसूल करुन घेऊं ... ७-१०-११

सही (मारवाडींत)
... चेनीराम मारवाडी
... राहणार दापूर दस्तुर खुद्द

... तुकाराम वल्लद विष्णाजी ... खेड ता० मुर्तीजापूर यांसः—

... करणार याजकडून नोटीस तुह्मी रावजी वल्लद रामजी मिठालाल गुलचंद या दस्तऐवज २०० चा ... इ० रोजीं लिहून देऊन दिला आहे. त्यात माझा ... आहे दस्तऐवज ... लाल मूलचंद एकत्र ... होतो ...गळा राहत आहे. आहे तरी ... हिश्याचे रुपये २२९ व व्याज मजला द्यावें. मिठालाल यांस देऊं ... दिल्यास तुमचे कडून कोर्ट फिर्याद करुन रकम २२९ व्याजा ... नोटिशीने खर्चामुद्धां वसूल केली कळावें. ता० २७-१०-११ इ०

सही (मारवाडींत)
श्रीकीसन चेनीराम मारवाडी रा०
दापुर द० खु०

नो० नं० ४७१

### नोटीस

नोटीस वेशमी— लक्ष्मी नारायण उत्तम चंद साहू दुकान पातुर्डा तालुके जळगांव जि० बुलढाणें यांसः—

... नोटीस दिली ते[illegible] करण तमचे सारखे सावकारास शोभत नाहीं. तरी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत प्रॉमिसरीनोटांत शर्त लिहिल्याप्रमाणें आमचे रुपये व्याज मुद्दलसह आणून द्यावे व पावती घ्यावी तसें न केल्यास आह्मी तुमचेवर रीतीप्रमाणें दिवाणी कोर्टात दावा आणून नोटिशीच्याही खर्चामुद्धां तुमचे जवळून रुपये भरुन घेऊं. कळावे. ता० ३० १०-११ इ०

दस्तुर- बळवंत गोपाळ ढवळे रा० पातुर्डा हल्लीं मुक्काम खामगांव.

सही
मोतीराम सिताराम देशमुख
हल्लीं मुक्काम खामगांव
दस्तुर खुद्द.

नो० नं० ४७२

### जाहिर नोटीस

मी खालीं सही करणार सर्व शेट साहूकार लोकांस जाहीर नोटीस देतों कीं माझा चुलता गणू वल्लद बाबुजी शिंपी राहणार अडगांव हा मरण पावला व त्याची मुले बळीराम व रामचंद्र हेही मरण पावले त्यां तिघांच्या बायका आहेत व जिनगी कसबे अडगांव येथील राहतें घर धाब्याचें माडी ओसरी बैठकसुद्धां व माळेगांव येथील सर्वे नंबर १८ यांतील एक त्रितीआंष हिस्सा हे विधवा स्त्री तामूत कोणी गहाण ताबेगहाण खरेदी व बक्षीस घेऊं नये. कारण हल्लीं मैताचे नांवावर कर्ज कांहीं नाहीं ह्या स्त्रीया अन्न वस्त्राच्या मालकीणी आहेत. जोपर्यंत ह्या आमचे कुळांत आहेत तोपर्यंत घरांत राहून शेती वाहून खावी कोणी ताबेगहाण खरेदी विधवा स्त्री जवळून घेऊं नये घेतल्यास कोर्ट मार्फत दावा केला जाईल. ही नोटीस ... दिली सही ता० ३०-१०-११ इ०

द० देवीदास अंबादास प. आकोट.

सही
नामदेव उर्फ शिंपी राहणार कसबे अडगांव द. खु

नो. नं. ४७३

Registered No N. 4

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४५ ] आकोला—सोमवार तारीख ६ माहे आक्टोबर सन १९११ इ० [ अंक ४२

Fr

F.

## वर्गणीचे दर

Fr आकोल्यांतील लोकांस........१ रुपया

1 बाहेरगांवीं ट. हां. ........२ रुपये

2 Perso later than 30 आगाउच घेण्याची वहिवाट lodging and boarding

3 Arrangements will on payment of charges.

4 A programme of festiv be amusements from 7th Drama, fireworks, illuminati

5 Mangrulpir is free from

Dated Mangrulpir

1st November 1911

दर ...णा. ...जातील. ...हिजे. आंत येणाऱ्या ...ात घेतल्या जातील

Notice N...टिसास स्पेशल चार्ज पडेल

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षे ने १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुप. याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमे व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } G. A. Phillips.
आकोला ९।९।०९ } एजंट
नं १

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्या[च्या लगड्या] मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती कारितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६$\frac{2}{3}$ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक } G. A. Phillips.
आकोला २१.९.१० } एजंट
नो० नं० २

## चांदीचीं भांडीं.

### खरें सचोटीचें दुकान.

आमचे दुकानीं शुद्ध चिनई चांदीचीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं विक्रीस तयार असतात. माल काळजीपूर्वक

वक्शीर व्ही. पी. नें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल जोखिमदार राहूं. एकवार अनुभव घ्यावा.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
३३१ आदितवारपेठ, नाशिक

### किर्लोस्कर बंधूनीं केलेलीं शेतकीचीं आउत वगैरे.

१ कडबा कापण्याचें यंत्र नंबर "ब" यानें कडबा कापून घातल्यास गुरांचे पोट भरून निम्मा कडबा वांचतो. किं० रु० १०-६-०

२ लोखंडी नांगर नं १२ हा नांगर दोन बैलांनीं चालतो. माळ जमीन, मळीची जमीन, व भुईमुगाच्या शेंगा काढण्या कारितां याचा फारच उपयोग होतो. किं रु० १०-९-०

३ लाखंडी मोठें नांगर हे नांगर सहा पासून आठ बैलानीं चालतात. विशेष करून काळ्या जमीनीकरतां याचा फार उपयोग होतो. किं० रु० ३८-०-०

४ आंबोळ्याचे तवे नंबर "ब" हे तवे बिडाचे केलेले असून यावर एका बाजूस आंबोळ्या व दुसरे बाजूस पुरणाच्या पोळ्या करितां येतात यांचा व्यास ११ इंच असून वजन अजमासे चार पक्के शेर आहे हा तवा बायकांना फारच आवडला आहे. किं० रु० १

किर्लोस्कर बंधु
पोष्ट किर्लोस्करवाडी
[ स· औंध, जिल्हा सातारा· ]

नो० नं० ३९६

श्री राधावल्लभाजयति

### वर्षफल।

हमारे पास सिर्फ १ पोस्टकार्ड पर किसी फल या फूल का नाम लिख भेजो हम आप के एक वर्ष का सुख, दुःख लोभ, हानि, जीवन, मरण, रोग, सन्तान तरक्की, मौकूफी, व्यापार में किस वस्तु स लाभ होगा दिसावरी काम में कैसा लाभ होगा और जो महीना हानिकारक उस का उपाय महीनेवार वर्षफल वी० पी० द्वारा २। रुपये में भेज देंगे. हमारे हाथ जन्म पत्रादि उत्तमोत्तम बनते हैं अनेक प्रशंसा पत्र मौजूद हैं, विशेष परिचय के अर्थ ८॥ आना का टिकट भेज कर सूचीपत्र मंगो लीजीये.

मिलने का पता:—
गोस्वामी राधामोहन शर्म्मा
चिचीखाना आगरा.

### नोटीस

नोटीस—बेशर्मी भागिर्थी उर्फ कपूरी मर्द लछमणजी राहणार दापूर ता० मुर्तीजापूर जि० आकोला

यांस—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही मिठालाल मथुरादास यास तारीख २३.५.८ रोजीं रुपये २००० चे गहाणखत लिहून दिलें व रजिष्टर करून दिलें त्या गहाण खताचे रकमेंत माझा चौथा हिस्सा आहे सदर्हू दस्तऐवज लिहून दिला तेव्हां मी व मिठालाल एकत्र राहत होतो. आतां वेगळे राहत आहों तरी सदर्हू गहाणापैकीं चौथ्या हिश्याचे रुपये ५०० शिवाय व्याज मिठालाल यास न देतां मजला द्यावें. याऊपर तुम्ही वरील रक्कम मिठालाल यास दिली असतां या नोटीशीचे खर्चासुद्धां कोर्ट मार्फत दावा करून सर्व रक्कम वसूल करून घेऊं कळावें तारीख २७-१०-११

सही ( मारवाडींत )
श्रीकीसन चेनीराम मारवाडी
राहणार दापूर दस्तुर खुद

नो० नं० ४७०

### नोटीस

नोटीस बेशर्मी— सिताराम वल्लद विष्णाजी खुळे राहणार खापरवाड ता० मुर्तीजापूर यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुम्ही रावजी वल्लद रामजी खापरवाडकर व मिठालाल गुलचंद या दोघांचे नांवांचा दस्तऐवज २०० चा ता० १६।१।०६ इ० रोजीं लिहून देऊन रजिष्टर करून दिला आहे. त्यांत माझा चौथा हिस्सा अहे दस्तऐवज झाला तेव्हां मी व मिठालाल मूळचंद एकत्र राहत होतो हल्लीं मी वेगळा राहत आहे. आहे तरी सदर्हू चौथे हिश्याचे रुपये २२५ व व्याज असें तुम्ही मजला द्यावें. मिठालाल यांस देऊं नये याऊपर दिल्यास तुमचे कडून कोर्ट मार्फत फिर्याद करून रकम २२५ व्याजासुद्धां व नोटिशीचे खर्चासुद्धां वसूल केली जाईल. कळावें. ता० २७.१०-११ इ०

सही ( मारवाडींत )
श्रीकीसन चेनीराम मारवाडी रा०
दापुर द० खु०

नो० नं० ४७१

### नोटीस

नोटीस बेशर्मी— लक्ष्मी नारायण उत्तमचंद साहू दुकान पातुर्डा तालुके जळगांव जि० बुलढाणें यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुम्ही वऱ्हाडसमाचारांतील ता० १६ माहे आक्टोबर सन १९११ इ० चे अंकांत नोटीस दिली हे[...] आम्हास पावली. त्या नोटिशींतील [...] सर्व खोटा आहे. तुमचे जवळ प्रॉमिसरी नोट लिहून घेतली त[...] नगदी १५०० अक्षरी पंधराशे [...] नोट लिहून घेतली आहे. आतां [...]पर्यंत आद बदवतो लोक तुमचे साथीदार नवे कोणत्या त्या लोकांचे [...] तुम्ही खोटी नोटीस दिली तेव्हां [...] करणे तुमचे सारखे सावकारास शोभत नाहीं. तरी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत प्रॉमिसरीनोटांत शर्त लिहिल्याप्रमाणें आमचे रुपये व्याज मुद्दलसह आणून द्यावे व पावती घ्यावी तसें न केल्यास आम्ही तुमचेवर रीतीप्रमाणें दिवाणी कोर्टांत दावा आणून नोटिशीच्याही खर्चासुद्धां तुमचे जवळून रुपये भरून घेऊं. कळावे. ता० ३० १०-११ इ०

दस्तुर- बळवंत गोपाळ ढवळे रा० पातुर्डा
हल्लीं मुक्काम खामगांव.

सही
मोतीराम सिताराम देशमुख
हल्लीं मुक्काम खामगांव
दस्तुर खुद

नो० नं० ४७२

### जाहिर नोटीस

मी खालीं सही करणार सर्व शेट साहूकार लोकांस जाहीर नोटीस देतों कीं माझा चुलता गणू वल्लद बाबुजी शिंपी राहणार अडगांव हा मरण पावला व त्याची मुलें बळीराम व रामचंद्र हेही मरण पावले त्या तिघांच्या बायका आहेत व जिनगी कजबे अडगांव येथील राहतें घर धाब्याचें माडी ओसरी बैठकसुद्धां व माळेगांव येथील सर्वे नंबर १८ यांतील एक त्रितीआंष हिस्सा हे विधवा स्त्री यापासून कोणी गहाण ताबेगहाण खरेदी व बक्षीस घेऊं नये. कारण हल्लीं मैताचें नांवावर कर्ज कांहीं नाहीं ह्या स्त्रीया अन्न वस्त्राच्या मालकीणी अहेत. जोपर्यंत ह्या आमचे कुळांत आहेत तोपर्यंत घरांत राहून शेती वाहून खावी कोणी ताबेगहाण खरेदी विधवा स्त्री जवळून घेऊं नये घेतल्यास कोर्ट मार्फत दावा केला जाईल. ही नोटीस दिली सही ता० ३०-१०-११ इ०

द० देवीदास अंबादास प. आकोट.

सही
नामदेव उखर्डा शिंपी राहणार कजबे
अडगांव द. खु

नो. नं. ४७३